म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र.: २७४२६

IRBK-0121426
IRBK-0121426

# मदनबाधा

वसंत कानेटकर

IRBK-0121426

इंद्रायणी साहित्य
पुणे

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३ शनवार पेठ, पुणे ३०

प्रकाशन दिनांक
४ मार्च १९८६

मुखपृष्ठ
प्रभाशंकर कवडी
सरकारी प्रमाणपत्र
डी. आर. एम. ५०/१९८६
९ जानेवारी १९८६

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
टिळक रोड
पुणे ४११०३०

मूल्य अठरा रुपये

'मदनबाधा' या नाटकाचे प्रयोग करण्याचे एकमेव अधिकार चंद्रलेखा मुंबई, या संस्थेकडे ३१ डिसेंबर १९८७ पर्यंत दिलेले आहेत. या अवधीत अन्य कोणत्याही संस्थेला या नाटकाचे प्रयोग कोणत्याही कारणासाठी करता येणार नाहीत. या कालावधीत प्रयोगाच्या परवानगीसाठी कोणीही लेखकाशी वा चंद्रलेखा या संस्थेशी पत्रव्यवहार करू नये. १ जानेवारी १९८८ नंतर हौशी कलाकारांच्या संस्थांनी परवानगी आणि परवानगी-मूल्य यासाठी सौ. उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२ या पत्त्यावर तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी पत्रव्यवहार करावा.

(फोन नं. ७३०९२)

माझे परमस्नेही
श्री. शिरीष गुप्ते
आणि
सौ. वंदना गुप्ते
यांना प्रेमादरपूर्वक—

# निवेदन

सुमारे पाच सहा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. माझा मुलगा चि.प्रियदर्शन त्यावेळी उरणला हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीत इंजीनीयर म्हणून काम करीत होता. कामानिमित्ताने मुंबईला मी गेलो की एक दिवस उभाउभी तरी मी उरणला जाऊन येत असे. उरणला चि. प्रियदर्शनची भेट झाली की 'नवे काय?' अशी माझी पृच्छा व्हायची आणि तोही तत्परतेने काही इंग्लिश पुस्तके माझ्या पुढ्यात टाकायचा चि. प्रियदर्शन व्यवसायाने इंजीनीयर असला तरी एक जबरा वाचक आणि चोखंदळ रसिक आहे. तर एकदा अशाच एका मुक्कामात त्याने माझ्यापुढे एक कादंबरी टाकून म्हटले की "बाबा, हा तुमच्या नाटकाचा विषय आहे." कादंबरी होती एरीक सेगल या अमेरिकन लेखकाची आणि तिचं नाव होतं 'मॅन, वूमन अँड चाइल्ड'. कादंबरी तशी छोटीच होती. सायंकाळपर्यंत मी सहज वाचून टाकली. चि. दर्शन भेटला तेव्हा मी म्हटलं... "या कादंबरीतली प्रारंभीची घटना मोठी नाट्यपूर्ण आणि पिळदार आहे पण पुढे 'चाईल्ड' आणून लेखकाने भावविवशतेचा पार चिखल करून टाकला आहे. खरे तर 'चाईल्ड'ची हूल दाखवून त्याला आणलाच नसता, तर ही कादंबरी ठणठणीतपणे 'मॅन अँड/व्हर्सेस वूमन' अशी झाली असती. एवढेच नव्हे तर तिला अकारण फार गंभीर करायची गरजही पडली नसती. 'नवरा कसा लबाड आणि मूर्ख असतो आणि बायको कशी बिलंदर आणि मठ्ठ असते' याचं दर्शन घडवणारी सुरेख कॉमेडी यातून लिहिता येईल. त्याचक्षणी 'मदनबाधा' या नाट्यकृतीचा जन्म माझ्या मनात झाला. गेल्या पाच वर्षांत याच कादंबरीवर आधारलेली (पण ऋणनिर्देश न करता) काही नाटके व चित्रपटही लागून गेले. मी मुद्दाम थांबलो होतो. पण कादंबरीचे नाटक(की)करण करण्यापलीकडे त्यात मला काहीही कर्तृत्व आढळले नाही. मला या घटनेचा (कादंबरीतील) जो अर्थ उमजला होता तो वेगळाच होता. ज्यांना ज्यांना मी तो अर्थ सांगितला त्यांना तो आवडला व नवा वाटला. चंद्रलेखाचे निर्माते मोहन वाघ व सुप्रसिद्ध अभिनेते श्री. यशवंत दत्त यांनी तर सतत आग्रहच

धरला. डिसेंबर १५ पर्यंत 'मदनबाधा' या नाटकाचा पहिला अंक पुरा झाला. पण प्रथम शुभारंभाच्या प्रयोगाची १८ जानेवारी ८६ ही तारीख जाहीर करून श्री. मोहन वाघांनी माझ्यावर आणि श्री. अरविंद देशपांडे (दिग्दर्शक) यांच्यावर एक बॉंबशेलच टाकला. मग वेळापत्रक करून लिहायला बैठक मारणे भागच पडले. अंक दुसरा प्रवेश पहिला २५ ता. पर्यंत, प्रवेश दुसरा ३१ ता. पर्यंत आणि प्रवेश तिसरा ५ जानेवारीपर्यंत पुरे करायचे आणि जसजसे ते पुरे होतील तसतसे दिग्दर्शकाने ते बसवत जायचे असे ठरले. सुदैवाने कोठेही काही अडचण न येता नाटक दोन तीन जानेवारी ८६लाच पुरे झाले व ठरल्याप्रमाणे १८ ता.ला ते रंगमंचावर सादर झाले.

या नाटकातील पहिल्या अंकातील घटना व काही व्यक्तिरेखा 'मॅन, वूमन अँड चाईल्ड' या कादंबरीवरूनच मी घेतल्या आहेत. पण त्यांची मांडणी (Treatment) संपूर्ण निराळी आहे आणि संपूर्ण दुसरा अंक मी स्वतंत्रपणे बांधला व लिहिला आहे. स्त्री-पुरुष संबंध या गहन विषयाची एक मजेदार कड दाखवण्याचा या नाटकात मी प्रयत्न केला आहे. एक गंभीर विषय खेळकर-पद्धतीने मांडण्याचा माझा प्रयत्न--('प्रयोग' म्हटले तर प्रयोगांच्या ठेके-दारांना रागतर येणार नाही!) कितपत यशस्वी झाला आहे, ते रसिकानीच ठरवायचे आहे. या माझ्या प्रयत्नात निर्माते मोहन वाघ, दिग्दर्शक देशपांडे आणि कलाकार श्री. यशवंत दत्त आणि सौ. वंदना गुप्ते, तसेच अन्य कलाकार आणि कार्यकर्ते यांनी खूप कष्ट घेऊन सहकार्य केले आहे. मी त्यांचा ऋणी आहे. या नाटकाचे पुस्तक माझे प्रकाशक मित्र शामराव कोपर्डेकर यांनी देखण्या रूपात सादर करण्याची जिद्द बाळगली आहे व श्री. लाटकर यांनी त्याना सहकार्य द्यायचं ठरवलं आहे. या दोघांचाही मीं ऋणी आहे.

शिवाई
शरणपूर रस्ता
नाशिक ४२२००२

वसंत कानेटकर

या नाटकाचे प्रयोगाचे, रूपांतराचे, रूपांतरित प्रयोगांचे चित्रपटाचे, टेलीव्हीजन, रेडिओ इत्यादींवरील ध्वनिक्षेपणाचे वा ध्वनिमुद्रणाचे वा चित्र-क्षेपणाचे वा चित्रमुद्रणाचे सर्वाधिकार लेखकाजवळ सुरक्षित आहेत.

'मदनबाधा' या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग, चंद्रलेखा मुंबई, या संस्थेतर्फे शनिवार दि. १८ जानेवारी १९८६ या दिवशी दुपारी अडीच वाजता बिर्ला मातुःश्री सभागृह, मुंबई, येथे सादर करण्यात आला. या प्रयोगात पुढील कलावंतांनी भाग घेतला होता.

निर्माता, नेपथ्य, प्रकाश : **मोहन वाघ**
दिग्दर्शन : **अरविंद देशपांडे**
पार्श्वसंगीत : **अनंत अमेंबल**

**पात्र योजना**

| | |
|---|---|
| प्रा. अनिरुद्ध राजपाठक | : **यशवंत दत्त** |
| डॉ. ईश्वरचंद्र बंदोपाध्याय | : **जगन्नाथ कांदळगावकर** |
| डॉ. टिल्लू | : **उपेंद्र दाते** |
| डी. झेड. पाटील | : **राजीव कुलकर्णी** |
| चेतना बानर्जी | : **सुधीर देशमुख** |
| घोटणकर | : **सुरेश सावंत** |
| सुंदर | : **निशिगंधा वाड** |
| मधुरा | : **वंदना गुप्ते** |

ध्वनिमुद्रण : आशिष दीक्षित, ध्वनिसंयोजन : मधू दळवी, रंगभूषा : कृष्णा बोरकर, वेशभूषा : पॅमसन मेन्स वेअर, वेशभूषा सहाय्यक : सतीश आणि लक्ष्मण गोपाळ, प्रकाश योजना सहाय्यक : बाबू पुरोहित, विजय मिस्त्री.

रंगमंच व्यवस्था : अप्पा शिंदे आणि वसंत विचारे, निर्मिती सहाय्यक : हनुमान शिंदे, व्यवस्थापक : मनोहर कदम.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 29828 नों. दि 26/5/64
वि. आटक क्र. ..........

# पूर्वार्ध

## प्रवेश पहिला

[ पुण्यासारख्या एका शहरातला सुरेख वस्तीतला एक सुबक बंगला. बंगल्याचा दर्शनी हॉल. बाहेर व्हरांडा; त्यापलीकडे बाग, फाटक वगैरे. आतल्या दालनाकडे नेणारी दोन्ही बाजूला दोन दारे; शिवाय वरच्या मजल्याकडे नेणारा एक कठड्याचा जिना. हॉलची सजावट फारच चोखंदळ रसिकतेने केलेली लक्षात येते. इथे राहातात, प्राध्यापक अनिरुद्ध प्रभाकर राजपाठक--विद्यापीठातले इतिहास विभागाचे प्रमुख आणि इतिहासावर लेखन करणारे एक विद्वान व्यासंगी संशोधक; तसेच त्यांच्या पत्नी आणि मराठीतील ख्यातनाम कादंबरीकार सौ. मधुरा राजपाठक आणि त्यांची एकुलती एक कन्या, कु. सुंदर राजपाठक. प्राध्यापक अनिरुद्धांनी वयाची चाळिशी ओलांडली आहे तर मधुराबाई पस्तीशीच्या आहेत. दोघेही खूपच लहान दिसतात आणि उमदेपणामुळे जास्तच तरुण वाटतात. कन्या सुंदर नावाप्रमाणेच सुंदर, सतरा अठरा वर्षांची अल्लड कॉलेजमधे शिकणारी किशोरी आहे. या सर्वांनाच विविध कलांची आणि काव्य-शास्त्र विनोदाची आवड असल्यामुळे हे घर अहोरात्र हसत असते गात असते आणि तरतऱ्हेच्या भावभावनांनी फुलले बहरले असते.

आजची सायंकाळ या घरात एक विशेष आनंद घेऊन अवतरली आहे. मधुराबाईंच्या ' संबंध ' या कादंबरीला राज्यशासनाचे पहिले पारितोषिक मिळाले असून आजच या पारितोषिक वितरणाचा समारंभ शहरातल्या एक सभागृहात मोठ्या थाटामाटाने साजरा होणार आहे. त्या निमित्ताने राजपाठक कुटुंबीयांनी रात्री घरी एक थाटाची मेजवानीही मित्रमंडळीसाठी आयोजित केली आहे. त्यामुळे घरात गडबड उडाली आहे. गडबड मुख्यतः सुंदरची, समारंभाला नटूनथटून जाण्याची आणि स्वयंपाक घरात मधुराबाईंची, रात्रीच्या मेजवानीच्या तयारीची. प्राध्यापक अनिरुद्ध नेहमीप्रमाणे आजही पाच वाजायला आले तरी घरी परतलेले नाहीत. त्यावरून घरातल्या ताणतणावाची कल्पना येईल.

पडदा वर जाऊन रंगमंच उजळतो त्यावेळी प्लेयरवर एक सुरेख ठुमरी लागली आहे. पण ऐकायला मात्र हॉलमधे कोणीही नाही. हॉलमधे क्षणभराने बाहेरून ड्रायव्हर कम् प्यून घोटणकर शुभ्र कडक वेशात नटून सजून येतो आणि अवघडल्यासारखा उभा राहातो. अंगावर कपडा कौतुकाचा आणि कोराकरकरीत आहे हे कोणाच्याही लक्षात यावे. तेथल्याच एका स्टँडच्या आरशात तो आपली छवी न्याहाळतो आणि तरतऱ्हेच्या मुद्रा आणि आविर्भाव करून आपल्यातल्या आदमीला दसनूर कपड्यांनी किती ऐटबाजपण आणलाय ते जोखून पाहातो. तेवढ्यात वरून कोठून तरी सुंदर हाक मारते--" ममीऽऽ .. ममीऽऽ... ए मॉम्स...अगं पाच वाजलेऽऽ" तशी स्वयंपाक घरातून मधुराबाई किंचाळतात--" कळलंऽऽऽ ! किंचाळू नकोस उगीच. तयार होतेच आहे मी आता. मी काही स्वस्थ बसले नाहीये." क्षणार्धात लकेर घेत, जिन्यावरून धाडधाड उड्या मारीत, नटूनथटून सुंदर एखाद्या परीसारखी खाली येते आणि घोटणकरला पाहात आश्चर्यानं थक्कच होते. ]

**सुंदर** : हाईऽ...अय्या ऽ घोटणकर तू ऽऽ ? इतक्या कडक युनीफॉर्ममध्ये ? फँटास्टिक !

**घोटणकर** : ( प्रचंड लाजत ) होय सुंदर ताई...मीच आपला तो.

**सुंदर** : अरे पण हा युनीफॉर्म शिवलास कधी कधी तू ?

**घोटणकर** : बाईंना कादंबरीबद्दल बक्षीस मिळाल्याचं जाहीर झालं तेव्हा मीच त्यांच्यापाशी हट्ट धरला. या समारंभाला मी काही खाकी डगला घालून गाडीवर बसायचा नाही. पी कॅपसह शुभ्र ड्रेस हवाच. या युनीफॉर्मात कसा दिसतो मी सुंदर ताई ?

**सुंदर** : एकदम कडाड् रेऽ ! ममीनं तुला पँटीत घातला ही गोष्ट झकास केली बघ. पण घोटण, आता संध्याकाळपर्यंत तंबाखूचे आणि पानाचे डाक पाडू नकोस म्हणजे झालं.

**घोटणकर** : छा छा ऽ ! माझं सोडाच ताई पण कुणा पानतंबाखू चघळणाऱ्याला गाडीच्या जवळपास फिरकू द्यायचा नाही मी.

**सुंदर** : तू तयार झालास, मी पण तयार झाले. पण पपांचा पत्ता कुठाय ? आणि ममी ? ( ओरडून ) ममीऽऽऽ...तू आधी बाहेर ये बघू. किचनमधे आता सगळं काम शांताबाईंच्यावर सोपव.

[ तशी मधुराईबाई दाराशी येत म्हणतात—" आले गऽऽ.. र र बाई बिर्यानी झाली. रस्सा झाला. सूप झालं. सलाड तयारच आहे. पुडींग फ्रीजमधे ठेवलंय. तुम्ही कणीक मळून ठेवा आणि— ] हिचं हे हे कध्धी कध्धी संपायचं नाही. [ फोनपाशी जाऊन रिसीव्हर उचलत डायल फिरवून ] हॅलोऽ...मी सुंदर

राजपाठक. जरा हिस्टरी डिपार्टमेंटमधे जोडून देता का?.. थँक्स, आय ॲम होल्डींग...( गुणगुणते ) हां मी सुंदर राजपाठक. कोण प्रो. नागराजनच ना? ...डॉ. अनिरुद्ध राजपाठक युनीव्हर्सीटी कॅम्पसमधून बाहेर पडले की नाही अजून?...कोणाशी बोलताहेत?...अहो पण आम्ही घरी वाट पाहातो आहोत केव्हाचे सगळे. एका फंक्शनला जायचंय आम्हाला...नाही नाही मी त्यांची मुलगी सुंदर. आमच्या ममीला 'संबंध' या कादंबरीबद्दल स्टेट ॲवॉर्ड मिळालंय साडे साहाला समारंभ सुरू व्हायचाय. मिनीस्टर यायचेत आज तरी वेळेवर पोचायला नको का तिथं?...फॉरीनर्स काय आता रोजच्चेच झाले आहेत. तुम्ही प्लीज पपांना सांगा––...हां पपा मी सुंदर. तुम्ही आता एक अक्षर सुद्धा बोलू नका. तावडतोब स्कूटर काढताय बाहेर की मी गाडी घेऊ न येऊ तिथं?...दॅटस बेटर. [ सुंदर रिसीव्हर ठेवून फोन बंद करते. तेवढ्यात मधुराबाई पदराला ओले हात पुसत 'हुश्श' करीत बाहेर येतात. तशी त्यांना आपादमस्क न्याहाळीत ] ममी अगदी हद्द झाली तुझ्यापुढं. अजून तू पातळ पोलकं सुद्धा बदललं नाहीस?

**मधुरा :** दोन मिनिटात बदल गं. मला तुझ्यासारखा नट्टापट्टा थोडाच करायचाय? पोलकं चांगलं आहे. फक्त तुझ्या पपांनी परवा आणलेली फुलवायल साडी––

**सुंदर :** ग्रेटच आहेस तू मॉम्स. आज तू फुलवायल नेसणार आहेस? त्यापेक्षा एखादं जुनं पोतेरं सापडेल की तुला घरात.

**मधुरा :** सुंदर उगाच तू मला दमदाटी करू नकोस बाई. तुझ्या पपांना––

**सुंदर :** पप्पांना इतिहासात डॉक्टरेट मिळालीय. साडीची निवड करण्यात नाही. ( हाताला धरून जिन्यातून ओढून नेत ) आज मी तुझं काहीएक ऐकणार नाही. मी सांगेन तेच तू ऐकलं पाहिजेस. म्हैसूर सिल्कची साडी, मॅचींग ब्लाऊझ––मी काढून देईन तो. कानात हिऱ्याच्या कुड्या, मोत्याच्या बांगड्या, गळ्यात तन्मणी शिवाय––

**मधुरा :**––अगं अगं अगंऽऽऽ...बक्षिसाचा समारंभ आहे तो, तुझ्या लग्नाचा स्वागत समारंभ नाहीये तिथं. काय म्हणावं या मुलीला...

[ पण काही म्हणण्यापूर्वी सुंदर आईला जिन्यातून वर घेऊन जाते. त्या दोघी गेल्यावर घोटणकर पुन्हा आरशात पाहात पी कॅप काढून खिशातल्या छोट्या कंगव्यानं केस विंचरू लागतो. तेवढ्यात दारावरची घंटा खणखणते तशी पी कॅप चढवीत पोशाखाला साजेलशा थाटात––" येस येस...कमींग " म्हणत तो बाहेर जातो. क्षणभराने बोलत परत येतो. पाठोपाठ घामाघूम झालेला एक सचिवालय छाप तरुण " फार नाही होऽ...फक्त पाच मिनिटं "...म्हणत गयावया करीत येतो. तशी–– ]

**घोटणकर :** बसा तिथं. बाईसाहेब कपडे करायला वर गेल्या आहेत.

**तरुण :** ( अस्वस्थ होत ) बसायला वेळ नाहीये. मी सांस्कृतिक मंत्रालयाच्या घाटगे-साहेबांच्या चिटणिसाचा चिटणीस. घाटगेसाहेबांनाच आज मुख्य भाषण करायचंय. त्यासाठीच बाईसाहेबांचा बायोडाटा आणावयाला आमच्या वरिष्ठांनी तातडीनं मला पाठवलंय. म्हणजे काय घोटाळा झाला, खात्याच्या कारकुनानं चूक केली. राजपाठक ऐवजी त्यानं वेदपाठक ऐकलं. त्याला काय हो त्याचं सोयरसुतक ? त्यानं कोणा वेदपाठक बाईंना गाठलं आणि हातभर माहिती लिहून आणली. बघतोय तर कादंबरी ऐवजी विणकामावरली पुस्तकं. तासापूर्वी सगळा घोळ उलगडला तेव्हा मी स्वतः तस्सा धावत आलोय. जरा प्लीऽज...त्याना लवकर बोलवता का ?

**घोटणकर :** ( जरबेनं ) नाही. बाईसाहेब कपडे करायला—

**तरुण :** हो, पण जरा लवकर—

**घोटणकर :** अरे ऽऽ च्या ? मी सांगतोय की बाईसाहेब आजच्या समारंभासाठी कपडे करायला म्हणून आत्ताच वर गेल्यात, तर—

**तरुण :** हो हो ते खरंय...तरी पण जरा जलदी केली तर...म्हणजे काय आहे की आमचे घाटगे साहेब—

**घोटणकर :** कळलं हो ! तुमचे साहेब तुमच्या कचेरीत. इथं कोण्णी नाहीत. हा माझा नवा कोरा युनीफॉर्म चढवायला मला किती वेळ लागला, ठाऊक आहे ? तब्बल अर्धातास. तरी मी ड्रायव्हर माणूस. फक्त गाडीच चालवणार. बाईसाहेब पांहुण्यांच्या हातून बक्षीस घेणार; थोरामोठ्यात वावरणार; त्या हिशेबानं पद्धतशीर जामानिमा करायचा म्हणजे—

**तरुण :** तरी पण तुम्ही सांगून तर बघा—

**घोटणकर :** पुन्हा तेच. मी सांगतोय की—

[ " कोण आहे ? काय भानगड आहे रे घोटणकर ? " असं वरून विचारत सुंदर खाली येते तशी तरुण पुढं होतो आणि— ]

**तरुण :** बाईसाहेब मी डी. झेड पाटील. सांस्कृतिक संचालनालयाच्या घाटगेसाहेबांच्या चिटणीसांचा मी चिटणीस, साहेबांना आजच्या समारंभात भाषण करायचंय त्यासाठी आपली थोडी माहिती हवीय.

**सुंदर :** माझी ऽऽऽ ? अय्या ऽऽऽ

**पाटील :** हो म्हणजे ( कागद पाहात ) सौ. मधुराताई वेद नाही राजपाठक

**सुंदर :** अहो ती माझी आई. तिची काय माहिती हवीय तुम्हाला ?

**पाटील :** ( बसून कागद पेन सरसावीत ) तशी सगळीच हवीय. पण थोडक्यात. ( वाचत ) म्हणजे जन्म केव्हा, कुठे कोणत्या घराण्यात झाला ?

**सुंदर :** ( त्याच्यासमोर बसत ) घ्या लिहून ममीचा जन्म कोल्हापूरला सरदार शिर्क्यांच्या कुळात झाला. ( ओरडून विचारते ) ममी किती साली गं ?

**पाटील** : सालबील जाऊ दे. अदमासानं त्यांचं आजचं वय सांगा म्हणजे झालं.

**सुंदर** : हे पाहा मी आता सतरा वर्षांची आहे—

**पाटील** : असं का ? अरे वा !

**सुंदर** : त्यात 'अरे वा' करायला काय झालं ? माझ्या जन्माच्या वेळी ममी अठरा वर्षांची होती.

**पाटील** : म्हणजे सतरा दुणे चौतीस अधिक एक बरोबर पस्तीस. (लिहून घेत) छान. शिक्षण ?

**सुंदर** : ममी बी. ए. फर्स्टक्लासमधे पास झालीय. पहिला नंबर मिळवून. सगळी प्राईजेस तिलाच मिळाली त्यावेळी.

**पाटील** : असं का ? अरे वा ! आईसाहेबांना हा नाद केव्हापासून लागला ?

**सुंदर** : नाद ? कसला नाद ?

**पाटील** : म्हणजे लेखनाचा ?

**सुंदर** : इश्श मग छंद म्हणा, आवड म्हणा...नाद काय ?

**पाटील** : सॉरी...जरा चुकलंच. तेच म्हणायचं होतं मला.

**सुंदर** : लहानपणापासून तिला आवड आहे लेखनवाचनाची. तिची पहिली कथा प्रसिद्ध झाली त्यावेळी ममी अवघी पंधरा वर्षांची होती.

**पाटील** : असं का ? अरे वा. पुढं ऽऽ (वाचत) लग्न. लग्न प्रेमविवाह की ऽऽ—

**सुंदर** : त्याचा बक्षिसाशी काय संबंध ?

**पाटील** : तसा संबंध नाही...पण आपलं जनरल...

**सुंदर** : नुसता प्रेमविवाह नाही. अगदी त्या काळी गाजलेला हा कृष्णरुक्मिणी विवाह होता.

**पाटील** : कृष्ण रुक्मिणी विवाह म्हणजे ?

**सुंदर** : म्हणजे मुलीनं ठरलेल्या लग्नाच्या वेळी घरातून पळून जाऊन आपल्या प्रियकराशी केलेला विवाह.

**पाटील** : असं का ? अरे वा ! आपले वडील त्यावेळीऽऽऽ—

**सुंदर** : कोल्हापूरच्याच कॉलेजमधे लेक्चरर होते.

**पाटील** : असं का ? अरे वा ! म्हणजे तिथंच जमवलं वाटतं त्यांनी हे हे आपलं ? काही काही लोकाना कसं काय साधतं बुवा हे हे जमवायचं, काही कळत नाही.

**सुंदर** : का ? तुम्हाला कोणी मुलीनं तोंडघशी पाडलं होतं वाटतं कॉलेजमधे ?

**पाटील** : त। काय ? फारच भारी मुलगी निघाली. सारखं हॉटेलात जाऊन खायचा भयंकर नाद. वर्षभरात पार धुऊन काढलं तिनं मला. इतका खर्च करून लग्न शेवटी हॉटेलवाल्याशीच केलं तिनं.

**सुंदर** : मग आता काही दुसरे प्रयत्न चालू असतीलच ?

**पाटील :** छे होऽ...पहिलीचीच हॉटेल उधारी फेडतोय अजून. बरंऽऽ माताजींना मुलं बाळं वगैरे—

**सुंदर :** ऊं हूं ! वगैरे विगैरे काहीं नाही. मी एकुलती एक मुलगी आहे माझ्या आईवडिलांची.

**पाटील :** असं का ? अरे वा !

**सुंदर :** त्यात 'अरे वा' काय ? तुम्हाला सवय आहे काहो, कोणी काही म्हटलं की 'असं का–अरे वा' म्हणायची ?

**पाटील :** त्याचं काय आहे, आमच्या घाटगे साहेबांच्या प्रत्येक बोलण्याला समोरच्याना 'असं का ? अरे वा' म्हणावंच लागतं. नाही तर ते खाडकन् बदली करून टाकतात.

**सुंदर :** ( नक्कल करीत ) असं का ? अरे वा !

**पाटील :** आईसाहेबांची किती पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत आत्तापर्यंत ?

**सुंदर :** चार कथासंग्रह, तीन कादंबऱ्या, एक प्रवासवर्णन आणि दोन कवितासंग्रह. शिवाय—

**पाटील :** पुरे पुरे, झालं संपलं. ( उठत ) आता एकच विचारायचं...आपलं नाव ?

**सुंदर :** सुंदर राजपाठक..हांऽ 'असं का अरे वा' नाही म्हणायचं.

**पाटील :** छे छे, तुम्हाला नाही पसंत तर नाही म्हणायचा. पण रागाऊ नका बुवा. तुमचं नाव अगदी गोऽड म्हणजे काव्यात्मक का काय म्हणतात ना, तसलं आहे, असं म्हणायचं होतं मला.

**सुंदर :** थँक्स, बराय–

**पाटील :** आमचं ऑफिस इथं कँपमधेच आहे. सवडीनं कधी आलात तर आपण बरोबर चहा घेऊ आमच्या कँटीनमधे.

**सुंदर :** नुसता चहाच ?

**पाटील :** असं कसं ? चहा बरोबर बिस्किटं मागवणारच की आम्ही.

**सुंदर :** मागली सगळी उधारी फिटली की कळवा मला. मग बघू.

**पाटील ?** तशी काही फार नाहीये उधारी. डी. ए.चा रिट्रॉस्पेक्टीव्ह मिळाला की एकदम मोकळा !

[ बाहेरून हाक ऐकू येते. प्रा. अनिरुद्ध ओरडतात—"अरे काय चाललाय काय तुम्हा लोकांचं आत मधे ? घोटणकर..." तशी ]

**सुंदर :** बराय, या आता मिस्टर असं का–अरे वा.

[ ती हात पुढं करते. तो हुरळून हस्तांदोलन करतो मग तो जातो. क्षणार्धात गर्जना करीत प्रा. अनिरुद्ध येतात. ]

**अनिरुद्ध :** दहा मिनिटं मी स्कूटरवर बसून टणाणा करतोय तरी फाटक उघडायला कोणी येत नाही, याचा अर्थ काय ?

**सुंदर :** उगीच गर्जना करू नका पपा. मला ठाऊक आहे फाटक सताड उघडं आहे आणि तुम्ही आत्ता आला आहात. दहा मिनिटं वगैरे काही नाही. ( मनगटावरलं घड्याळ दाखवीत ) साडेपाच वाजून गेले. चार वाजता तुम्ही येणार होता. उशिरा येता ते येता आणि आम्ही कोणी बोलू नये म्हणून स्वतःच आरडाओरडा करीत घरात शिरता काय ? खरं म्हणजे तुम्ही आज रजाच घ्यायला हवी होती.

**अनिरुद्ध :** अगं पण हो होऽऽ. मी निघायच्या वेळी आमच्या डिपार्टमेंटमधे आज कोण आला होता हे तुला ठाऊक आहे का ?

**सुंदर :** असेल कोणी तरी फॉरीनर. आग लावा मेल्यांना.

**अनिरुद्ध :** ( टाय सोडत ) अगं त्यांना का उगाच जाळायला निघालीस ? बिचारा सत्तर वर्षांचा म्हातारा गिलफोर्ड, केवळ मला भेटायसाठी दिल्लीहून इथं आलाय.

**सुंदर :** उद्यापर्यंत थांबला असता तर काही प्राण चालला नव्हता ना त्याचा ?

**अनिरुद्ध :** चांगला ठणठणीत प्रकृतीचा आहे तो. रात्रीच परत जाणार म्हणत होता. पण मग त्याला मी ममीला मिळालेल्या ॲवॉर्डबद्दल सांगितलं. तेव्हा——

**सुंदर :** ममीच्या कादंबरीबद्दल तुम्ही त्याला भरपूर ऐकवलंत. मग उशीर होणारच की?

**अनिरुद्ध :** छे छे, तसं काही नाही. डॉ. गिलफोर्ड समारंभाला तर येतोच आहे पण रात्रीच्या मेजवानीला सुद्धा यायचं कबूल केलंय त्यानं, आहेस कुठं ?

**सुंदर :** छाऽन ! चांऽगलं ! पपा तुम्ही आज काय गावजेवण घालायचं ठरवलंय का ? कालपासून भेटेल त्याला तुम्ही जेवायचं निमंत्रण द्यायचा सपाटा चालवलाय. तुम्हाला ममीचा काही विचार आहे का ?

**अनिरुद्ध :** हॅऽ ! डोन्ट यू वरी. तुझी ममी या बाबतीत एकदम आदर्श गृहीणी आहे. पाहुणचाराला ती कध्धी डरणार नाही.

**सुंदर :** म्हणूनच तुम्ही त्याचा असा गैरफायदा घेता. तुम्हाला माझ्यासारखी ठणठणीत बायको मिळायला हवी होती.

**अनिरुद्ध :** थँक गॉड. त्या बाबतीत मी बचावलो. पण अशी नाही तशी—मुलगी होऊन डोक्यावर मिरे वाटती आहेसच तू माझ्या.

[ तेवढ्यात 'काय झालं ?' विचारीत नटून थटून मधुराबाई वरून खाली येतात. त्यांना पाहताच शीळ घालीत ] हाईऽ... मधुरा यू लुक गॉरजस...सिंपली स्मॅशींग...कोण म्हणेल तुला तू सुंदरची आई आहेस म्हणून...खरं म्हणजे थोरली वहीणच...

**मधुरा :** ( दटावीत ) पुरेऽऽहं ऽ ! काय गं आता तरी बरी दिसतेय ना मी !

**अनिरुद्ध :** ते निला काय विचारतेस. मला विचार...मला विचार...मी तुला अगदी साधार आणि सोदाहरण अभिप्राय—

**मधुरा :** पुरे म्हटलं ना ? आता वयाचं भान ठेवा जरा.

**अनिरुद्ध** : तुला गंमत सांगतो मधू, मला पाहिल्याबरोबर डॉ. गिलफोर्ड थक्कच झाला आणि काय म्हणाला ठाऊक आहे ?

**सुंदर** : ( नक्कल करीत ) डॉ. राजपाठक यू लुक सो यंग अँड हँडसम्...

**अनिरुद्ध** : येस येस...अगदी तेच म्हणाला. अरे तुला काय कर्णपिशाच्चानं सांगितलं की काय सुंदर ?

**सुंदर** : मग डॉ. राजपाठक हुरळले आणि त्यानी डॉ. गिलफोर्डला आज रात्री जेवायला बोलावलं.

**अनिरुद्ध** : अरे म्हणजे कमाल झाली. मला सांग तू मधू—

**मधुरा** : सुंदर, अगं आपला नवरा अचानकपणे कोणाला कसा घरी जेवायला बोलावतो हे इतक्या वर्षांच्या संसारानंतर माझ्यासारख्या बायकोला ठाऊक का नसतं ? हे दहा पाहुणे बोलावतात तेव्हा मी पंचवीसांचं जेवण तयार ठेवते.

**अनिरुद्ध** : हिप हिप हुर्ये ! मधू यू आर रिअली ग्रेट. तिचं जरा शीक सुंदर. मधुरा तू एवढ्या कडक शिस्तीची बायको आहेस, पण तुझ्या मुलीला घरेलु वळण नाही. ही पोरटी अलीकडं मला एवढ्या तेवढ्यावरून भलतीच फैलावर घेत असते. आत्ता ही मला काय काय बोलली—

[ तेवढ्यात फोन खणखणतो. तशी मधुरा रिसीव्हर उचलत ]

**मधुरा** : ( फोनमधे ) हॅलो...मी मधुरा राजपाठक...जरा थांबा हं. ( रिसीव्हर पुढे करीत ) सुंदर, तुझ्या चेतनचा फोन आहे तुला.

**सुंदर** : ( लगबगीनं रिसीव्हर घेत ) हॅलो मी सुंदर...तू येतो आहेस ना ?...पण याचा अर्थ काय ?...जस्ट वेट वेट...ममी मी फोन जरा वर माझ्या खोलीत घेऊन जाऊ ?

**मधुरा** : इश्श जा कीऽ ! त्यात विचारायचं काय ?

**सुंदर** : ( फोनमधे ) मी फोन वर माझ्या खोलीत नेतेय. इतक्यात बंद करू नकोस.

[ असे म्हणत ती पपांच्या विशेष चौकस दृष्टीकडे न बघता फोन काढून वर घेऊन जाते. अनिरुद्ध तिला आणि मधुरा अनिरुद्धांना पाहातच राहतात. मग—]

**अनिरुद्ध** : हा हा...काय प्रकार आहे मधू ?

**मधुरा** : कसला प्रकार ?

**अनिरुद्ध** : ( कोट काढून टाकत ) हा हा चेतन कोण ?

**मधुरा** : ( कोट उचलत ) चेतना बॅनर्जी. सुंदरचा एक मित्र.

**अनिरुद्ध** : ( बूट पायमोजे काढता काढता ) मित्र ? केवळ मित्र ? आय डोन्ट बिलीव्ह इट. ही काही नुसती सरळ सोज्ज्वळ मैत्री दिसत नाहीये.

**मधुरा** : ( बूट पायमोजे उचलून ठेवीत ) नसेलही. तुम्ही आज सिल्कचा गुरू शर्ट आणि टेरीवुलची डार्क ब्ल्यू पॅंट घालणार आहात.

**अनिरुद्ध :** का ? पायजमा घालतो की ?

**मधुरा :** नाही पँटच घालायची. समारंभाला जायचंय. जेवणावळीला नाही.

**अनिरुद्ध :** बरं बुवा पँट तर पँट. ( उसळून ) पण याचा अर्थ काय ? मी सुंदरच्या मित्राबद्दल. . .त्या बंगाल्याबद्दल बोलतोय.

**मधुरा :** ( थंडपणे ) गोष्टी आपल्यापर्यंत आल्या नाहीत तोवर आपण उगाच अर्थ-वीर्थ काढीत बसू नये. मी तुमची शर्ट पँट रूमाल सगळं आत कॉटवर काढून ठेवलंय. तुम्ही चटकन वॉश घेऊन—

**अनिरुद्ध :** 'गोष्टी आपल्या पर्यंत आल्या नाहीत तोवर'—म्हणजे काय ? ही ही पोर कोणाच्या प्रेमाबीमात तर पडली नाही ना ?

**मधुरा :** समजा पडली असली, तर काऽय ?

**अनिरुद्ध :** सिली ! स्टुपिड ! नॉन्सेन्स ! ही ही गुडघ्याएवढी पोर, अगं प्रेमात पडायचं हे काय वय आहे तिचं ?

**मधुरा :** येत्या डिसेंबरात अठरावं वर्ष लागेल तिला.

**अनिरुद्ध :** म्हणून काय झालं ? हे प्रेमाबीमाचे थेर करायला सुंदर लहानच आहे अजून.

**मधुरा :** सरदार शिर्क्यांच्या मुलीला फूस लावून तुम्ही पळवून नेलीत आणि लग्न लावलत तिच्याशी, त्यावेळी ती सुंदर एवढीच होती, आठवतंय का ?

**अनिरुद्ध :** ( गप्प होत. क्षणभरानं ) ते ते सगळं निराळं होतं. उद्या वाट्टेल ते दाखले देऊन गुडघ्या एवढी कारटी पाघळायला लागली तर आईबापांनी काय टाळ्या वाजवीत बसायचं ? [ मधुरा हसू लागले तशी—] हसतेस काय ? मी सीरीयसली बोलतोय. सुंदरबद्दल माझे फार मोठ्ठे प्लॅन्स आहेत. इतक्यात मला तिचं लग्न करायचं नाही.

**मधुरा :** मुलीबद्दल सुद्धा किती पझेसिव्ह आहात हो तुम्ही ! चला उठा. आत्ताच काही गळ्याला तात लागली नाहीये. आत जाऊन वॉश घ्या आणि चटकन् कपडे बदलून तयार व्हा. लवकर निघायला हवं आल्याला.

[ अनिरुद्ध कपडे काढीत आत जातो. क्षणात वरून फोन घेऊन सुंदर खाली येते. फोन परत ठेवता ठेवता—]

**सुंदर :** काय म्हणत होते ग पपा ?

**मधुरा :** छे, विशेष काही नाही.

**सुंदर :** विशेष नाही कसं ? पपांच्या समोर चेतनचा फोन आहे हे कशाला म्हणालीस तू ? नुसता तुझा फोन आहे असं—

**मधुरा :** पण ही लपवालपवी कशासाठी ?

**सुंदर :** काहीतरीच गं काय तुझं ? त्यात लपवालपवी कसली ? चेतन माझा मित्र आहे आणि—

**मधुरा :** झालं तर. तेच सांगत होते मी तुझ्या पपांना.

**सुंदर :** मग ? काय म्हणाले ते ?

**मधुरा :** ( मिस्कीलपणे ) म्हणाले—चोराच्या मनात चांदणं.

**सुंदर :** चल ! काहीतरीच काय ?

[ तोच अनिरुद्ध टॉवेलनं तोंड पुसत डोकावून विचारतात. ]

**अनिरुद्ध :** काय करतो ग हा बंगाली ?

**मधुरा :** बातमीदार आहे.

**अनिरुद्ध :** ( वाईट्ट मुद्रनं आणि स्वरात ) फक्त बातमीदार ?

**सुंदर :** ( उसळून ) डबल ग्रॅज्यूएट आहे तो. जर्नेलिझमचा कोर्ससुद्धा झालाय त्याचा. एक्प्रेस न्यूज सर्व्हीसमधे एडीटर म्हणून बोलावत होते त्याला. पण त्यानं फ्री लान्सींग करांयचं टरवलंय म्हणून—

**मधुरा :** अगं पण बातमीदार म्हटलं म्हणून तुला एवढा राग का आला ?

**सुंदर :** ( घुश्शात ) उगीच एखाद्याला क्षुद्र लेखायचं म्हणजे काय ?

**मधुरा :** बघा बाई ! मी कोणाला काय क्षुद्र लेखलं ? काय हो ?

**अनिरुद्ध :** आंऽ ? छे छे, मी.. मी...कपडेच बदलतोय. ( आत पळतात )

**सुंदर :** मला सगळं कळतं. "बातमीदार ?" म्हणत कस्सा चेहरा केला पपांनी ?

**मधुरा :** तू एकदा चेतनची ओळख करून दे पपांना म्हणजे—

**सुंदर :** ( एकदम आठवत ) अय्याऽविसरलेच की. ( दाराशी जात ) पपा, चेतनकडं कलकत्त्याचे त्याचे मामा आलेत. तुम्हाला फोन करणार आहेत ते एवढ्यात.

[ **अनिरुद्ध :** कोण चेतनचे मामा ? ]

**सुंदर :** ईश्वरचंद्र बंदोपाध्याय. त्यांचं काही काम आहे तुमच्याकडं.

[ **अनिरुद्ध :** ओ आय सी. हिस्टरी असोसिएशन्चे चेअरमन...त्यांचं माझ्याकडं काय काम आहे ते ठाऊक आहे मला. ]

**सुंदर :** मॉम्स, मी बागेतून गुलाबाचं फूल घेऊन येऊ ? बघ तरी कसं रसरशीत नि टपोरं आहे ते. वेणीत घालते आज मी तुझ्या.

**मधुरा :** माझ्या नको. तुझ्याच घाल. [ सुंदर गुणगुणत बाहेर धावते. ]

**अनिरुद्ध :** ( कंगव्यानं केस विंचरीत डोकावत ) तू काही म्हण मधू. . .पण इथं पाणी मुरतंय बरं का !

**मधुरा :** मुरू दे. तुम्ही आणखी आताच त्याचा चिखल करून टाकू नका. तुमचं आटोपलं का नाही अजून ?

**अनिरुद्ध :** हे काय आटोपतच आलंय. पण मधुरा,—

[ तेवढ्यात बाहेरून चिरक्या कर्कश पुरुषी आवाजात गर्जना ऐकू येते—" आहात का मिसेस मधुराबाई राजपाठक घरात ? " तशी आत गेलेला अनिरुद्ध गडबडीने

डोकावतो आणि– ]

अरे बापरे ऽऽऽ ! चीत मेलो. हा खवीस उगवला वाटतं ? बघतेस काय अशी ? अगं सोशॉलॉजीचा प्रोफेसर...आपला शेजारी गं ऽ...

**मधुरा :** डॉ. टिल्लू ?

**अनिरुद्ध :** होय तोच तो बिग् बोअर...

[ बाहेर मघाच्याच चिरक्या आवाजात–" भिंगारडे, तुम्ही बाहेर गाडीतच थांबा. दोन मिनिटात मी बाईंचं अभिनंदन करून येतो. अगं मुली ऽऽ...कोण ग तू ? राजपाठकांची मुलगी तर नव्हेस ? "

" होय मी त्यांची मुलगी. माझं नाव सुंदर. "

" रोज सकाळी बघतो मी तुला आमच्या बागेतली फुलं तोडतांनां. तुझा बाप घरी आलाय की नाही अजून युनिव्हर्सिटीतून ? आणि आई घरात आहे ना ? "

" आई घरातच आहे, पण आम्ही समारंभाला निघालोय. पपा कपडे करताहेत. "

" समजा ऽ ग. समारंभ म्हणजे काही नोबेल प्राइझचा तर सोहळा नाही ! बाकी आपल्याकडं काऽय...एवढंस्सं टुस्स झालं की समारंभ " दरम्यान इकडे आत मधे — ]

**अनिरुद्ध :** आता तूच भेट त्याला आणि लवकरात लवकर कटव त्याला. पार तडीपार पोचलेला विद्वान आहे तो. त्याच्याशी वादात पडू नकोस आय वॉर्न यू.

[ एवढं बोलून अनिरुद्ध आत पळून जातो.

" नमस्ते मिसेस राजपाठक मी डॉ. भीमराव एकनाथ टिल्लू हेड ऑफ द सोशॉलॉजी डिपार्टमेंट " असे म्हणत नमस्कार करीत डॉ. टिल्लू आत येतात. पन्नाशी ओलांडलेले. मुद्रा ऊग्र, रगेल, कपाळाला कायमच्या आठ्या. वेश बावळा. आवाज चिरका. बोलणे आढ्यतेखोर कुत्सितपणाचे मुद्रेवर कायम कोरलेला भाव तर असा की– ' कोण्णाला कशात काही ओ म्हणता ठो कळत नाही. आपली कोणाला कदर नाही; पण तत्राप मी जगाला फाट्यावर मारतो.' ते आत येताच— ]

**मधुरा :** इश्श्य ऽ ! आम्ही तुम्हाला ओळखत नाही का डॉ. टिल्लू ? नमस्ते. बसा बसा—

**टिल्लू :** छे छे, बसायला रिकामा वेळ आहे कोणाला ? ( बसत ) एका पाठोपाठ चार मीटींग्ज अटेंड करायच्या आहेत आज मला. पण म्हटलं दोन मिनिटं तरी भेटून तुम्हाला हार्टी कॉंग्रॅच्युलेशन्स देऊन पुढं जावं. किती झालं तरी आपण वर्षानुवर्षांचे शेजारी. एवढा तरी शेजारधर्म पाळायलाच हवा. काऽय ?

**मधुरा** : थँक यू व्हेरी मच डॉक्टर टिल्लू. पण माझी कादंबरी तुम्ही वाचलीत तरी का ?

**टिल्लू** : हो वाचली. म्हणजे चाळून पाहिली. तुम्हाला ठाऊक नसेल, आय एम अ व्हेरी फास्ट रीडर. हजार हजार पानांचे ग्रंथ मी एकेका दिवसात फडशा पाडून टाकतो. खरं म्हणजे मी कथा काव्य कादंबऱ्या वाचीत नाही. मराठी तर नाहीच नाही. पण तुमच्या कादंबरीची तारीफ फार ऐकली म्हणून चाळून पाहिली. आम्हाला तुमची ती कलाबिला काही कळत नाही. तरी पण ज्या अर्थी तुम्हाला स्टेट ॲवॉर्ड मिळालंय त्या अर्थी त्यात कलेबिलेचा मसाला असणारच. लोकांनाही तुमची कादंबरी आवडतेय. चटकदार खमंग मिसळ कोणाला आवडत नाही ? ते ठीक आहे, पण मी सांगतो की समाजशास्त्राच्या दृष्टीनं तुमच्या कादंबरीत काहीही राम नाही. सगळे विचार अर्धेकच्चे, उथळ आणि अशास्त्रीय आहेत. स्त्री-पुरुषसंबंध हा एक गहन विषय आहे. भल्याभल्यांनासुद्धा त्यात ओ म्हणता ठो कळत नाही. सगळा मूर्खांचा बाजार भरलाय.

**मधुरा** : ( अस्वस्थ होत घड्याळात पाहात ) हो पण मला वाटतं डॉ. टिल्लू आपण या विषयावर पुन्हा कधीतरी—

**टिल्लू** : पुन्हा कधीतरी कशाला ? मी आत्ताच बोलून टाकतो. मी तोंडावर स्पष्टपणे बोलणारा माणूस आहे. मला सांगा मिसेस राजपाठक, स्त्रीपुरुषांचं मुळात रसायन आहे काय, याचा तुम्ही कधी विचार केलाय ? नाही. माणूस म्हणजे हाडाच्या सापळ्यावर मासाचे प्लॅस्टर मारून रक्त भरलेला, सुमार शक्तीच्या मेंदूचा, एक प्राणी आहे प्राणी. त्याला शिक्षणात तळला आणि संस्कृतीत घोळला तरी परिणाम शून्य. शिक्षण संस्कृती नीतिमत्ता एटसेट्रा एटसेट्रा...ऑल हंबग्. नुसते चिकटवलेले चिखलाचे कुल्ले. जरा धक्का मारला की बदाबदा ढपसे:पडलेच.

**मधुरा** : ( घड्याळात पाहात अस्वस्थतेनं ) शक्य आहे, तरीपण आज आम्ही जर गडबडीत आहोत, तेव्हा—

**टिल्लू** : गडबड तुम्हाला आहे तशीच मलाही आहे. पण स्त्री पुरुषांच्या सुखी संसाराचं मर्म शोधण्यात तुम्ही प्रचंड चूक केलीत. तुमच्या प्रेमाफीमाला काहीही आधार नाही. ॲनीमल इंन्स्टीक्ट तेवढी खरी. मदन बाधेमुळं नर मादी एकत्र येतात आणि वाघ-शेळी न्यायानं संसारात एकत्र नांदतात. तुम्हाला 'वाघशेळी न्याय,' आमचा नवा सिद्धान्त, ठाऊक आहे की नाही बाईसाहेब ?

**मधुरा** : ( अस्वस्थतेनं ) नाही, पण पुन्हा केव्हातरी सवडीनं—

**टिल्लू** : छे छे, पुन्हा कशाची सवड होणार आहे तुम्हाला व मला ? आताच सांगून टाकतो. नवरा बत्यकोमधे खरे संबंध कोणते असतात ? शिकारी आणि शिकार; भक्षक आणि भक्ष; म्हणजेच वाघ आणि शेळी. लग्नाच्या पहिल्या रात्री, फार फार

तर पुढल्या आठ दिवसातच ठरतं—कोण वाघ आणि कोण शेळी. आणि एकदा ठरलं की हे नातं जन्मभर कायम राहातं. वाघ शेळीला मटकावतो, शेळी वाघाच्या पोटात सुखेनैव राहाते—याला मठ्ठ मूर्ख अडाणी माणसे म्हणतात " सुखी संसार... आदर्श जोडपं...एक दुजे के लिये पतिपत्नी. " पण गंमत बघा. नवरा बायकोपैकी दोघंही वाघ वाघीणच व्हायला बघतात, शेळी व्हायचं दोघंही नाकारतात, तेव्हा काय होतं ? गुर्रर...गुर्रर...ओरखडे, चावे, शिव्यागाळी, हाणामारी, आदळआपट आणि शेवटी धुड्डूऽऽम् ! संसाराचा खेळ खलास, हे रहस्य तुमच्या कादंबरीत आहे का ? नाही मग—

**मधुरा :** तो तुमचा अनुभव असेल पण डॉ. टिल्लू मी आमचं सांगते. इतकी वर्षे आमचा संसार जो सुखाचा चाललाय—

**टिल्लू :** त्याचं कारण मी सांगतो. डोस अमळ कडूझेर आहे. पण तो तुम्हाला गिळावाच लागेल. बाईसाहेब तुमचा संसार सुखाचा चाललाय याचा अर्थ एकच आहे. तुम्ही वाघीण होऊन, लग्न झाल्या झाल्या, नवऱ्याची शेळी करून, त्याला गट्ट करून टाकलाय. अगदी ढेकरसुद्धा दिलाय. तुमचा नवराही असा बहाद्दर की तुमच्या पोटात तो अगदी सुखात गप्पगार होऊन बसलाय.

**मधुरा :** ( भडकून ) डॉ. टिल्लू मला वाटतं आपण मर्यादा सोडून फार बोललात आता आपण गेलात तर बरं होईल.

**टिल्लू :** ( उठत ) जाणार तर आहेच. बसायला इथं वेळ आहे कोणाला ? तुम्ही अंमळ रागावला असलात तरी मला त्याचे सोयरसुतक नाही. तुमच्या अभिनंदना-बरोबर चरचरीत अंजन घालायचाही हेतू होताच आमचा.

**मधुरा :** मला तुमचं अंजनही नकोय आणि अभिनंदनही नकोय.

**टिल्लू :** राहिलंऽ ! तुम्ही भडकलात यातच सगळी गोम आहे. आत्ता कुठं जीवाला अंमळ बरं वाटलं. येतो आता. [ डॉ. टिल्लू " चला हो भिंगारडे " असे पुकारीत जातात. दाराशी सुंदर कधीची येऊन प्रक्षोभानं ऐकत उभी आहे. ती आत येते—]

**सुंदर :** ( रागानं ) चांगलं ठेच ठेच ठेचायला हवं होतंस मेल्याला. मला तर इतका संताप आला होता की पायात छत्री घालून फरशीवर त्याला सपशेल तोंडघशी पाडावा आणि उरले सुटले त्याचे दात—

**मधुरा :** तुला एवढं वाटलं तरी. पण तुझ्या पपांना काही आहे का ? खुशाल आत दडून बायकोची शोभा—

**अनिरुद्ध :** ( कपडे करून बाहेर येत ) दडून काय म्हणून ? मी आत कपडे करीत होतो. उशीर झाला असता तर तिकडून तूच माझी शोभा केली असतीस.

**सुंदर :** तुम्ही बाहेर येऊन का ठणकावलं नाहीत हो पपा त्या टिल्ल्याला ? निर्लज्ज ! लोचट ! बेशरम केला !

**अनिरुद्ध** : त्याचा काही उपयोग नाही सुंदर. हा टिल्लू मूळातच असा तिरपागड आणि अष्टवक्रासारखा वाकडा आहे. वाद आणि भांडण म्हणजे त्याला मेजवानी. विद्यापीठात कोणीही त्याच्या तोंडी लागत नाही.

**मधुरा** : माझं एक जाऊ दे. पण तुमच्याबद्दल तो काय काय बरळला--

**सुंदर** : ममीनं तुमची शेळी केलीय; तुम्हाला गट्ट करून ढेकर दिलाय; तुम्ही तिच्या पोटात गप्पगार होऊन--

**अनिरुद्ध** : ( मिस्कीलपणे ) तेवढ्याबद्दल मी त्याला एक वेळ क्षमा करतो.

**सुंदर** : क्षमाऽऽऽ ?

**अनिरुद्ध** : दुसऱ्या घरात जाऊन इतकं खरं बोलायचं नसतं एवढा पोच नव्हता बिचाऱ्याला.

**मधुरा** : काय, काय, काय ? काय म्हणालात ? पुन्हा बोला पाहू ?

**अनिरुद्ध** : ( कानाची पाळी धरीत ) चुकलो...चुकलो...सपशेल चुकलोऽ ! ए मधू, अगं पायात काय घालू ? चपला की सॅंडल्स ?

**मधुरा** : काय वाट्टेल ते घाला नाहीतर अनवाणी चला. मला काही विचारू नका. मी तुमची शेळी करते, नाही का ?

**अनिरुद्ध** : आता चुकलो म्हणून कबुली दिली नाही का ? तरीसुद्धा—

**सुंदर** : पपा, ममी खरोखरीच फार गरीब आहे, शांत आहे आणि—

**अनिरुद्ध** : एकदम मान्य आहे मला. पण त्या बंगाल्याचं भवितव्य मात्र कठीण दिसतंय मला.

**सुंदर** : ( उसळून ) काऽय ? काय म्हणालात ?

[ तेवढ्यात टेलीफोनची घंटा खणखणते. तशी अनिरुद्ध चटकन हसत रिसीव्हर उचलत–" हॅलो, मी अनिरुद्ध राजपाठक " असं त्यात बोलतात. दरम्यान—]

**मधुरा** : तू चिडू नकोस सुंदर. पपा तुझी चेष्टा करताहेत.

**सुंदर** : ( धुश्शात ) काही सांगू नकोस. तू सुद्धा तसलीच आहेस ममी. प्रत्येक वेळी पपांना अशी पाठीशी घालतेस म्हणून ते—

**अनिरुद्ध** : ( नाकावर बोट ठेवीत ) शूऽऽक ! ईश्वरचंद्र बंदोपाध्याय...( रिसीव्हर-मधे ) हां बोला ईश्वरचंद्रजी. गुड ईव्हीनिंग. ग्लॅड टू मीट यू आफ्टर एजीस... आलात कधी ?...आच्छा ..मुक्काम आहे ना अजून इथं ?...हे काय निघालात ? हं...हं...हं...आत्ताऽ ? छे छे ते कसं शक्य आहे ?...आम्ही समारंभासाठी निघतो आहोत आत्ता...ओ थॅंक्स...हं...हं...पण आत्ता कसं काय जमणार हो ?.. नाही पाच मिनिटं ठीक आहेत पण...हं...हं...हं...

**सुंदर** : ( मनगटावरलं घड्याळ दाखवीत ) पपा निघायची वेळ झालीय.

**अनिरुद्ध :** ( फोनमधे ) हे पाहा, तुम्ही जर या वर्षीच्या हिस्टरी कॉन्फरन्सबद्दल भेटणार असलात तर मी तुम्हाला स्पष्ट सांगतो, मला निवडणुकीच्या साठमारीत शिरायचं नाहीये. माझी युनॅनिमस निवड होत असेल तर मी अध्यक्षपद स्वीकारीन. तुमचे भट्टाचार्य भेटले होते मला त्यावेळी मी–...ते नाही ? मग दुसरं कुठलं एवढं अर्जंट काम काढलंत ईश्वरचंद्रजी ?...थोडी आयडीया तर द्याल ?...फोनवरून सांगण्यासारखं नाहीं ? चमत्काराच आहे...हं...हं...ठीक आहे असं करा (घड्याळात पाहात) तुम्ही ताबडतोब निघा. चेतन बॅनर्जी तुम्हाला घेऊन येताहेत ना ?

**सुंदर :** झालंऽ! आता उशीर होणार ममी.

**अनिरुद्ध :** ( फोनमधे ) पण फक्त पाचच मिनिटं हं...ओ. के. ( फोन टेवीत ) नाऊ लिसन मधू...तुम्ही पुढं गाडी घेऊन पुढं चला. मी पाठोपाठ दहा मिनिटांत स्कूटरवरून येतो.

**सुंदर :** ( चिडून ) पण का म्हणून ? याचा अर्थ काय पपा ?

**अनिरुद्ध :** डोन्ट बी अनरीझनेबल सुंदर. बंदोपाध्यायांचं काही तरी निकडीचं काम दिसतंय. हा उशीर काही मी करीत नाहीये.

**मधुरा :** पण एवढं काय निकडीचं बोलायचंय त्यांना ?

**अनिरुद्ध :** मी त्याचाच विचार करतोय.

**सुंदर :** पपा तुम्ही एकदा का बोलण्यात गुरफटलात की—

**अनिरुद्ध :** सुंदर, साताचं प्लेन गाठायचं आहे ईश्वरचंद्रजींना. माझ्यापेक्षा घाईत आहेत ते. तुम्ही चला आगोदर. मी पाठोपाठ दहा पंधरा मिनीटात येतोच आहे,

**सुंदर :** तुम्ही उशीर केलात तर बघा हं पपा !

**अनिरुद्ध :** सुंदर, अजून पुष्कळ वर्षं मला तुझ्या आईबरोबर या घरात नांदायचंय... गप्पगारपणे.

**मधुरा :** पुरेऽऽ, कळलंऽ !

**अनिरुद्ध :** मधुरा मला वाटतं पायात मी आज कोल्हापुरी वाहाणा—

**मधुरा :** ( जरबेनं ) नाही. सॅंडल्स पॉलीश करून ठेवल्या आहेत मी.

**अनिरुद्ध :** एऽ, सॅंडल्स नको बुवा. पायाला फार चावतात.

**मधुरा :** ( सॅंडल्स आणून देत ) काही चावत नाहीत. या घ्या. आणि सॅंडल्स घालूनच यायला हवं.

**अनिरुद्ध :** हो हो पण. जरा प्रेमानं सांग की ! किती दटावशील ? अशानंच 'बाधीण शेळी' न्यायाला पुरावे मिळतात—डॉ. टिल्लूंना.

**मधुरा :** कळलंऽ, पुरेऽ ! ही कुलूप किल्ली. पुढचं दार नीट लावून घेऊन या.

**अनिरुद्ध :** ( मिस्कीलपणे ) तो बंगाली बातमीदार यायचा आहे का ग आज— समारंभाला ?

**सुंदर :** ( जाता जाता ताडकन् वळून ) काऽय.?

**मधुरा :** काही नाही. तू लक्ष देऊ नकोस त्यांच्याकडं. चल आधी.

[ असे म्हणत, रागानं पपांच्याकडं पाहणाऱ्या सुंदरला जवळ जवळ ओढतच मधुराबाई घेऊन.जातात. क्षणभराने गाडी गेल्याचा आवाज. अनिरुद्ध विचारमग्न. अस्वस्थतेनं येरझरा घालतो. वारंवार घड्याळात बघतो. सिगरेट शिलगावतो. धूम्रवलये सोडतो. तेवढ्यात हॉर्न वाजतो. तशी गडबडीने सिगरेट विझवीत तो बाहेर जातो. क्षणभराने अनिरुद्ध आणि पाठोपाठ साठी ओलांडलेले एक बंगाली गृहस्थ ईश्वरचंद्र बंदोपाध्याय बोलत येतात. बंदोपाध्याय हसऱ्या मुद्रेचे शांत स्वभावाचे आणि मोजके मार्मिक बोलणारे गृहस्थ. आत येता येता अनिरुद्ध त्यांना म्हणत असतो—" माफ करा ईश्वरचंद्रजी, तुम्ही आज पहिल्यांदाच आमच्या घरी येताहात आणि मी तुम्हाला साधा चहासुद्धा विचारू शकत नाही..." तशी— ]

**बंदोपाध्याय :** (खांद्यावर हात ठेवीत) अनिरुद्ध या उपचारांची कांहीसुद्ध आवश्यकता नाही. मी बंगाल प्रांतातला असलो तरी माझी नोकरी महाराष्ट्रातच झालीय. मराठी माणसांचा भरपूर पाहुणचार घेतलाय आजवर मी. अगदी पुणेकरांचासुद्धा. ( हसतात )

**अनिरुद्ध :** चेतन बानर्जी गाडीतच बसून राहिलेत ?

**बंदोपाध्याय :** हो. तो गाडीतच बसू दे. आपल्याला जरा महत्त्वाचं बोलायचंय तेव्हाऽऽ...

**अनिरुद्ध :** ते ठीक आहे. पण तुम्ही बसाल तर खरे.

**बंदोपाध्याय :** ( बसत घड्याळात पाहात ) मी तुम्हाला पाच मिनिटात मोकळं करायचं मान्य केलंय. तेव्हा आता प्रस्तावना न करता सरळ मुद्यालाच हात घालतो. काय ?

**अनिरुद्ध :** ( बसत ) दॅटस् बेटर.

**बंदोपाध्याय :** डॉ. राजपाठक तुमची माझी पहिली भेट कुठं आणि केव्हा झाली होती याची काही आठवण आहे का तुम्हाला ?

**अनिरुद्ध :** हो हो. अगदी स्पष्ट आठवतंय. दहा वर्षांपूर्वी मी कलकत्त्याला आलो होतो, हिस्टरी कॉन्फरन्सचा एक डेलीगेट म्हणून तेव्हा ऽऽ... ओ ! व्हॉट अॅन एक्स्पीरियन्स ! विद्यार्थ्यांच्या दगडफेकीत मी जखमी झालो आणि आठ पंधरा दिवस मला राहावं लागलं नंतर. कोण त्या तुमच्या डॉक्टरबाई—

**बंदोपाध्याय :** डॉक्टर मृणालिनी दासगुप्ता

**अनिरुद्ध :** येस येस करेक्ट ! मृणालिनी दासगुप्ता. शी वॉज ए फॅंटास्टिक लेडी. फार प्रेमळपणे सगळी सेवा केली त्यांनी माझी. आपल्या घरात ठेवून घेतलं यापेक्षा कोण काय जास्त करणार ?

**बंदोपाध्याय :** तुमच्या अजून लक्षात आहे मृणालिनी ?

**अनिरुद्ध :** म्हणजे काय ? थोडे दिवसच मी तिथं राहिलो होतो तरी आम्ही अगदी गाढ मित्र झालो होतो परस्परांचे. पुढं काही वर्षे पत्रव्यवहारही होता आमचा. भेट मात्र अजून झाली नाहीये पुन्हा. मृणालिनीशी बोलणं म्हणजे बौद्धिक मेजवानी होती. मला वाटतं त्या कम्युनिस्ट विचाराच्या होत्या, नाही का ?

**बंदोपाध्याय :** ती नक्षलाइट होती.

**अनिरुद्ध :** ओ, आय सी ! दॅट्स व्हाय शी वॉज सो अन्कन्व्हेन्शनल. आजच्या भाषेत म्हणजे एकदम बिनधास्त तरुणी होती मृणालिनी. हल्ली कुठं असते ती ? काय करते ? तिचं लग्न झालं असावं एव्हाना. मधल्या काळात आमचे कॉन्टॅक्टस नव्हते म्हणून—

**बंदोपाध्याय :** मला ठाऊक आहे ते. टू कम् टू द पॉईंट डॉ. राजपाठक, ही मृणाल दोन महिन्यापूर्वी वारली. एका कार ॲक्सीडेंटमधे.

**अनिरुद्ध :** अरेरे...खरंच म्हणता ? हूंऽऽ दॅटस दॅट. वाईट झालं. आता कोण कोण आहे त्यांच्या मागं ?

**बंदोपाध्याय :** फक्त तिचा एक मुलगा. सत्यजीत. दहा वर्षांचा.

**अनिरुद्ध :** रिअली ? मृणालिनीचा नवरा किंवा नवऱ्याकडेचे कोणी—

**बंदोपाध्याय :** मृणालिनीनं लग्न केलं नव्हतं डॉक्टर राजपाठक.

**अनिरुद्ध :** आंऽ लग्न केलं नव्हतं ? मग मुलगाऽऽऽ...? कोणी तरी तिचा गैरफायदा घेऊन तिला फसवलं वाटतं ?

**बंदोपाध्याय :** तसंच काही नाही. तिनं जाणून बुजून पत्करला होता हा मार्ग

**अनिरुद्ध :** आय सीऽ ! लग्नसंस्था त्यावेळीसुद्धा त्यांना मंजूर नव्हती. मला आमच्या चर्चा अंधुक आठवताहेत. पण एखाद्या चर्चेत हिरीरीनं मत मांडणं निराळं आणि—( थबकतो )

**बंदोपाध्याय :** जे मत कृतीत आणता येणार नाही ते मृणालिनी कधीच बोलून दाखवीत नसे. ती फार जगावेगळी मुलगी होती अनिरुद्ध.

**अनिरुद्ध :** हो. आता ते मानायलाच हवं.

**बंदोपाध्याय :** लग्नाचा विषय निघाला तेव्हा तिनं तिच्या आईवडिलांना आणि मलाही स्वच्छ सांगून टाकलं होतं. मी लग्न करणार नाही. पण मूल होण्याचा माझा हक्क मी सोडणार नाही आणि माझ्या मुलाच्या बापाची निवडही मीच करणार. हे दोन्ही हक्क तिनं बजावले होते.

**अनिरुद्ध :** पण मग आपल्या समाजात फार त्रास झाला असेल तिला, नाही ?

**बंदोपाध्याय :** ती नक्षलाइट होती अनिरुद्ध. गळ्यात स्टेथॉस्कोप आणि हातात पिस्तूल...मग कोण तिच्या वाटेला जाणार ? पण तोही प्रश्न नव्हता. डॉक्टर म्हणून

ती फार लोकप्रिय होती. लोक अगदी भक्त झाले होते तिचे.

**अनिरुद्ध :** आय नो...आय नो...सेवाशुश्रूषेत तिचा हात धरणारा नव्हता कोणी. पण आता तिच्या माघारी, मुलाची नाही म्हटलं तरी परवडच होणार.

**बंदोपाध्याय :** सत्यजीतच्या नावानं तिनं भरपूर पैसे ठेवले आहेत.

**अनिरुद्ध :** तेवढं तरी एक बरंय.

**बंदोपाध्याय :** सगळ्या गोष्टी पैशानं मिळत नाहीत डॉक्टर राजपाठक. उदाहरणार्थ आई बापांची माया आणि त्यांचं संगोपन.

**अनिरुद्ध :** येस येस...खरंय. बिचाऱ्याची आई तर गेली पण बाप असेल की?

**बंदोपाध्याय :** हो आहे. चांगला सुस्थितीत आहे.

**अनिरुद्ध :** मग ब्रिंग हिम टू बुक्स. त्याला आपली जबाबदारी उचलायला लावा. नाऊ ही कान्ट रन अवे.

**बंदोपाध्याय :** प्रिसाइजली, मी त्यासाठीच इथं आलोय.

**अनिरुद्ध :** गुड गॉड! तो माणूस याच गावात राहतोय की काय?

**बंदोपाध्याय :** याच गावात राहातो असं नव्हे तर या घरात राहातोय.

**अनिरुद्ध :** (गडबडून) क...क...काय काय काय म्हणालात? या या घरात?... म . म...म...मी मी...माझा काय संबंध?...त...त...प...प...

**बंदोपाध्याय :** शांत व्हा डॉ. राजपाठक. टेक इट ईझी. मृणाल मला मुलीसारखी होती. तिच्या आयुष्यातली प्रत्येक घटना मला ठाऊक आहे. दहा वर्षांपूर्वी तुम्ही तिच्या घरी राहिला होता त्या वेळी तुमचे आणि तिचे खूप जवळचे संबंध—

**अनिरुद्ध :** छे छेऽ...म...म...मैत्री...केवळ फ्रेंडशिप...उगीच काहीतरी काय बोलताय? म...मी...मी काय लफडेबाज माणूस नाहीये...म...म...मी एक सभ्य सद्गृहस्थ...उगीच काय काहीतरी बोलताय?...त...त...तुम्ही काय मला ब्लॅकमेलींग करू पाहाताय?...म...म...माझा काही एक हे नाहीये...संबंध नाहीये...उगाच कोणाचं तरी हे...हे म्हणजे घोंगडं माझ्या गळ्यात अडकवताय म्हणजे काय...असा गलिच्छ अरोप करताय...काय पुरावा आहे तुमच्याजवळ? ...आणि...आणि...म्हणजे...म्हणजे(भेदरून घाम पुसू लागतो, तशी—)

**बंदोपाध्याय :** (हसून) अरे राम राम! किती घाबरलात...किती घामाघूम झालात ...किती भेदरून तिरपीट उडालीय तुमची...रीलॅक्स माय फ्रेंड, शांत व्हा डॉ. राजपाठक. जरा पाणी प्या. [अनिरुद्ध घाईनं पाणी ढोसतो] सावकाश... सिगरेट ओढा एक...[अनिरुद्ध सिगरेट शिलगावून भकाभका धूर सोडतो ठसका लागतो तशी—] ईझी...ईझी...मी तुम्हाला बचन देतोय अनिरुद्ध, तुम्ही एवढं घाबरून जाण्यासारखं काही नाहीये. मी तुम्हाला ब्लॅक मेल करीत नाहीये की कोणाचं तरी घोंगडं तुमच्या गळ्यात अडकवीत नाहीये. घोंगडं तुमचंच आहे पण

तुम्हाला ते नको असलं तर तुमच्या इच्छेविरुद्ध कोणी ते तुमच्यावर लादणार नाहीये. प्रश्न अगदी साधा आहे. तुम्हाला मुलगा नाही. आणि तुमच्यासारखा बाप हयात असताना एवढ्या गोड मुलावर पोरक्यासारखं राहायची पाळी येऊ नये, तुम्हालाही ते आवडणार नाही, असं मला वाटलं म्हणून मी इथं आलो.

**अनिरुद्ध :** प...पण तो म...म...माझाच मुलगा कशावरून ?

**बंदोपाध्याय :** लुक! डॉ. राजपाठक दहावर्षांपूर्वी तुम्ही कलकत्त्याला असताना मृणालचा आणि तुमचा शरीरसंबंध आला होता हे तुम्ही नाकारू शकता काय ? सरळ सरळ उत्तर द्या.

**अनिरुद्ध :** ( ताडकन् ) हो. मी नाकारतो. माझा मुळीच संबंध आला नव्हता.

**बंदोपाध्याय :** नीट आठवून सांगा. तुम्हाला तपशीलवार माहिती हवीय ?

**अनिरुद्ध :** ( गडबडून ) न...नको नको. तसं म्हणजे मी अगदीच नाकारीत नाहीये. चुकून...चूकून घडलं असेल काही...पण एकदाच . तेही मला वाटतं झोपेत... एकदाच म्हणजे तसं आणखी काही वेळासुद्धा असेल...झोपेतलं काय सांगता येतंय ? नाही पण तरीसुद्धा मी म्हणतो, त्या मुलाचा बाप मीच कशावरून ?

**बंदोपाध्याय :** काय म्हणालात ?

**अनिरुद्ध :** नाही म्हणजे, 'मदर इज अ सर्टंटी बट फादर इज ॲन ॲक्सीडेंट' असं डॉ. टिल्लू म्हणतात—हा मुलगा माझ्यापासूनच झालाय हे कोण सांगू शकेल ?

**बंदोपाध्याय :** मुलाची आई सांगू शकते. मुलाचा चेहरा मोहराही सांगू शकतो. सत्यजीतचा हा फोटो जरा नजरेखाली घाला. ( खिशातून फोटोचे पाकीट काढून देत ) मृणालिनी बंडखोर जरूर होती. डॉ. राजपाठक, पण ती गदळ चारित्र्याची उठवळ बाई नव्हती, मुलाची जबाबदारी वाटल्यास तुम्ही घेऊ नका पण तिच्यावर घाणेरडे आरोप तरी करू नका.

**अनिरुद्ध :** ( फोटो पाहून पार कोकरू होत, घाबऱ्या घाबऱ्या फोटो खिशात घालीत ) छ छे ..नाही नाही हो...मी आरोप बिरोप काही एक करत नाहीये. तशी ती थोर भाऊलीच होती. म...म. माझं चुकलं असेल म...मी नाही कुठं म्हणतोय ? प...पण चूक तिचीसुद्धा नव्हती का ?

**बंदोपाध्याय :** डॉ. राजापाठक, चूक तिची नव्हती आणि तुमचीही नव्हती. तिनं अगदी विचारपूर्वक हा बेत ठरवला होता आणि पद्धतशीर आखून पार पाडला होता.

**अनिरुद्ध :** ( थक्क होत ) क...क...काय म्हणता काय ईश्वरचंद्रजी ?

**बंदोपाध्याय :** होय. मृणाल आता नाहीये. तेव्हा तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाहीये. कलकत्त्याला कॉन्फरन्समधे पहिल्याच दिवशी तुमची आणि मृणालीची ओळख झाली. त्या संध्याकाळीच ती मला भेटली आणि म्हणाली—"ईश्वरदा माझ्या भावी मुलाचा बाप सापडला."

**अनिरुद्ध :** माय गुडनेस ! असं सरळ म्हणाली ती ?

**बंदोपाध्याय :** हो. त्यानंतर पुढं जे काही घडलं तो सगळा तिच्या योजनेचाच भाग होता. तिच्या प्लॅनींगमधे चूक घडायची शक्यताच नव्हती.

**अनिरुद्ध :** अरे बापरे म्हणजे...म्हणजे...विद्यार्थ्यांची ती दगडफेक सुद्धा...

**बंदोपाध्याय :** ते विद्यार्थी नव्हते. तिचे नक्षलाइट सहकारी होते. तिच्या आज्ञेप्रमाणं त्यांनी तुम्हाला मामुली जखमी करून तिच्या घरी आणून सोडलं.

**अनिरुद्ध :** म्हणजे ? मी समजलो नाही ईश्वरदा ?

**बंदोपाध्याय :** त्यात न समजण्यासरखं काही नाहीये. तुम्ही जखमी झाला नसता तर तिच्या घरी आठदहा दिवस बिनबोभाट कसे राहिला असता ? तिच्या हेतूपूर्तीसाठी त्याची गरजच होती.

**अनिरुद्ध :** तोबा तोबा ! म्हणजे पुढंसुद्धा जे जे घडलं ते ते सगळं---

**बंदोपाध्याय :** तिच्या योजनेचाच भाग होता.

**अनिरुद्ध :** आणि त्यासाठी माझ्या संमतीची काही गरज वाटली नाही तिला ?

**बंदोपाध्याय :** नाही. मृणाल नेहमी म्हणत असे की पुरुषाची संमती असतेच; प्रश्न काय तो स्त्रीच्या इच्छेचा असतो. स्त्री संगासाठी सगळे पुरुष सतत संधी शोधतच असतात. फक्त ती त्यांना चोरूनमारून हवी असते.

**अनिरुद्ध :** सगळेच पुरुष काही एवढे लंपट उल्लू नसतात. काही थोडे तरी---

**बंदोपाध्याय :** तोही प्रश्न नव्हता. त्या काही थोड्यात काही तुम्ही येत नाही. तुम्ही तर कसलाही विचार न करता तिला पहिल्याच रात्री वश झालात. जखमी असतानासुद्धा...खरंय ना ?

**अनिरुद्ध :** खरंय. ते अमळ चुकलंच माझं.

**बंदोपाध्याय :** चूक वगैरे काही नाही. तिला मूल हवं होतं. तुमच्यापासून हवं होतं. तिनं ते मिळवलं. तुम्ही निसर्गदत्त कार्य केलंत तेव्हा त्यानंतर तिच्या हिशेबी तुमची गरज संपली. मृणालचा अपघाती मृत्यू झाला नसता तर ही गोष्ट तुमच्यापर्यंत आलीसुद्धा नसती.

**अनिरुद्ध :** ते सगळं झालं; होऊन गेलं. पण आता मी काय करू शकतो ?

**बंदोपाध्याय :** सत्यजीतला होस्टेलमध्ये ठेवायचं ठरवलंय. फक्त त्याला घर असावं, बाप म्हणून तुमची माया मिळावी, एवढ्यासाठीच मी सुचवतोय की काही दिवस तरी--

**अनिरुद्ध :** छे छे छे छे...नाही, नाही, नाही, नाही, नाऽही ! मला काही एक करता येणार नाही. तिचं एक चांगलं होतं. गळ्यात मंगळसूत्र नव्हतं पण हातात पिस्तूल होतं. मी एक निःशस्त्र नवरा; तोही एका कडव्या जलाल स्त्रीच्या संसारात रुतलेला ...अगदी गळ्यापर्यंत. आमच्या घरापर्यंत ही बातमी जाण्याचाच काय तो अवकाश...बाप रेऽऽ...आय कान्ट इमॅजीन...माझी बायको मला येता जाता

फाडफाडून खाईल...लचके लचके तोडील...माझी मुलगी मला उभी जाळून टाकील...माझं तोंड बघणार नाहीत पुन्हा दोघी. पार देशोधडीला लागेन मी... छे छे छे ईश्वरदा, त्या मुलाला या घरात आणायची किंवा त्याला भेटायची वातच सोडून द्या. ते काय ते तुमचं तुम्ही बघून घ्या. मला त्यात नखाएवढंसुद्धा कुठं गुंतवू नका. काय पैसा अडका लागेल तो एक वेळ मी देईन. तेही खरं नाही. मी काही श्रीमंत माणूस नाही आणि पैशाचा व्यवहार तरी माझ्या हातात कुठाय? सगळं महिला साम्राज्य आहे या गुहेत. तरी पण कर्ज काढून मी हप्त्यानं भरपाई करीन मी तुमची. करायलाच हवी. नको तो गाढवपणा केला. आता पदराला बसेल ती चाट—

**बंदोपाध्याय :** पुन्हा सांगतो डॉ. राजपाठक हा पैशाचा प्रश्न नाहीये. मला वाटतं तुम्ही तुमच्या पत्नीला नीट समजावून सांगितलं तर—

**अनिरुद्ध :** फाशी...नथींग शॉर्ट ऑफ दॅट. आय ॲम नॉट जोकींग. ती मला कधी कधी क्षमा करणार नाही. छे छे तिला सांगायची मला छातीच होणार नाही कधी.

**बंदोपाध्याय :** वाटल्यास तुम्ही थोडा वेळ घ्या. चार दिवस विचार करा.

**अनिरुद्ध :** आणि काय करू? माझ्याकडून काही होणार नाही. मी अगदी हेल्पलेस आहे ईश्वरचंद्रजी. मला माफ करा. वाटल्यास पायातलं काढून टाळकं संडका माझं मी त्याच लायकीचा गाढवपणा करून बसलोय. पाया पडतो तुमच्या पण माझा असा कडेलोट करू नका. त्या पोराला काही मदत व्हायची राहील दूरच. फुकाफुकी माझा सगळा संसार मात्र उधळून जाईल.

**बंदोपाध्याय :** मग काय करायचं?

**अनिरुद्ध :** काही नाही. हे सगळं विसरून जायचं तुम्ही. त्या मुलाबद्दल काय मार्ग काढायचा ते तुमचं तुम्ही पाहा आणि ठरवा. मला त्यात एवढंसुद्धा कुठं गुंतवू नका.

**बंदोपाध्याय :** ठीक आहे. काय समजायचं ते समजलो मी. येतो मी.

**अनिरुद्ध :** पण मग याचं काय करायचं ठरवता?

**बंदोपाध्याय :** त्याची आता तुम्हाला कशाला हवी नसती उठाठेव?

**अनिरुद्ध :** (ओशाळगत) नाही म्हणजेऽऽ...तुमचंही खरंच आहे. बराय मग नमस्ते.

[ बंदोपाध्याय जातात अनिरुद्ध घाम पुसतो. पाणी पितो. मग सिगरेट शिलगावतो. भका भका ओढतो. इतक्यात काही एक विचार सुचून तो पुन्हा प्रचंड गडबडतो. "अहो ते आपले हे ऽऽ" असे हाकारत बाहेर धावू लागतो. पण ईश्वरचंद्रजी तिथेच दार उघडताच बाजूला उभे असतात ते पुढे येतात तशी—]

हे काय? तुम्ही इथंच आहात?

**बंदोपाध्याय :** तुम्ही मला पुन्हा हाक माराल असा अंदाज होताच माझा. किती झालं तरी तुम्ही एक सभ्य गृहस्थ आहात आणि आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा असं--

**अनिरुद्ध :** माझी सभ्यता गेली खड्डयात आणि गृहस्थाला लागली आग. मला आधी हे सांगा, हे हे हे सगळं त्या चेतन बानर्जीला ठाऊक आहे का ? तुमच्या वहिणीचा मुलगा आहे तो म्हणून विचारतो.

**बंदोपाध्याय :** बहुधा नसेल. पण त्याला मृणालिनी आणि तुमचा मुलगा सत्यजीत--

**अनिरुद्ध :** ( उसळून ) माझा मुलगा असं मोठ्यानं बोंबलू नका हो. भिंतीला कान असतात.

**बंदोपाध्याय :** मृणाल आणि सत्यजीत या दोघांना चेतन आज वरीच वर्षं ओळखतोय.

**अनिरुद्ध :** तरी पण त्याला माझं नाव ठाऊक नसावं, नाही का ? म्हणजे सत्याजीतचा मी तो आपला ' हा ' म्हणून ?

**बंदोपाध्याय :** काही कल्पना नाही. पण नसावं. अजून तरी.

**अनिरुद्ध :** नसणारच. नाहीतर तो आमच्या गजघंटेजवळ बोलला असता की ?

**बंदोपाध्याय :** कोण गजघंटा ? तुमच्या पत्नी ?

**अनिरुद्ध :** नव्हे होऽऽ, माझी मुलगी सुंदर. चेतनची मैत्रीण आहे ती. तिला समजलं की संपलंच. सगळा खेळ खलास.

**बंदोपाध्याय :** चेतनला तुमचं हे प्रकरण ठाऊक नसावं पण त्याच्या आईला म्हणजे माझ्या वहिणीला सगळं ठाऊक आहे.

**अनिरुद्ध :** सगळं म्हणजे अगदी मुळापासून सगळं सगळं ? पार सगळं ?

**बंदोपाध्याय :** हो. मृणालच्या बाळंतपणात तिनंच मदत केली होती मृणालला.

**अनिरुद्ध :** हूंऽऽ. . .कठीण आहे. तरी पण त्या आपल्या मुलाजवळ या प्रकरणाबद्दल काही बोलण्याची शक्यता आहे का ?

**बंदोपाध्याय :** काही सांगता येत नाही. चान्सेस आर फिफ्टी फिफ्टी.

**अनिरुद्ध :** पण समजा, तुम्ही तुमच्या भगिनींना माझ्या वतीनं रिक्वेस्ट केलीत... म्हणजे ' हे हे कुठं कोणाजवळ काही बोलू नका '--तर ?

**बंदोपाध्याय :** तर ती तावडतोब सांगणार. चेतनला तर सांगणारच पण तुमच्या घरी येऊन ओळख काढून तुमच्या मिसेसना सांगणार. असला चमत्कारिक स्वभाव आहे तिचा.

**अनिरुद्ध :** म्हणजे मी मेलो. नाही का ? इट्स क्वेश्चन ऑफ टाईम. पण हा टाइमबॉंब आज ना उद्या केव्हातरी फुटणार. हूंऽऽऽ !

**बंदोपाध्याय :** म्हणून म्हणतो अनिरुद्ध तुम्ही लवकरात लवकर आपण होऊन वायकोला सगळं सांगून टाका. तेवढाच स्फोट सौम्य होईल.

**अनिरुद्ध** : ( केविलवाणेपणानं ) असं खरंच वाटतं तुम्हाला ईश्वरदा ?

**बंदोपाध्याय** : नक्कीच. एक लक्षात घ्या. तुमची बायको लेखिका आहे. त्यांची समजून घेण्याची शक्ती मोठी असणार. तुम्ही थोडंसं टॅक्टफुली सांगितलंत तर त्या मुलाला ठेवून घ्यायलासुद्धा तयार होतील.

**अनिरुद्ध** : छे छे, शक्यच नाही. ती लेखिका, कलावंत, कादंबरीकार काहीही असली तरी हाडाची पहिल्यांदा ती बायको आहे. अगदी कडक कडवी बायको आहे. मी तिला चांगला ओळखून आहे. ईश्वरदा, हा स्फोट एवढा सौम्य असणार नाही. मला माझं भवितव्य अगदी काळंकुट्ट दिसतंय.

**बंदोपाध्याय** : मला वाटतं तुम्ही जरा जास्तच काळं करून दाखवताय. शेवटी स्त्री-हृदयाला पाझर फुटेलच. प्रथम त्या रागावतील, रडतील, रुसतील, आदळआपट करतील, पण कालान्तरानं —

**अनिरुद्ध** : नाही नाही ईश्वरदा, आमच्या घरातलं प्रकरण अगदी एक्स्ट्रॉ स्ट्रॉंग आहे. चारचौघांच्या घरातल्यासारखं लिबलिबीत आणि भुसभुशीत नाहीये. एकदम कडक काळा पथ्थर आहे पथ्थर. खरं म्हणजे हे ठाऊक असून मी या फंदात पडायलाच नको होतं.

**बंदोपाध्याय** : पण तुमचा काय इलाज होता त्यावेळी ? ठरल्याप्रमाणं तुमच्यासाठी खणून ठेवलेल्या खड्ड्यात तुम्ही नेमके कोसळलात.

**अनिरुद्ध** : मला वाटतं मी ठार पागलच झालो होतो त्या वेळी.

**बंदोपाध्याय** : अहो स्त्री आणि पुरुष ही दोन ज्वालाग्राही रसायनं जवळ आली की भडका उडणारच इतकं साधं सरळ समीकरण आहे हे. ‘ कामाला ’ आपल्याकडं ‘ अग्नी ’ म्हटलंय ते काय उगीच ! जे घडलं ते नैसर्गिक होतं, स्वाभाविक होतं आणि अपरिहार्य होतं.

**अनिरुद्ध** : हे तुम्हाला आणि मला कळतं आणि समजून घेता येतं. झालं गेलं विसरता सुद्धा येतं. पण आमच्या बायकोचं तसं नाही. तिची खोपडीच उलटी आहे. तिला हे जन्मात कधी कळणार नाही आणि समजून घेता येणार नाही. विसरण्याची तर बातच सोडा. तिचं मन म्हणजे दगडी शिलालेख ! एकदा कोरलं की कायम वज्रलेप. तुम्हाला कल्पना येणार नाही इतकी ती माथेफिरू आणि मत्सरी आहे. अगदी ऊग्र जंगली वाघीणच समजा.

**बंदोपाध्याय** : तुमची बायकोच म्हणू नका अनिरुद्ध. सगळ्याच बायका तशाच असतात. पुढं हळूहळू त्या माणसाळतात.

**अनिरुद्ध** : सगळ्या म्हणू नका. आमच्या घरातलं प्रकरण भयंकर, अगदी फेरोशस आहे. [ तेवढ्यात फोन खणखणतो तशी– ]

**बंदोपाध्याय** : ठीक आहे. तुम्हाला •उशीर झाला. येतो मी आता. पण शक्य

तितक्या लवकर—

**अनिरुद्ध :** आज रात्रीच सुरुंगाची वात पेटवतो. पुढं होईल ते होईल.

**बंदोपाध्याय :** मला ट्रंककॉल करून कळवा काय होतंय ते.

**अनिरुद्ध :** हो. जगलो वाचलो आणि घरात टिकलो तर कळवतो.

[ "डोन्ट यू वरी" असे त्याच्या खांद्यावर थोपटत म्हणत बंदोपाध्याय निघून जातात. अनिरुद्ध अस्वस्थतेनं घाम पुसत, गडबडीनं सिगरेट विझवीत फोनकडं जातो. बावचळून रिसीव्हर उलटा धरीत थरथरत ओरडतो—

"हॅलो हॅलो...म...म...म...मी सुरूंग..." रिसीव्हर सुलटा करीत "नो नो मी अनिरुद्ध..." त्याच वेळी अंधार. ]

**प्रवेश पहिला संपला**

# पूर्वार्ध

## प्रवेश दुसरा

[ त्याच दिवशी मध्यरात्रीची वेळ. तोच हॉल. या बंगल्यावरली पार्टी संपून सगळी पाहुणेमंडळी घरोघर गेली आहेत. प्लेयरवर 'मालवून टाक दीप' ही लताची रेकॉर्ड अगदी हलक्या आवाजात लागलेली आहे. अनिरुद्ध हॉलमधे सिगरेट ओढत येरझारा घालताहेत. गण्याकडे त्यांचे लक्ष नसावे. मुद्रा तंग. हातांची हालचाल अस्वस्थ. मनातले मुद्रेवर उमटू नये यासाठी अशा प्रसंगी माणूस जे जे चाळे उगाचच करीत राहातो ते अनिरुद्ध करीत आहेत. एवढ्यात स्वयंपाकघरातली सगळी झाकापाक आवाराअवर आटोपून मधुरा बाहेर येते. आता पोशाखही बदललेला आहे. अनिरुद्ध मात्र अजून शर्ट पँटमधेच आहे. त्याला न्याहाळत—]

**मधुरा :** हे काय ? तुम्ही अजून कपडे बदलले नाहीत ?

**अनिरुद्ध :** ( दचकून पाहात ) ऊंऽ ?...हूंऽ ! बदलू सावकाश. काय घाई आहे ?

**मधुरा :** ( प्लेयर बंद करीत जिन्यापाशी जात ओरडून ) सुंदर...अगं मुलीऽऽ. झोपली वाटतं ही बयाबाई...

**अनिरुद्ध :** झोपली असली तर झोपू दे. तिलाही खूप श्रम झालेत आज. काही काम आहे का तिच्याकडं?

**मधुरा :** माझा काहीएक कामाचा खोळंबा झालेला नाही. सकाळी बॅडमिंग्टन खेळायला जाणार आहेस का विचारायचं होतं.

**अनिरुद्ध :** लवकर जागी झाली तर जाईल.

**मधुरा :** हो. नाहीतर 'मला उठवलं का नाहीस' म्हणून आईला शिव्या घालील. तुम्ही नेहमी घालता तशा. ( मंद हसते )

**अनिरुद्ध :** ऊं ?...हूंऽऽ! ( आपल्याच तंद्रीत ) शिव्या घालायचं काही कारण नाही टू अर इज ह्यूमन बट टू फरगिव्ह इज डिव्हाईन...

**मधुरा :** ( चक्रावून ) तुम्ही कशाबद्दल काय बोलताय?

**अनिरुद्ध :** ( दचकून ) छे छे...तसं काही नाही. पण आजची पार्टी अगदी मस्त झाली, नाही? सगळे स्तुती करीत होते तुझ्या पाककौशल्याची. पदार्थही सगळे असे चविष्ट झाले होते म्हणतेस!

**मधुरा :** काय एकेक जण बिर्याणीवर तुटून पडले होते म्हणता.

[ पिशवीतून विणायचा स्वेटर सुया काढून कोचावर बसत टाके मोजू लागते. ]

**अनिरुद्ध :** मुख्य म्हणजे बोलावल्याप्रमाणं सगळे लोक आले.

**मधुरा :** बोलावल्यापेक्षा जास्त लोक आले होते. ॲडव्होकेट रायसिंघानींना तुम्ही बोलावलं होतं का?

**अनिरुद्ध :** बोलावलं असं नव्हतं. छाब्रासाहेबांच्या बरोबर ते आले होते. ( थबकून झुरका घेत ) चेतनाला सुंदरनं बोलावलं होतं वाटतं.

**मधुरा :** असेल. त्याची आईसुद्धा आली होती. माझी ओळख करून घ्यायची होती, म्हणाली.

**अनिरुद्ध :** ते पाहिलं मी पण...म्हणजे तुला बाजूला व्हरांड्यात नेऊन, एवढं काय खाजगी बोलत होती तुझ्याशी ही बाई?

**मधुरा :** इश्श खाजगी काही नाही. माझ्या कादंबरीबद्दल विचारीत होती ती.

**अनिरुद्ध :** कादंबरीबद्दलच ना...मग ठीक आहे. मला वाटलं–( थबकतात ).

**मधुरा :** ( वर पाहात ) काय वाटलं?

**अनिरुद्ध :** काही विशेष नाही. मुख्य म्हणजे आजच्या पार्टीत ड्रिंक्स अगदी बेतात झाली. नाही का?

**मधुरा :** हो ना...म्हणून तर सगळी माणसं व्यवस्थित आणि वेळेवर जेवली आणि सुखरूप घरी गेली. (एकदम आठवून) पण काय हो, हा काय प्रकार केलात तुम्ही?

**अनिरुद्ध :** ( घाबरून ) क...क...काय काय झालं?

**मधुरा :** तुम्हाला आवडते म्हणून मी स्कॉचची बाटली आणवली होती मुद्दाम. तुम्ही

तर थेंबालासुद्धा स्पर्श केला नाहीत.

**अनिरुद्ध** : हां हां...ते म्हणतेस होय! त्याचं काय आहे, तुझी एक नेहमीची तक्रार असते, नाही का माझ्याबद्दल? एकदा मी घ्यायला सुरुवात केली की थांबता थांबत नाही. माझा बॅलन्स जातो आणि—

**मधुरा** : मग खोटं होतं का ते?

**अनिरुद्ध** : नाही नाही...खोटं कसं असेल? पण म्हणूनच ठरवलं की एका थेंबाला-सुद्धा आज स्पर्श करायचा नाही. माझा स्वतःवर किती संयम आहे ते मला तुला एकदा दाखवायचं होतं. 'नाही' म्हणजे 'नाही'.

**मधुरा** : त्याला ही आजचीच वेळ सापडली वाटतं तुम्हाला?

**अनिरुद्ध** : कधी कधी असले मोह निपटून काढण्यात एक नैतिक विजय असतो. माणसाचा एकदम आत्मविश्वास वाढतो. काय?

**मधुरा** : पण सिगरेटी किती ओढत होता त्याची काही मोजदाद? संध्याकाळपासून विसाची दोन पाकिटं तर तुम्ही एकल्यानंच फस्त केलीत. तो ॲश ट्रे बघा एकदा.

**अनिरुद्ध** : आपल्या लग्नाच्या वाढदिवसापासून तेही साफ बंद करायचं ठरवलंय मी.

[ क्षणमात्र स्तब्धता. मधुरा टाके मोजू लागते. त्याच वेळी मुख्य विषयाला कसा प्रारंभ करावा या विचारात अनिरुद्ध चमत्कारिक चाळे करू लागतो. नुक्ती पेटवलेली सिगरेट ॲश ट्रेमधे विझवून नवी सिगरेट शिलगावू लागतो. तशी ते लक्षात येऊन— ]

**मधुरा** : इश्श हा काय विनोद केलात तुम्ही? ( सिगरेट ॲश ट्रेमधून काढून दाखवीत ) ही का टाकलीत?

**अनिरुद्ध** : ( दचकून ) ऊंऽ? असं झालं का? त...त...ती खराब होती जरा.

**मधुरा** : तुम्ही आज संध्याकाळपासून अपसेट आहात. काही विशेष घडलंय का?

**अनिरुद्ध** : ( गडबडून ) म...म...मी मीऽ? अपसेट? छे छे कुठं काय? मी मी जरा आपलं हे...म्हणजे 'एक्साईट' झालोय. म्हणजे...तुला बक्षीस मिळालंय ना. त्याचा मला भयंकर आनंद झालाय...अगदी तुला कुठं ठेवू न् कुठं नको असं झालंय मला...

**मधुरा** : चला—काहीतरी बोलू नका. जरा स्वस्थ बसा आणि रीलॅक्स व्हा. बसा म्हणते ना—

**अनिरुद्ध** : ( तिच्यासमोर मटकन् बसत ) बसतो ना! (क्षणार्ध अस्वस्थ चाळे करीत) तुझी हरकत नसेल तऽर...म्हणजे तुझी परवानगी असेल तरच हो...नाहीतर तू म्हणशील...( आवंढा गिळतो )

**मधुरा** : हो, पण कशाबद्दल?

**अनिरुद्ध** : मी आत्ता एखादा स्कॉचचा पेग् घेतला तर चालेल?

**मधुरा :** इश्श घ्या की. त्यात हरकत कसली नि परवानगी कशासाठी ?

**अनिरुद्ध :** नाही नाही... आपलं ' हे ' म्हणून नाही. म्हणजे तल्लफ आलीय म्हणून नाही. केवळ औषध म्हणून... म्हणजे तेवढंच जरा उत्तेजक... म्हणजे किंचित — थोडंसं स्टीम्यूलंट म्हणून—

**मधुरा :** पण घ्या की ? एवढा खुलासा कशाला करताय ? वॉर्डरोबमधे बाटली ठेवलीय. मी आणून देऊ का ?

**अनिरुद्ध :** नको नको तू मुळीच उठू नकोस. एवढ्या तेवढ्यासाठी बायकोला राबवणं मला आवडत नाही. त्यातून आज तुला फारच श्रम पडलेत. आलोच मी—

[ लगबगीने आत पळतो. हातातलं काम थांबवून मधुरा क्षणमात्र विचारमग्न होऊन पाहातच राहते. क्षणभराने अनिरुद्ध ' हाऽऽ ' करून निःश्वास टाकीत रुमालानं तोंड पुसत परत येतो. तशी त्याला पाहात—]

**मधुरा :** हे काय ? सोडा पाणी न घालताच व्हिस्की घेतलीत ?

**अनिरुद्ध :** ( सिगरेट शिलगावीत बसत ) हां. जरा स्ट्रॉंग डोस हवाच होता.

**मधुरा :** म्हणून काय एकदम गल्प केलीत ? तुमचं काहीतरी बिनसलंय आज. काय हो, आज संध्याकाळी बंदोपाध्यायांचं आणि तुमचं एवढं काय बोलणं झालं ?

**अनिरुद्ध :** ( झुरका घेऊन धूर सोडत ) तसं विशेष काही नाही.

**मधुरा :** तरी पण ?

**अनिरुद्ध :** तरीपण म्हणजे, बंदोपाध्याय म्हणत होते मला, की तुमचा संसार अगदी दृष्ट लागण्यासारखा आहे. नाही म्हणायला, तुम्हाला फक्त एक मुलगा असायला हवा होता, म्हणजे—

**मधुरा :** हे एवढंच सांगण्यासाठी तुम्हाला घरी थांबवून घाईघाईनं भेटायला आले होते बंदोपाध्याय ?

**अनिरुद्ध :** तसं नाही गं. इतरही बोलत होते. पण त्यात हेही बोलले.

**मधुरा :** ( क्षणभर थबकून ) मुलगा असता तर काय आम्हाला नको होता ? आपल्या हातच्या गोष्टी थोड्याच आहेत या ?

**अनिरुद्ध :** बरोब्बर. मी अगदी हेच म्हटलं त्यांना. तर ते म्हणाले तसं काय, इच्छा असली तर एखादा मुलगा दत्तक घेता येईल तुम्हाला.

**मधुरा :** दत्तक ? काहीतरीच काय ? एवढी इस्टेट वाया नाही चालली तुमची किंवा माझी.

**अनिरुद्ध :** करेक्ट. मी अगदी हेच म्हटलं त्यांना.

**मधुरा :** ( थबकून ) एखादा मुलगा आहे वाटतं त्यांच्या डोळ्यासमोर ?

**अनिरुद्ध :** हो. एक गोड हुशार चुणचुणीत दहा वर्षांचा मुलगा आहे म्हणाले ते.

**मधुरा :** बंगाली ?

**अनिरुद्ध :** हो तसं म्हणजे ऽऽ... बंगालीच म्हणायचा.

**मधुरा :** पण मला हे कळत नाही हे सगळं तुम्हाला आजच कशासाठी सांगत होते ते ? तुमचं त्यांचं काही बोलणं झालं होतं का आधी ?

**अनिरुद्ध :** छे छेऽ...मुळीच नाही. तसं काही असतं तर मी तुझ्याशी सल्लामसलत केली नसती का ?

**मधुरा :** तेच म्हणतेय मी.

**अनिरुद्ध :** तसं आपल्यात सीक्रेट काही नाही. अगदी परफेक्ट अंडरस्टँडिंग आहे. लव्ह इज अंडरस्टँडिंग म्हणतात त्याचा आपण वर्षानुवर्षं प्रत्यय घेतोय, होय की नाही ? टू अंडरस्टँड ऑल इज टू फरगिव्ह ऑल.

**मधुरा :** ( वर पाहात ) आज बरंच तत्त्वज्ञान सुचायला लागलंय तुम्हाला ? तुम्हाला काही सांगायचं का मला ?

**अनिरुद्ध :** ( गडबडून ) तसं म्हणजे...सांगायचं असं नाही; पण आपण...थोड्या दिलखुलासपणे गप्पागोष्टी करू या का ?

**मधुरा :** ( हातातलं विणकाम बाजूला ठेवून त्याला न्याहाळत ) करू या की.

**अनिरुद्ध :** ( झुरका घेऊन धूर सोडत ) एक गोष्ट सांगायचीय तुला, पण—

**मधुरा :** ( संशयानं क्षुब्ध होऊन पाहात ) कुठं काही भानगड तर नाही ना झाली ?

**अनिरुद्ध :** ( गडबडून ) क...क...का ? कशावरून ? अशी...अशी संशयानं का बघते आहेस तू माझ्याकडं ?

**मधुरा :** मध्यरात्रीच्या एकांतात, एखादा नवरा आपल्या बायकोला, अस्वस्थपणे जेव्हा 'एक गोष्ट सांगायचीय तुला' असं म्हणतो, तेव्हा हजार हिश्शानं काहीतरी भानगड असते. सायकॉलॉजीकली म्हणतेय मी.

**अनिरुद्ध :** छे छे तसं काही नाही...काहीसुद्धा नाही...म्हणजे तुला एवढं काळजीत पडण्यासारखं काहीही नाही.

**मधुरा :** मग काय आहे ? सरळ सरळ स्वच्छपणे सांगा पाहू.

**अनिरुद्ध :** ( आवंढा गिळत, मनाचा हिय्या करीत ) स...सांगतो. बंदोपाध्यायांचं म्हणणं असं, की तो मुलगा—

**मधुरा :** कोणता मुलगा ?

**अनिरुद्ध :** मघाशी ज्याच्याबद्दल मी तुला सांगितलं तो सत्यजीत गं ऽ ! तो थेट म्हणे माझ्यासारखा दिसतो.

**मधुरा :** असेल म्हणून तेवढ्यासाठी आम्ही त्याला दत्तक घेऊन संभाळायचा की काय ?

**अनिरुद्ध :** असं नाही...पण ( खिशातून फोटो काढून देत ) हा फोटो पाहा एकदा.

**मधुरा :** ( फोटोवर नजर टाकीत ) पाहिला. थोडं फार साम्य असेल, पण तेवढ्यानं

काय सिद्ध होणार आहे ? हा काही तुमच्यापासून झालेला मुलगा नाही.

**अनिरुद्ध :** त्यांचं म्हणणं असं की तो माझाच मुलगा आहे.

**मधुरा :** ( ताडकन उठत आवेशानं ) खोटं आहे. साफ खोटं आहे ते. ( थबकून ) तुमचं काय म्हणणं आहे ? खोटंच आहे ना ते ?

**अनिरुद्ध :** तसं म्हणजेऽऽ.. खरं असण्याची सुद्धा शक्यता आहे. मला नक्की काही सांगता येणार नाही. पण—

**मधुरा :** ( चिडून ) तुम्ही शुद्धीवर आहात का ? तुम्ही काय बोलताहात त्याचा अर्थ कळतोय का तुम्हाला ?

**अनिरुद्ध :** ट्राय टू अंडरस्टँड मी मधुरा—दहावर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टीबद्दल आज मी काय सांगू शकणार ?

**मधुरा :** याचा अर्थ एक तर नक्कीच, दहा वर्षांपूर्वी तुमचा आणखी एका स्त्रीशी प्रेम संबंध जडला होता. खरंय ना ? ( ओरडून ) खरंय ना ?

**अनिरुद्ध :** तसं म्हणजेऽऽ...संबंध जडला असेल—

**मधुरा :** असेल नाही, जडला होताच.

**अनिरुद्ध :** हो पण त्यात प्रेमबीम काही नव्हतं. फक्त संबंध...तो सुद्धा चुकून...

**मधुरा :** ( उपरोधानं ) असं असं...म्हणजे एक स्त्रीशी तुम्ही संग केलात' पण त्यात प्रेमाची गुंतवणूक काही नव्हती.

**अनिरुद्ध :** गळ्याशप्पथ सांगतो मी तिच्यावर मुळीच प्रेम करीत नव्हतो.

**मधुरा :** ( उपरोक्षानं ) वा वा ! काय पण थोरवी तुमची. या थोरपणाच्या कृत्याबद्दल पंचारतीनं ओवाळू काय तुम्हाला ?

**अनिरुद्ध :** तसं नाही...मधुरा, म्हणजे मला असं म्हणायचं होतं की—

**मधुरा :** तुम्हाला काय म्हणायचं होतं ते मला सगळं समजलं. तुम्ही एवढे निर्लज्ज आणि बेशरम असाल याची मला कल्पना नव्हती.

**अनिरुद्ध :** आता तू काय म्हणशील ते ऐकून घेणं मला भाग आहे. फक्त एकच सांगतो...ते ते सगळं दहा वर्षांपूर्वी घडलंय.

**मधुरा :** अस्सं ! म्हणजे अति प्राचीन काळी का ?

**अनिरुद्ध :** या मधल्या काळात मी तुझ्याशी अगदी शंभर टक्के प्रामाणिक होतो.

**मधुरा :** म्हणजे एकूण पंचाहत्तर टक्के तुम्ही एकपत्नीव्रत संभाळलंत, नाही का ? म्हणजे तुम्हाला बायकोशी इमान राखण्याबद्दल डिस्टींक्शनचे मार्क मिळायला हरकत नाही. काय ?

**अनिरुद्ध :** ( मान खाली घालून पुटपुटत ) काय म्हणशील ते ऊंम्...न्यूम्...न्यूम ...न्यूम.

[ मधुरा प्रक्षोभित मुद्रेने टक लावून त्याला न्याहाळत राहाते. :बघता बघता

तिचे डोळे भरून येतात. पण अश्रू ओघळत मात्र नाहीत. अनिरुद्ध मधेच मान वर करून बघतो- दृष्टीला दृष्टी भिडते. तो कळवळतो आणि—]

**अनिरुद्ध :** ( उठून आवेगानं तिचा हात धरीत ) मधू...मधुरा...माझं चुकलं मला क्षमा कर.

**मधुरा :** ( ताडकन त्याला दूर ढकलत ) दूर व्हा. मला स्पर्श करू नका.

**अनिरुद्ध :** ( हबकून मागे सरून बसत ) हो हो दूरच होतो. नाही स्पर्श करीत. पण माझं चुकलं. क्षमा करा मला. हे हे सगळं दहा वर्षांपूर्वी घडलंय ?

**मधुरा :** ( कातर स्वरात ) ते कळलंय मला. पण दहा वर्षांपूर्वी तरी का घडलं ?

**अनिरुद्ध :** आता का म्हणजेऽ...म्हणजेऽऽ......काही कळत नाही.

**मधुरा :** ( प्रथमच पदरानं डोळे टिपत ) असं कसं घडलं हो ?

**अनिरुद्ध :** ( खाडकन् थोबाडीत मारून घेत ) असं घडायला नको होतं; पण घडलं खरं. मधू वाटल्यास तू मला एकदोन मुस्काटात ऽगाव. वाटल्यास काठीनं बदडलंस तरी—

**मधुरा :** ( कातर स्वरात ) तेवढ्यानं मी जे गमावलंय ते परत मिळणार आहे का मला ? [ एवढं बोलून ती एकदम हातांनी तोंड झाकून हुंदका देते. अनिरुद्ध कळवळतो. "मधू...मधुरा..." म्हणत जवळ जातो. ती ताडकन् वर क्रुद्ध नजरेने बघते. तशी तो घाबरून मागे सरत "न...नाही नाही, मी हात नाही लावीत तुला ...दुरून...दुरूनच आपलं ते हे करतोय." असे उद्‌गारतो. क्षण, दोन क्षण ती तोंड झाकून मूक रुदन करते. मग डोळे पुसत स्वतःला सावरीत, उठते. भांड्यात पाणी ओतून दोन घोट पिते. मग पुन्हा बसत—] अस्संऽ ! दहा वर्षांपूर्वी हा प्रकार घडला. [ मान खाली घालून हलवीत होय म्हणतो. तशी—] कुठं, कलकत्त्याला ? पुन्हा तो खालच्या मानेनं होय म्हणतो. ] तुम्ही कॉन्फरन्सला डेलीगेट म्हणून गेला होता त्यावेळी ? [ तो पुन्हा खालच्या मानेनं होय म्हणतो ] तुम्ही त्यावेळी बंदोपाध्यांच्या घरी तुम्ही पाहुणे म्हणून उतरला होता तेव्हा ?

[ खाली मान घालून तो होय म्हणतो तशी त्याला न्याहाळात ]

घरातल्या एखाद्या तरण्याताठ्या मोलकरीणीशी का भानगड केली होतीत तुम्ही ?

**अनिरुद्ध :** ( ताडकन् ) हॅ हॅऽऽ...भलतंच काय ? इतका का तू मला अगदी 'हा' समजलीस ?

**मधुरा :** कामा तुराणां न भय न लज्जा. चोरून मारून केलेले स्त्री संग, पांढरपेशांच्या घरात तरी, असल्याच बायकांशी असतात. एरवी कोणती स्वाभिमानी सुसंस्कृत स्त्री नुसतं शरीरसुख द्यायला राजी होईल ? प्रेम करून स्त्रीला वश करून घेण्याचा पराक्रम तर तुमच्या रक्तातच नाहीये.

**अनिरुद्ध :** असं का म्हणतेस ? म्हणजे म...म...मी तुझ्यावर 'हे' नाही केलं ?

**मधुरा :** तुम्ही नाही. ते 'हे' मी तुमच्यावर केलं. त्या वेळी तुम्ही बसला होतात हातपाय गाळून. आठवतंय का? [ अनिरुद्ध तोंडातल्या तोंडात काही ऊंमन्यूम न्यूम...पुटपुटतो. मग– ] सत्यजीतची आई कोण आहे?

**अनिरुद्ध :** डॉक्टर मृणालिनी दासगुप्ता.

**मधुरा :** हूंऽऽऽ? या डॉक्टरणीला नवरा मिळत नव्हता का बंगाल्यात?

**अनिरुद्ध :** ती नक्षलाईट क्रांतिकारक होती. तिला लग्नसंस्था मान्य नव्हती. पण तिला मूल हवं होतं. तिनं निवडलेल्या माणसापासून.

**मधुरा :** म्हणून तिनं तुमची निवड केली.

**अनिरुद्ध :** असं ईश्वरदा म्हणाले.

**मधुरा :** आणि तुम्ही हुरळलात.

**अनिरुद्ध :** तिनं माझी निवड केली होती हे सुद्धा मला आज संध्याकाळी समजलं. त्या वेळी दगडफेकीत मी जखमी होऊन तिच्या घरी जाऊन राहिलो होतो ते उपचारासाठी.

**मधुरा :** तिच्या घरीच काय म्हणून? दुसरे दवाखाने नव्हते कलकत्त्यात?

**अनिरुद्ध :** तो सगळा तिचा प्लॅन होता. मी तिच्या घरी राहावं म्हणून.

**मधुरा :** भलतीच तयार दिसतेय ही डॉक्टरीण? दिसायला ती सुंदर होती का?

**अनिरुद्ध :** छे छे मुळीच्च नाही. एकदम ऑर्डीनरी...म्हणजे दहाजणीसारखी. तुझ्या मानानं तर काहीच नाही.

**मधुरा :** त्या गप्पा मारू नका. माझं 'मान' काय आहे, त्याचं कृतीनंच सर्टीफिकेट दिलंय तुम्ही मला हे. तुम्ही तिच्यावर लट्टू झालात म्हणून—

**अनिरुद्ध :** छे छे लट्टू बिट्टू काही नाही. मी जखमी होतो. फारसा शुद्धीतही नव्हतो. त्यावेळी हा प्रकार—

**मधुरा :** म्हणजे जखमी असताना बेशुद्धीत तुम्ही तिच्याशी संग केलात?
[ तो मान हलवून होय म्हणतो तशी — ] यावर कोण विश्वास ठेवील?
तुमचा तरी विश्वास बसतो? तुम्ही काय मला बावळट समजता?

**अनिरुद्ध :** खरं म्हणजे नक्की काय घडलं ते मला आज आठवत नाही.

**मधुरा :** साफ खोटं बोलताहात. असल्या गोष्टी ज्याच्या त्याला पक्क्या लक्षात राहातात. तुम्ही नाही सांगीतलंत तरी बिघडत नाही. जे सांगितलंत तेवढ्यानं सुद्धा बिघडायचं ते सगळं बिघडलंय.

**अनिरुद्ध :** माझ्या चुकांबद्दल मी क्षमा मागतोय तुझी मधुरा. झालं गेलं विसरून जा, आणि—

**मधुरा :** इतकं सोपं आहे का ते?

**अनिरुद्ध :** नाही...सोपं नाहीये तरी पण...दहावर्षांपूर्वी घडलेल्या—

**मधुरा :** ते कळलं मला. दहा वर्षांपूर्वी मिस्कॅरेज होऊन हॉस्पिटलमधून मी नुक्ती घरी परत आले होते. कलकत्त्याला जायचं की नाही या विचारात तुम्ही पडला होतात त्यावेळी मी आग्रह केला म्हणून तुम्ही गेलात...हे सगळं तरी आठवतंय का तुम्हाला ?

**अनिरुद्ध :** हो हो सगळं स्पष्ट आठवतंय. मी अहोरात्र बेचैन होतो...

**मधुरा :** म्हणून बायकोला विसरून ही चैन केलीत ?

**अनिरुद्ध :** चैन केली असं नाही प...पण...म्हणजे...

**मधुरा :** आणि हे सगळं आजच कशासाठी सांगता तुम्ही मला ?

**अनिरुद्ध :** ईश्वरदांनी त्या मुलाबद्दल आजच मला पहिल्यांदा सांगितलं.

**मधुरा :** पण कशासाठी ?

**अनिरुद्ध :** कशासाठी म्हणजेऽऽऽ...( घुटमळतो तशी )

**मधुरा :** तिला आपल्या मुलासाठी एखादी बहीण असावी अशी इच्छा झाली असेल बहुतेक ? का आता तिला तुमच्याशी लग्न करून संसार करण्याची बुद्धी झालीय ?

**अनिरुद्ध :** काहीतरीच बोलू नकोस मधुरा—मृणालिनी दोन महिन्यांपूर्वी एका कार ॲक्सीडंटमधे वारली. ती वारली म्हणूनच सत्यजीतचा प्रश्न निर्माण झालाय.

**मधुरा :** मग तुम्ही कसा काय सोडवणार आहात हा प्रश्न ? [ तो गप्प बसतो तशी– ] तुमचं हे पाप मी ओटीत घ्यावं असं तर तुम्हाला सुचवायचं नाहीये ?

**अनिरुद्ध :** तसं म्हणजे...मृणालिनीनं खूप पैसे त्याच्या नावावर ठेवलेत. ईश्वदाच सांगत होतं मला.

**मधुरा :** त्या पैशावर तुमचा डोळा आहे ?

**अनिरुद्ध :** इतका मी बदमाश आहे असं तुला वाटतं का मधुरा ?

**मधुरा :** नवरा म्हणून नक्कीच आहात. बाप म्हणून कसे आहात ते आता ठरायचंय.

**अनिरुद्ध :** ईश्वरदा म्हणाले, की सत्यजीतला हॉस्टेलमधे ठेवायचं ठरलंय. पण त्याला आई बापाची माया मिळावी म्हणून सुटीमधे तुम्ही काही दिवस त्याला आपल्या घरी घेऊन गेलात तर—

**मधुरा :** सत्यजीतला ठाऊक आहे का आपले वडील कोण आहे ते ?

**अनिरुद्ध** बहुतेक नसावं. पण—

**मधुरा :** त्याला खरं काय ते सांगायची तुमची तयारी आहे ?

**अनिरुद्ध :** अगदी उद्याच सांगायला पाहिजे असं नाही. त्याच्या आईला ओळखणाऱ्या एका कुटुंबात तुला जायचंय, असं सध्या त्याला सांगितलं—

**मधुरा :** म्हणजे पुन्हा खोटेपणा.

**अनिरुद्ध :** त्याला खरं सांगायला माझी हरकत नाहीये. पण—

**मधुरा :** आणि सुंदर ? सुंदरला हे कळेल तेव्हा तिला केवढा धक्का बसेल याचा विचार

केला आहेत का तुम्ही ? एक आदर्श, चारित्र्यसंपन्न पिता म्हणून ती तुम्हाला किती मानते, किती विश्वास आहे तिचा तुमच्यावर—

**अनिरुद्ध :** ( अजीजीनं ) पण मधुरा, हे हे सगळं दहा वर्षांपूर्वी घडलंय.

**मधुरा :** सो व्हॉट ? दहा वर्षांपूर्वी तरी घडलंय ना ? घडलंय ते प्रत्यक्षात...तुमच्या किंवा माझ्या स्वप्नात नाही. ( क्षणभर थबकून त्याला न्याहाळत ) खरं म्हणजे हे सगळं आजच मला सांगायची बुद्धी तुम्हाला का झाली ते मला अजूनही कळत नाही.

**अनिरुद्ध :** मला देखील हे आजच कळलं, नाही का ?

**मधुरा :** काय आज कळलं ?

**अनिरुद्ध :** म्हणजे मुलाबद्दल.

**मधुरा :** आणि तिच्या तुमच्या संबंधाबद्दल ? का तेही आजच कळलं ? [ तो गप्प राहातो तशी ] खरं म्हणजे तुम्ही सगळंच अंगाबाहेर झटकून मोकळं व्हायचंत.

**अनिरुद्ध :** ते तुला आवडलं असतं ?

**मधुरा :** मला काय आवडलं असतं आणि काय नसतं, याचा विचार करायची वेळ दहा वर्षांपूर्वी होती. एकाद्या प्रामाणिक नवऱ्याला, तिच्या अंगाला हात लावताना तो विचार सुचला असता. पण लबाड पुरुष, असं प्रकरण अंगाशी यायला लागलं, की धोरणीपणानं अंग झटकून कसे नामानिराळे होतात, ते मला ठाऊक आहे. ते तुम्ही कसं केलं नाहीत याचं मला आश्चर्य वाटतंय. [ तो गप्प राहातो तशी काय ? आता जरा सगळं खरं खरं सांगून टाका की ?

**अनिरुद्ध :** माझा तोच प्रयत्न चाललाय. अंगाबाहेर झटकण्याचा प्रयत्न मी केला नाही असं नाही. प्रयत्न थोडासा केला; पण—( थबकतो )

**मधुरा :** तो फसला. ईश्वरदांनी पुराव्यानिशी माप तुमच्या पदरात घातलं वाटतं ?

**अनिरुद्ध :** छे छे, पुरावे बिरावे काही नाही. ते बिचारे सज्जन गृहस्थ. मी काहीही करू शकणार नाही, म्हटल्यावर ते परतच जायला निघाले होते. पण ही गोष्ट आज ना उद्या तुला कळणार आणि कळल्यावर तू काही स्वस्थ बसायची नाहीस, अगदी मुळापर्यंत खोदत जाऊन खरं काय ते शोधून काढणार—याचा मला अंदाज आला तेव्हाऽऽ—

**मधुरा :** का ? मला ही गोष्ट कळायला काय मार्ग होता ? आणखी कोणाला ठाऊक आहे का हा प्रकार ?

**अनिरुद्ध :** ईश्वरदा म्हणाले, थोडासा चेतनला ठाऊक आहे. त्याच्या आईला तर सगळंच ठाऊक आहे. ' कोणाला सांगू नकोस, ' असं बजावलं, तर म्हणे ती पहिल्यांदा जाऊन सांगणार.

**मधुरा :** कर्म माझं अहो ती बाई डॉ. टिल्लूंच्या हाताखाली पीएच. डी. चा अभ्यास

करतेय. ती टिल्लूपाशी नक्की बोलली असणार.

**अनिरुद्ध** : म्हणजे विद्यापीठात सुद्धा आज ना उद्या आमच्या पराक्रमाचे झेंडे लागणार.

**मधुरा** : अस्सं ऽ ! म्हणून त्या बाई पार्टीच्या वेळी माझ्याशी काय काय बोलल्या, त्याची तुम्ही बारीक चौकशी करीत होता वाटतं माझ्याजवळ ?

**अनिरुद्ध** : इतर कोणी येऊन तिखटमीठ लावून तुला सांगण्यापेक्षा आपणच सांगून टाकलेलं बरं, या हेतूनं—

**मधुरा** : तरीसुद्धा ही सांगून टाकण्याची उपरती तुम्हाला काही प्रामाणिकपणातून झाली नव्हती.

**अनिरुद्ध** : तिखटमीठापासून सत्याला वाचवायला बघत होतो मी.

**मधुरा** : हे सत्य मुळातच इतकं मसालेदार आणि खमंग आहे की त्याला निराळं तिखटमीठ लावायची सुद्धा गरज नाही.

**अनिरुद्ध** : तुझा जो भडका उडालाय त्यावरून ते लक्षात आलंय माझ्या.

**मधुरा** : थांबा, एवढ्यानं संपलं नाही. याचाच आणखी एक अर्थ असा की हा मुलगा जर पुढं आला नसता, तर दहा वर्षांपूर्वी घडलेल्या या स्त्रीसंगाचा, तुम्ही मला कधीही पत्ता लागू दिला नसतात.

**अनिरुद्ध** : सरळच आहे. सगळे पुरुष असंच करतात.

**मधुरा** : सगळ्या पुरुषांच्यापेक्षा तुम्ही वेगळे आहात असा माझा समज होता.

**अनिरुद्ध** : नवऱ्यावर गाढ प्रेम करणाऱ्या प्रत्येक बायकोचा असा गैरसमज असतोच.

**मधुरा** : ते कळलं आता मला. काय हो, मृणालिनीवर जसा तुम्ही उपकार केलात, तशी कृपा, या दहा वर्षांत तुम्ही आणखी किती जणींच्यावर केली आहेत !

**अनिरुद्ध** : काहीतरीच काय अफाट आरोप करते आहेस गं तू ?

**मधुरा** : मी आरोप करीत नाहीये. तुम्हाला विचारतेय. नाही, या दहा वर्षांत ठिक-ठिकाणी तुमच्या खूपच परिषदा झाल्यात. गेल्या वर्षी तर काश्मीरला परिषद भरली होती तुमची, नाही का ?

**अनिरुद्ध** : तुझी काय कल्पना आहे ? दरवर्षी मी कॉन्फरन्सला जातो ते काय बायका धुंडाळण्यासाठी ?

**मधुरा** : ते मला काय ठाऊक ?

**अनिरुद्ध** : मी जीव तोडून तुला सांगतोय की ही चूक माझ्या हातून चुकून घडली. एकदाच घडली. तरी तू माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत ?

**मधुरा** : विश्वास कसा ठेवायचा ? आजवर मी तुमच्यावर गाढ विश्वास ठेवूनच होते. पण तुम्ही माझा विश्वासघात केलात आणि—

**अनिरुद्ध** : ‘ विश्वासघात केला ’ असं म्हणू नकोस. विश्वासघात घडला....चुकून घडला.

**मधुरा :** चुकून घडला ? अरे वा रे वा ! विश्वासघात काय चुकून घडतो ? आपण जे करतोय त्याचे परिणाम काय होतील, हे न कळण्याइतके तुम्ही मठ्ठ, मूर्ख आणि बावळट होता का ?

**अनिरुद्ध :** कमीत कमी इतकी दूरदृष्टी मला नव्हती...म्हणजे नसावी. त्या त्या वेळी.

**मधुरा :** खरोखर तुमचं तोंड पाहू नये इतका राग आलाय मला तुमचा.

**अनिरुद्ध :** थोडं समजून घेतलंस तर हळूहळू राग निवळेल.

**मधुरा** . ( भडकून ) काय, काय समजून घेऊ मी ?

**अनिरुद्ध :** नाही म्हणजे...नवरा आपला आहे. तो प्रेम करतोय. ही चूक त्याच्या हातून एकदाच घडलीय. ती सुद्धा चुकून आणि दहा वर्षांपूर्वी. तेव्हा या चुकीला एकवार क्षमा करायला हरकत नाही.

**मधुरा :** काय हो, माणसानं किती वेळा शेळ खाल्लं म्हणजे ते अक्षम्य मानायचं ? शेण ते शेणच. एकदा खाल्लं काय आणि शंभर वेळा—

**अनिरुद्ध :** मधुरा, तू कलावंत कादंबरीकार आहेस. एकदा चुकलं म्हणून काय माणसाला फाशी द्यायचं ? कोर्टसुद्धा पहिल्या गुन्ह्याला सौम्य शिक्षा करतं.

**मधुरा :** तुम्ही काय कोर्टात उभे आहात ?

**अनिरुद्ध :** ईश्वरदा म्हणाले की तुमची बायको लेखिका आहे. लेखक लोक उदार असतात. ती नक्की तुम्हाला समजून घेऊन क्षमा करील.

**मधुरा :** अस्सं ! म्हणजे हे ईश्वरदांनी तुम्हाला पढवलं होतं तर ? काय हो, माझ्या हातून असं काही घडलं असतं तर तुम्ही माझं काय केलं असतंत ?

**अनिरुद्ध :** तुझ्या हातून ? हे हे असं काही ? छे शक्य नाही.

**मधुरा :** समजा, मी तुम्हाला आज सांगितलं की सुंदर ही काही तुमची मुलगी नाही; तर ? आपल्या लग्नाच्यां वेळी माझ्याशी सलगीनं वागणाऱ्या कवि उमाकांतांच्यावर तुम्ही किती भडकला होतात ते आठवतंय का ?

**अनिरुद्ध :** ( घाम पुसत ) म...म...मी जरा पाणी पितो आणि सांगतो. ( भांड्यातून पाणी गटागटा पितो. मग– ) तो...तो उमाकांत हा फारच पाजी इसम होता. तरी पण तुझ्याहातून असं काही घडणं शक्य नाही, याची मला खात्री होती.

**मधुरा :** का ? मी माणूस नाहीये ? मला चूक करायचा हक्क नाहीये ?

**अनिरुद्ध :** ते सगळं ठीक आहे. पण तरीसुद्धा...नाही...नाही.

**मधुरा :** अशी चूक मी केली असती तर तुम्ही मला या घरातच काय, या जगात सुद्धा ठेवली नसतीत. मी तुम्हाला पूर्णपणे ओळखून आहे.

**अनिरुद्ध :** ते...अगदीच खोटं आहे असं म्हणवत नाही मला.

**मधुरा :** पण तुम्हाला पक्कं ठाऊक आहे या बाबतीत माझी निष्ठा म्हणजे तरवारीचं लखलखतं पातं आहे. एक घाव दोन तुकडे होतील कोणी माझ्याशी खेळायला

लागला तर.

**अनिरुद्ध :** खरंय म्हणून तर मी तुला देवता मानतो.

**मधुरा :** आता हळद कुंकू वाहून लवकरात लवकर माझी पूजा आटोपा आणि जायची तयारी करा.

**अनिरुद्ध :** कुठं जायची ?

**मधुरा :** नवी शिकार करायला. एखाद्या परिषदेत वा परिसंवादात !

**अनिरुद्ध :** मधुरा...मधुरा, तू माझा इतका तिरस्कार करायला लागली आहेस का ?

**मधुरा :** नवऱ्यावरून जीव ओवाळून टाकणारी माझ्यासारखी बायको नवऱ्याचा व्यभिचार कळल्यावर दुसरं काय करू शकते ? तुम्हाला हे कधीच कळणार नाही. दुसरं काय वाट्टेल ते मी सोसलं असतं. कसलंही दुःख मी सहन केलं असतं. पण माझा नवरा दुसऱ्या एका स्त्रीच्या मिठीत ? तोही प्रेमशून्य भोग देण्यासाठी ? नाही नाही... हे मला कधीही सहन होणार नाही. सटवी कधी तरी मला भेटायला हवी होती. झिंज्या उपटून मी नरडीचा घोट घेतला असता तिच्या.

**अनिरुद्ध :** आता मेलीय ती.

**मधुरा :** ठाऊक आहे मला ते. तुम्हाला एवढा कळवळा यायला नकोय तिचा. हडळ ! डाकीण ! माझ्या संसाराचं वाट्टोळं करून नरकात गेली चांडाळीण.

**अनिरुद्ध :** हळू हळूऽ ! आवाज चढलाय तुझा.

**मधुरा :** चढू देत. सगळ्या जगाला ओरडून सांगेन मी.

**अनिरुद्ध :** शेजार पाजाऱ्यांनी ऐकलं तर ते धावत येतील.

**मधुरा :** येऊ देत. त्यांना दाखवायलाच हवं एकदा; शेळीचं कातडं पांघरणारा हा वाघ केवढा दुष्ट आणि लुच्च्या आहे तो.

**अनिरुद्ध :** मधुरा, तुझा तोल गेलाय. तू थोडी व्हिस्की नाहीतर ब्रँडी घेशील का ?

**मधुरा :** तुम्हीच जाऊन ढोसा ती उरलेली बाटली. या अत्यंत सुंदर दिवशी (मुलाचा फोटो दाखवीत ) तुम्ही मोठं छान प्रेझेंट दिलं आहेत मला हे. ( फोटो त्याच्या अंगावर भिरकावते ).

**अनिरुद्ध :** ( फोटो उचलत ) मी प्रायश्चित्त घेतलं म्हणजे तुझं समाधान होईल का ?

**मधुरा :** हूं ! तुम्ही काय प्रायश्चित्त घेणार !

**अनिरुद्ध :** का ? मी एकवीस दिवसांचं उपोषण करीन.

**मधुरा :** तोंड बघा उपोषण करणाऱ्याचं. काही नाही; त्यातसुद्धा तुम्ही चोरूनमारून हादडाल. तुम्ही काय स्वतःला सर्वोदयी संत समजलात ?

**अनिरुद्ध :** मग तू सांग मी काय प्रायश्चित्त घेऊ ते ?

**मधुरा :** तुमच्या अपराधाला एकच प्रायश्चित्त आहे. देहान्त प्रायश्चित्त. देहान्त तुमचा नव्हे, माझा.

**अनिरुद्ध** : ( गलबलून ) नाही नाही...असं खुळ्यासारखं बोलू नकोस मधुरा—

[ तोच फोन खणखणतो. तशी तो लगबगीनं फोनकडं धावतो तेवढ्यात—]

**मधुरा** : थांबा. हा फोन मी घेणार आहे.

**अनिरुद्ध** : न...नाही...हा हा फोन मला वाटतं...त्या आपल्या ह्यांचा असावा.

**मधुरा** : ‘ ह्यांचा ’ असो वा ‘ त्यांचा ’ असो. फोन मीच घेणार आहे. तुम्ही स्वस्थ बसा. [ तो बसतो. सिगरेट शिलगावतो. दरम्यान ती रिसीव्हर उचलते आणि—] हॅलोऽऽ येस धिस इज फाईव्ह डबल फोर थ्री सेव्हन...कॉल फ्रॉम कलकत्ता ?...

**अनिरुद्ध** : ईश्वरदांचा फोन...मला बोलू दे त्यांच्याशी.

**मधुरा** : ( फोनमधे ) येस आय ॲम होल्डींग... ( रिसीव्हरवर हात ठेवीत ) आज संध्याकाळी भरपूर बोलणं झालंय तुमचं. त्यापेक्षा काही नवं, निराळं, विचारायचं वा सांगायचं आहे का तुम्हाला त्यांना ?

**अनिरुद्ध** : नवं निराळं काही नाही, पण—

**मधुरा** : दॅटस् ऑल. मग मला बोलायचंय त्यांच्याशी. मी त्यांना— ( एकदम रिसीव्हरमधे ) हॅलो...मी मधुरा राजपाठक...हो नमस्ते ईश्वरदा...नाही नाही ते जागेच आहेत...हो हो समारंभ छान झाला, पार्टी छान झाली...तुमच्या भगिनी चंद्राताई आणि चेतन दोघंही आले होते पार्टीला...हं...हं...त्यांना जे काही सांगायचंय ते तुम्ही मला सांगितलंत तरी चालेल...नाही, ते सगळं मला ठाऊक आहे, अनिरुद्ध बोलले आहेत माझ्याशी...हं...हं...तुम्ही असं करा सत्यजीतला घेऊन तुम्ही स्वत। इथे या. मी त्याची सगळी जबाबदारी घेतलीय असं समजा... नाही नाही माझे आभार मानायची काही गरज नाही...हा काही माझ्या खुशीचा मामला नाही की चॅरीटीचा भाग नाही. मुलाचा काही एक अपराध नाही तेव्हा त्याला कसलीही झळ लागता कामा नये...हं...हं...त्याबद्दल मात्र तुम्ही काहीही बोलू नका. मला कोणाच्याही मध्यस्थीची गरज नाहीये...हं...हं...आमच्यापुढला प्रश्न सोडवायला आम्ही समर्थ नाहीये का ?...दॅटस ऑल. मुलाला घेऊन तुम्ही कधी येताहात ?...हं...हं ठीक आहे त्याची मावशी भेटून गेल्यावर तुम्ही आलात तरी चालेल...पैसेबीसे काहीही नको आहेत मला...ते त्याच्या नावावर बँकेतच राहू दे...ओ. के. गुडनाईट.

[ फोन शांतपणे बंद करून वळते तशी—]

**अनिरुद्ध** : ( भारावून ) मधुरा, या तुझ्या समजुतदारपणाबद्दल—

**मधुरा** : तुम्ही आभार प्रदर्शन करायची गरज नाही. मी हा समजुतदारपण दाखवलेला नाही. अत्यंत शरमिंदेपणानं हे प्रायश्चित्त घेतेय मी.

**अनिरुद्ध** : ( विकलतेनं ) तू हे हे कधीच विसरणार नाहीस का ? मला कधीच क्षमा करणार नाहीस का ?

**मधुरा :** विसरणं तर कधीच शक्य नाही. या घडीला क्षमाशीलतेचा आव आणणंही मला जमणार नाही. ते फार फार कठीण आहे. अशा परिस्थितीत मी या घरात राहायचं की नाही, ते तुम्ही ठरवायचंय.

**अनिरुद्ध :** नाही नाही...आपण सगळे या घरातच राहणार आहोत.

**मधुरा :** तर मग एक संकेत पाळायलाच हवा. आपण यापुढं इथं राहणार आहोत, ते केवळ मित्र म्हणून. नवराबायको म्हणून नाही. आणि आपल्या संबंधात दुसऱ्या कोणीही नाक खुपसलेलं मला चालणार नाही.

**अनिरुद्ध :** ( वाईट्ट मुद्रेनं ) ठीक आहे. जशी तुझी मर्जी.

**मधुरा :** तुम्ही तुमच्या अभ्यासिकेत झोपायचं. मी वर सुंदरच्या खोलीत माझा बिछाना घालणार आहे. सुंदरला काय सांगायचं ते मी पाहीन. मान्य आहे ?

**अनिरुद्ध :** मान्य करायलाच हवं. दुसरा काय पर्याय आहे मला ?

**मधुरा :** काही नाही. ( क्षणार्ध थबकून ) तर मग गुड नाईट !

**अनिरुद्ध :** ' स्वीट ड्रीम्स ' तरी म्हण. तेवढंच स्वप्नीचं धन माझ्या हाती राहिलंय.

[ दोघंही मंद विषण्ण हसतात. ' गुड नाईट ' म्हणत तो हस्तांदोलनासाठी हात पुढं करतो, ती फक्त हात जोडून नमस्कार करीत प्रतिसाद देते. तो ओशाळगत होऊन अभ्यासिकेकडे वळतो. ती जड पावलाने जिना चढू लागते. शेवटच्या पायरीवर थबकून ती एकदम वळते आणि-- ]

**मधुरा :** काय हो, मला एक सांगाल का ?

**अनिरुद्ध :** ( दचकून दारापासून मागं वळून दोन पावलं जिन्याकडं येत ) काय ?

**मधुरा :** हे असं मुळी घडलंच कसं ?

**अनिरुद्ध :** ( ओशाळगत ) खरं म्हणजेऽऽ...असं घडायलाच नको होतं. पण-- घडलं खरं बुवा !

[ ती वर आत जाते. तो अभ्यासिकेकडे वळतो. आणि त्याच वेळी--पडदा. ]

**पूर्वार्ध संपला.**

# उत्तरार्ध

## प्रवेश पहिला

[ पूर्वार्धातील घडामोडीनंतर सुमारे पंधरा दिवसांचा काळ उलटला आहे. त्याच बंगल्यातील तोच हॉल. मात्र सजावटीत आता थोडा फरक पडला आहे. बसायची काही आसने, टीपॉय इ० नाहीसे झाले आहे व त्या एका भिंतीशी मधुराचे लेखनाचे टेबल व खुर्ची ठेवली आहे. टेबलावरली सजावट कलावंत लेखकाच्या गरजेला आणि रुचीला साजेल शोभेलशी. ही टेबलखुर्ची पूर्वी आत म्हणजे अनिरुद्धच्या अभ्यासिकेत असावी. एका भिंतीवर पूर्वी अनिरुद्ध–मधुरा यांचे छायाचित्र लावले होते. ती तसबीर आता अन्तर्धान पावली आहे आणि त्याजागी आता एक सुरेख पेंटिंग लटकले आहे.

वेळ सायंकाळची. पडदा वर जातो त्यावेळी टेबलाजवळ मधुरा खुर्चीवर बसून काही मुद्रिते तपासताना दिसते आहे. तेवढ्यात आतून घोटणकर एक भली मोठी सूटकेस घेऊन येतो. त्याचा वेश अर्थातच घरातला कामकाज करतानाचा. ]

**घोटणकर :** ( थबकून मधुरेकडं न्याहाळत ) बाई...

**मधुरा :** ( वर न पाहता मुद्रितावर दुरुस्ती करीत ) ऊं ?

**घोटणकर :** नाही म्हणजेऽऽ ही बॅग कुठं ठेवायची ?

**मधुरा :** ( वर पाहात ) पूर्वी कुठं ठेवली होती ?

**घोटणकर :** आपल्या गोदरेजच्या अलमारीच्या वर ठेवली होती. पण आपलं कपाट आता वर गेलं, तेव्हा—

**मधुरा :** बॅगही वरच जाऊ दे. त्यात विचारायला कशाला हवं ?

**घोटणकर :** वर ताईसाहेब माझ्यावरच ओरडायला लागल्यात. सगळं सामान वर आणून का रचतो आहेस म्हणून...

**मधुरा :** ( मुद्रितात लक्ष घालीत ) मी सांगितलंय म्हणून सांग तिला.

**घोटणकर :** ( विचारात पडत ) बाई, मला वाटत ही बॅग साहेबांच्या पलंगाखाली ठेवूया. साहेबांच्या खोलीत आता रगड जागा—

**मधुरा :** ( मुद्रिते पाहातच ) ऊं हूं. बॅग वरच जाऊ दे.

**घोटणकर :** आणि--ट्रॅन्झीस्टरचं काय करायचं ?

**मधुरा :** काय करायचं म्हणजे ? ( वर पाहात ) सकाळी तुला मी सांगितलं नाही का–तो साहेबांचा आहे आणि साहेबांच्याच खोलीत राहू दे.

**घोटणकर :** साहेब म्हणाले तो बाईंनी सिंगापुराहून आणलाय तेव्हा--

**मधुरा :** होय होय--मीच सिंगापुराहून आणलाय तो ट्रॅन्झीस्टर, पण तुझ्या साहेबाना मी तो दिलाय.

**घोटणकर :** ते ठाऊक आहे मला. मी सांगीतलं तसं साहेबाना तर---( थबकतो ).

**मधुरा :** ( वर पाहात ) मग ?

**घोटणकर :** तर म्हणाले—तुझ्या बाईंना परत नेऊन दे. त्या नको म्हणाल्या तर बाहेर रस्त्यावर फूटपाथवर ठेवून दे.

**मधुरा :** मग दे फूटपाथवर ठेवून.

**घोटणकर :** छा छा भलतंच काय ? दोन मिनिटात जाईल तिथून. त्यापेक्षा मी गॅरेजमधे घेऊन जाऊ ?

**मधुरा :** ती बॅग तर वर नेऊन टेव. ट्रॅन्झीस्टरबद्दल मी बोलेन त्यांच्याशी.

[ घोटणकर बॅग उचलून जिन्यातून वर जातो. मग मधुरा मुद्रित संपवून त्यांची गुंडाळी करते आणि त्याला रबर बॅंड लावीत– ] अरेऽ...कोण रे आलाय प्रुफासाठी ? मगदूम का ? [ तशी मगदूम एक प्रेसमधला कामगार • दारातून येतो. ] मगदूम ही प्रूफं घेऊन जा. दुरुस्त्या करून पेजप्रुफं माझ्याकडं धाडा म्हणावं. बबनरावना सांग चुका फार राहाताहेत अजून. [ प्रुफं घेऊन मगदूम जातो. मधुरा उठत टेबल आवरू लागते. तेवढ्यात सुंदर बाहेर जायच्या तयारीनं पण तावातावानं येते. अंगात जीन्स आणि आत खोचलेला शर्ट. येता-येताच. ]

**सुंदर :** ममी, हा काय प्रकार चाललाय ?

**मधुरा :** का ? काय झालं ?

**सुंदर :** परवा तुझी कॉट माझ्या खोलीत आली. काल कपाट आलं. आज पुस्तकं आणि बॅग्ज आल्या. माझ्या खोलीचं गोडाऊन करायचं ठरवलं आहेस का तू ?

**मधुरा :** तुझी खोली म्हणजे मोठा हॉल आहे, माझ्या सामानामुळं काही गोडाऊन होत नाही तिथं. थोड्या दिवसांचा तर प्रश्न आहे.

**सुंदर :** का ? थोड्या दिवसांनी काय चमत्कार घडणार आहे ?

**मधुरा :** ( गालात हसत ) तुझं लग्न आणि पाठोपाठ तुझी रवानगी.

**सुंदर** : ( आंगठा दाखवीत ) अबे ज्या ज्या ऽऽ...मी मनावर घेतल्याखेरीज त्यातलं काही एक घडायचं नाही. ते सोड. पण पप्पांचं आणि तुझं काय चाललंय तेच मला कळत नाही.

**मधुरा** : आमचं काय चालायचं ? नेहमी जे चालतं तेच चाललंय.

**सुंदर** : होय का ? मग पपांच्या खोलीतून बाडबिस्तारा घेऊन तू माझ्या खोलीत वर मुक्काम का हलवलास ते सांग मला.

**मधुरा** : अगं तुझे पपा नवं संशोधनपर ग्रंथलेखन सुरू करताहेत ना, त्यासाठी त्यांना भरपूर जागा आणि एकान्त लागणार आहे. बघतेस काय अशी ? रात्री-अपरात्री तासंतास दिवा ढणढणा जाळीत ते वाचीत नाहीतर विचार करीत कसे बसतात ते तू पाहिलं नाही का ? त्यांचा मला त्रास नको आणि माझा त्यांना त्रास नको म्हणून—

**सुंदर** : काही तरीच सांगू नकोस. पपांचं चित्त काही ठिकाणावर नाहीये. संशोधनपर लेखन करायला काय आठपंधरा दिवस दाढीमिशा वाढवायला लागतात ? पपांचा काय अवतार झालाय तो पाहिलास का एकदा ? ते आता बहिरामखान दिसायला लागतील.

**मधुरा** : दिसू देत. तू नाही रोज तरतऱ्हेचा अवतार करून हिंडत ? तो आम्हाला कुठं आवडतो ? जीन्स काय, शर्ट काय, कान बुच्चे, गळ्यात हातात काही नाही, झिपऱ्या तोंडावर...कोण तुला पसंत करणार आणि पत्करणार देव जाणे.

**सुंदर** : देव कशाला हवाय. मी जाणते. मी ही आहे अशी ज्याला पसंत पडेन त्याला पत्करायचं की नाही ते मी ठरवीन.

**मधुरा** : कळलं, कळलं ! शब्द तर फोडणीसारखे कडकडा फुटताहेत तुझ्या तोंडातून. निघालीय कुठं आपली स्वारी ? तुमच्या 'तरुण रक्त' स्त्रीमंडळाची बैठक आहे वाटतं आज ?

**सुंदर** : बैठक नाही. सभा आहे आज. त्यासाठीच चेतनची वाट बघतेय मी. ( घड्याळात पाहात ) एव्हाना यायला हवा होता तो. नेहमी उशीर.

**मधुरा** : चेतन ? चेतनचा काय संबंध ?

**सुंदर** : चेतनचं व्याख्यान ठेवलंय आम्ही आज. एका क्रांतिकारक बंगाली स्त्रीची रोमहर्षक माहिती सांगणार आहे तो स्त्रीसदस्यांना.

**मधुरा** : कोण ही बंगाली क्रांतिकारक स्त्री ?

**सुंदर** : कोणी डॉक्टर मृणालिनी दासगुप्ता म्हणून होती म्हणे एक. चेतनला तिची खूप माहिती आहे म्हणून—

**मधुरा** : ( स्तंभित होत न कळत ओरडून ) मृणालिनी दासगुप्ता ? तीऽऽ ?

**सुंदर** : ( बावचळून ) हो का ? तू ओळखतेस तिला ?

**मधुरा** : नाही. ( थबकून ) तिनं काय पराक्रम केलाय ?

**सुंदर** : मला माहिती नाही पण चेतन सांगत असतो अनेक वेळा. ती डॉक्टर म्हणून फार लोकप्रिय होती. शिवाय नक्षलाइट म्हणून तिचा दराराही खूप होता. तसं तिनं इतर खूप काही केलंय. पण आमच्या मंडळाच्या दृष्टीनं महत्त्वाचं तिचं कार्य म्हणजे तिनं स्त्रीसत्ताक मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा पाया घातला.

**मधुरा** : स्त्रीसत्ताक ? मातृसत्ताक ? पाया घातला म्हणजे तिनं नेमकं काय केलं ?

**सुंदर** : ममी, ती फॅंटास्टिकच बाई असली पाहिजे. अग विसाव्या वर्षी तिनं आई-वडिलांना खणखणीतपणे सांगितलं—" मी लग्नाच्या बेडीत पडणार नाही. पण मूल होण्याचा, आईपणाचा हक्क मी सोडणार नाही. " नुसतं सांगून थांबली नाही ती. तिनं समाजाच्या नाकावर टिच्चून, आपला हक्क बजावला. दहा वर्षांचा मुलगा आहे तिला.

**मधुरा** : मुलाचा बाप कोण होता तिच्या ?

**सुंदर** : कोणीही असेल. त्याला काय किंमत आहे ? कुटुंब म्हणजे आई आणि मूल—बाप नव्हेऽऽ ! तिनं स्वतःच्या उदाहरणानं मुळी मातृसत्ताक कुटुंबपद्धती सिद्धच केलीय. नुसती स्त्रीसत्ताक पद्धती सिद्ध केलीय असं नाही तर पद्धीनं, पुरुषांना बरोब्बर आपली जागा दाखवलीय. आम्ही बेहद्द खूष आहोत तिच्यावर.

**मधुरा** : कुटुंब म्हणजे फक्त आई आणि मूल ? बाप नव्हेऽ ? मग तो कोण ?

**सुंदर** : पाहुणा. केवळ काही दिवसांचा पाहुणा. त्याची जागा आता यापुढं देव्हाऱ्यात नाही. पाहुण्याच्या खोलीत; नाहीतर मालकीण ठेवील तिथं. ती ठेवील तिथं आणि ठेवील तसं राहून तिची मर्जी राखायची. आणि काम संपलं की एकदम औट-वन्स फॉर ऑल औट. तिनं पुन्हा निमंत्रण धाडलं तर यायचं; नाही तर टाटा... गुडबाय !

**मधुरा** : ही तुझी कुटुंब व्यवस्था तुझ्या पपांना सांग की एकदा उलगडून, तेसुद्धा खूप होतील या व्यवस्थेवर.

**सुंदर** : हे बघ ममी, तू आणि पपा, दोघंही आमच्या 'तरुण रक्त स्त्री मंडळाच्या दृष्टिकोणातून एकदम बाद आहात. तुम्हाला आमचे विचार कधी कळणार नाहीत; कळले तरी मानवणार नाहीत. खरं म्हणजे ही मृणालिनी तुमच्या पिढीतली. पण सिंपली ग्रेट.

**मधुरा** : अशी ही मृणालिनी आता तुमची आदर्श आहे तर ?

**सुंदर** : आमचीच म्हणू नकोस. समस्त स्त्रीजातीनं तिचा आदर्श डोळ्यापुढं ठेवला पाहिजे. इमॅजीन ममी, गेली दहा वर्षे तिनं आपल्या मुलाला फुलासारखा जपला संभाळला. त्याला काही कमी पडू दिलं नाही की कसली झळ लागू दिली नाही. झळ लागेलच कशी ? बोलायची कोणाची टाप होती का ? गळ्यात स्टेथास्कोप

आणि हातात पिस्तुल...यंव रे यंव ! बिचारी दोन महिन्यांपूर्वी अपघातात वारली म्हणून, नाही तर तुला सांगते ममी—[ तोच दारावर घंटा वाजते. तशी—] हा आला वाटतं. नशीब माझं ! [ असे उद्गारतात पुढं होऊन ती दार उघडते. चेतन एक देखणा मॉड पोशाखातला तरुण येतो. हातात ब्राऊनपेपरमधे गुंडाळलेली एक फोटोफ्रेम. त्याला पाहाताच ] काय रे तुझं हे येणं चेतन ? सगळ्या मुली तिकडं कोकलत असतील आपल्या दोघांच्या नावानं.

**चेतन** : मी तरी काय करणार सुंदर ? फ्रेममेकरकडून ही तसबीर मिळायलाच मला इतका उशीर झाला. तरी फोटो मी त्याला सकाळीच दिला होता. आत्ता उभं राहून काम करून घ्यावं लागलं मला.

**मधुरा** : कोणाची तसबीर ?

**सुंदर** : ( ब्राऊन पेपरमधून तसबीर काढीत ) बघ बघ ममी...कशी तेजस्वी दिसतेय ही वंगकन्या मृणालिनी. डोळे मोठे बोलके आहेत तिचे, नाही का ?

**मधुरा** : ( तसबीर घेऊन न्याहाळून निर्विकार मुद्रेनं परत करीत ) हा फोटो तुझ्या खोलीत लावणार आहेस तू सुंदर ?

**सुंदर** : छे छे, आमच्या तरुण रक्त स्त्री मंडळाच्या ऑफीसमधे लावायचं ठरवलंय तो. तीच सभा आहे आज. अॅडव्होकेट सुजाता नायरनं आम्हाला जागा दिलीय हे ठाऊक आहे ना तुला ?

**मधुरा** : तेही आत्ताच कळतंय मला.

**चेतन** : मृणालताईची माहिती सांगितली असेल तुम्हाला सुंदरनं,' होय ना ममी ?

**मधुरा** : थोडीफार सांगितली. बाई मोठी धाडसी यात शंकाच नाही. पण ती कोठल्या माणसात गुरफटली होती याची काही कल्पना असेलच की तुला ?

**चेतन** : नाही, मला माहीत नाही आणि आय अॅम नॉट इंटरेस्टेड.

**मधुरा** : कदाचित तुझ्या आईला ठाऊक असेल.

**चेतन** : छे छे तिला मुळीच माहीत नाहीये. मला माहीत आहे असं ती सांगत सुटते. पण त्यात काही खरं नाही. दरवेळी ती निराळीच नावं घेते. मृणालताईनंसुद्धा एकदा सणसणीत चापलं होतं तिला याबद्दल. कदाचित ईश्वरदांना ठाऊक असण्याची शक्यता आहे.

**सुंदर** : कसल्या क्षुद्र आणि फालतू गोष्टीला तू महत्त्व देते आहेस ममी ? मी म्हणते असेल कोणी तरी लंपट उल्लू माणूस, तसली बिन चेहेऱ्याची आणि कणा नसलेली माणसं जिवंत असली तरी मेल्यासारखीच आहेत. ती अंधारातच राहायला हवीत

**मधुरा** : ईश्वरदा कधी यायचे आहेत ?

**चेतन** : आजच आलेत म्हणून कळलं मला. पण यावेळी ते विद्यापीठाच्या गेस्टहौसवर उतरलेत म्हणे.

**सुंदर** : ए बाबा, तू चलणार आहेस की नाही ? किती उशीर झालाय आधीच.
**चेतन** : सॉरी...चल चल...

[ "बाय ममी." उद्‌गारत सुंदर चेतनला घेऊन जाते. ती गेलेल्या दिशेकडं पाहात मधुरा विचारमग्न उभी राहाते. तेवढ्यात हात झटकीत घोटणकर जिन्यातून खाली येतो. क्षणार्ध थबकतो आणि मग—]

**घोटणकर** : बाई—
**मधुरा** : ( भानावर येत ) काय रे ? सामान सगळं लावून झालं ?
**घोटणकर** : फक्त तुमचे कपडे राहिलेत. ते तुम्हीच ठेवायला हवेत.
**मधुरा** : ठीक आहे. ठेवते मी. तू इथं खालीच आहेस ना ? साहेब यायची वेळ झालीय.
**घोटणकर** : साहेब येईपर्यंत मी दारचा हालत नाही बाई.

[ मधुरा जिन्याकडं वळते तशी ] बाई...एक सांगायचं होतं.

**मधुरा** : काय रे ?
**घोटणकर** : आपल्या शेजारच्या टिल्लू साहेबांनी मला चार आठ दिवस फार वात आणलाय बघा.
**मधुरा** : का ?
**घोटणकर** : भेटले की खोदखोदून चौकशी करीत राहतात. तुझे साहेब आणि तुझ्या बाई यांच्यात काय भानगड झालीय ते सांग म्हणतात. 'तसं काही नाहीयं' म्हटलं तर ऐकत नाहीत. चिरीमिरी हातावर ठेवायला बघतात. आता मी काय चिरीमिरी घेणारा नोकर आहे ?
**मधुरा** : आता पुन्हा भेटले की तू हे सगळं मला सांगितलं आहेस म्हणून सांग त्यांना. चुपचाप होतील एकदम. [ मधुरा वर जाऊ लागते तशी —]
**घोटणकर** : पण म्हणजे बाई, तसं काही नाहीये ना ?...म्हणजे तंटाबखेडा...
**मधुरा** : ( थबकून वळून ) तुझा काय अंदाज आहे ?
**घोटणकर** : छे छे, आम्ही छोटी माणसं...तरी पण आपलं वाटतं... ( थबकतो )
**मधुरा** : छोट्या माणसांनी काहीही वाटलं तरी आपल्यापाशीच ठेवावं आणि ज्यात आपला संबंध पोचत नाही त्यात गप्प बसावं. आज गाडी धुवायची राहिलीय घोटणकर.
**घोटणकर** : हो हो गाडीकडंच निघालोय मी. [ मधुरा वर जाते. मग स्वतःशीच ] बिनपाण्यानं चंपी झाली ना ? चला घोटणकर, तुम्ही आपली गाडीच धुवत बसा [ बाहेर जाण्यासाठी दार उघडतो तो बाहेरून अनिरुद्ध आणि बंदोपाध्याय येतात. अनिरुद्ध दाढीमिशा वाढवलेल्या, विस्कळीत मनःस्थितीत तरी पण पोशाख नीटनेटका, विद्यापीठातून परतल्यासारखा. हातात छोटी बॅग. येता येता तो म्हणत असतो—

" हे हे सगळं तुम्हीच तिला सांगा... " आणि— ]

**अनिरुद्ध :** घोटणकर, बाईसाहेब कुठं आहेत? घरीच आहेत की—

**घोटणकर :** घरीच आहेत साहेब. वर ताईंच्या खोलीत त्या कपडे आवरताहेत. त्यांना जाऊन वर्दी देऊ आपण आल्याची?

**अनिरुद्ध :** नको. मी बोलावीन तिला. सुंदर कुठाय?

**घोटणकर :** त्या मघाच चेतनसाहेबांच्याबरोबर बाहेर गेल्यात.

**अनिरुद्ध :** ठीक आहे. गाडी तयार आहे ना?

**घोटणकर :** होय साहेब. सकाळीच सगळी दुरुस्ती करून आणली. आता फडका मारून ऑईल पाणी पाहिलं की—

**अनिरुद्ध :** गाडी बाहेर काढून तू तयार राहा. या साहेबांना चेतनच्या घरी पोचवायचंय [ घोटणकर जातो. अनिरुद्ध दार लावून घेतो. ] तर ईश्वरदा तुम्हीच तिला हे सगळं सांगा पण—

**बंदोपाध्याय :** डोन्ट यू वरी अनिरुद्ध. सत्यजीतबद्दलची योजना कळल्यावर तुमच्या मिसेसना एकदम रिलीफ वाटेल. काही प्रॉब्लेमच उरणार नाही. आय टेल यू शी विल बी एक्स्ट्रीमली हॅपी, ( बसतात ).

**अनिरुद्ध :** ( कोट काढून, टायची गाठ सैल करीत ) आय होप सो.

[ बंदोपाध्याय बोलत असतानाच मधुरा जिन्यातून लँडिंगवर आली आहे. " नमस्ते ईश्वरदा..." म्हणत सुहास्य मुद्रेनं ती खाली येते. बंदोपाध्याय " नमस्ते " म्हणत उठतात. तशी —]

**मधुरा :** बसा बसा ऊठू नका. तुमची वाटच पाहात होतो आम्ही. मघाशी चेतननं सांगितलं म्हणून आल्याचं कळलं. कुठं, विद्यापीठाच्या गेस्टहौसवर उतरला आहात का तुम्ही?

**बंदोपाध्याय :** हो म्हणजे...पेपर सेटिंगसाठी आलोय, तेव्हाऽऽ...

**मधुरा :** आणि सत्यजीत कुठाय? का त्याला गेस्ट हौसवरच ठेवलाय? खास वडिलांच्या भेटीसाठी...( हसत ) मी आपलं गमतीनं बोलले हो.

**अनिरुद्ध :** मधुरा, तू गैरसमज करून घेऊ नकोस. ते वेगळं सांगताहेत.

**बंदोपाध्याय :** मधुराताई सत्यजीत इथं आलेला नाही आणि आता येणारही नाहीये. त्याची मावशी त्याला घेऊन अमेरिकेला गेलीय.

**मधुरा :** ( विस्मयानं ) म्हणजे?...याचा अर्थ काय?

**बंदोपाध्याय :** मृणालची धाकटी बहीण आणि तिचा नवरा सत्यजीतला भेटायला येणार आहेत एवढंच मला ठाऊक होतं. पण आपलं काही बरं वाईट झालं तर मुलाचं पुढं काय करायचं, याबद्दल मृणालनं जी योजना केली होती, ती मला माहीत नव्हती. मृणालच्या मागं ज्योतीनं सत्यजीतला घेऊन जायचं हे बऱ्याच वर्षां-

पूर्वी ठरलं होतं. ज्योतीनं मला मृणालचं पत्रच दाखवलं.

**मधुरा :** आपलं अपघातात वरं वाईट होणार आहे हे तिला काय आधी ठाऊक होतं ?

**बंदोपाध्याय :** मधुराताई, मृणाल नुसती डॉक्टर नव्हती. ती नक्षलाईट होती. रात्रीचं तिचं जीवन वेगळं होतं. गनिमी हल्ल्यात ती बेडरपणे भाग घेत होती. आपला मृत्यू अशाच एखाद्या चकमकीत होणार आहे अशी तिची खात्री होती त्यासाठी तिनं ही तरतूद केली होती.

**मधुरा :** ( विचारमग्न ) हूंऽऽ! सो दॅटस् 'दॅट, तर सत्यजीरला त्याची मावशी मावशीं अमेरिकेला घेऊन गेली. कायमची. म्हणजे आमची जबाबदारी संपली, असंच समजायचं ना ?

**बंदोपाध्याय :** अगदी बेशक. त्याची तुमच्यावर या पुढं काहीही जबाबदारी नाही. ते ते सगळं तुम्ही आता विसरून जा. काहीही घडलंच नाही असं समजाना !

**मधुरा :** जरा थांबा. सत्यजीत यांचा मुलगा आहे हे आणखी कोणाकोणाला ठाऊक आहे ?

**बंदोपाध्याय :** विश्वास ठेवा, माझ्याशिवाय ते कोणालाही माहीत नाही.

**मधुरा :** पण हे तर म्हणत होते की चेतन आणि त्याची आई—

**बंदोपाध्याय :** ते मीच त्यांना सांगितलं होतं. त्यांनी तुम्हाला सगळं विश्वासात घेऊन सांगून टाकावं म्हणून मला ती युक्ती करावी लागली. त्यावेळची परिस्थितीच तशी होती, नाही का ? पण आता तोही विचार करायचं कारण नाही तुम्हाला. तुम्ही सगळं सगळं विसरून जा.

**मधुरा :** काय हो, तुमच्या पित्याच्या अन्तःकरणाची कालवाकालव होत नाहीये ना ?

**अनिरुद्ध :** काय संबंध ? ज्याला मी काळा की गोरा हे सुद्धा पाहिलं नाही त्याच्याबद्दल मला काही वाटायचं कारण काय ?

**मधुरा :** ( स्मित करीत ) दॅट मेकस् ऑल द डिफरन्स.

**अनिरुद्ध :** म्हणजे ?

**मधुरा :** नऊ महिने पोटात राहिलेल्या मुलाबद्दल आई असं म्हणू शकणार नाही. पण हा फरक नैसर्गिकच आहे

**बंदोपाध्याय :** मी तेच म्हणतोय. तेव्हा सगळं विसरून जाऊन तुम्ही आमच्या या मित्राला क्षमा करणार ना ?

**मधुरा :** विसरण्याचा आणि क्षमा करण्याचा प्रश्न येतोच कुठं ईश्वरदा ? काहीही घडलंच नाहीये मुळी आता, नाही का हो ?

**बंदोपाध्याय :** आणि जे काय घडलं असेल ते अगदीच मामुली आणि आणि तात्पुरतं होतं. बर्न इट ! बेरी इट ! अगदी कायमचं पुरून टाका.

**मधुरा :** हो. जाळून पुरून टाकलेल्या तात्पुरत्या मामुली घटनेला काही पुन्हा कोंब

फुटत नाहीत. तेव्हा थँक्यू फॉर युवर ॲडव्हाईस.

**बंदोपाध्याय** : पुन्हा एकदा तुमच्या संसारात पूर्वीसारखं गाढ प्रेम फुलू दे, आनंद बरसू दे हीच आमची इच्छा आहे.

**मधुरा** : काय हो, या आनंदाच्या प्रसंगी तुम्ही नाही का ईश्वरदांचे आभार मानणार ? त्यांच्यामुळं तर हा सोनियाचा दिवस दिसतोय आज आपल्याला.

**बंदोपाध्याय** : आभार मानायची काही गरज नाही मधुराताई, पण तुम्ही आता खूष आहात ना ?

**मधुरा** : तर काय ? मी एकदम बेहद्द खूष झालेय. सत्यजीतची कटकट परस्पर मिटली. यांची बेअब्रू टळली. उरलेल्या तात्पुरत्या मामुली घटनांच्या अस्थी जाळून पुरून टाकल्या. बास ! संसारात यापेक्षा जास्त बायकोला काय हवं असतं ? काय हो ?

**बंदोपाध्याय** : फरगेट आणि फरगिव्ह, हा दिलजमाईचा महामंत्र आहे, हे तुम्ही उभतांनी लक्षात ठेवायला हवं. ( उठत ) बराय मग अनिरुद्ध...मी निघतो आता.

**मधुरा** : हे काय ? चहा, फराळ घेतल्याशिवाय जाणार तुम्ही ?

**बंदोपाध्याय** : चहा, फराळ रग्गड झालाय विद्यापीठात. संध्याकाळचं विमान गाठायचंय मला तेव्हाऽऽ—

**अनिरुद्ध** : ( दाराशी जाऊन दार उघडत हाकारतो ) घोटणकर...[ बाहेरून हॉर्न ऐकू येतो, तशी ] गाडी तयार आहे तुमची ईश्वरदा.

**बंदोपाध्याय** : बराय मधुराताई...वुइश यू बेस्ट ऑफ लक.

**मधुरा** : थँक्यू व्हेरी मच. आवजो...

[ अनिरुद्ध आणि बंदोपाध्याय जातात. मधुरा विचारात हरवते. क्षणभराने अनिरुद्ध येतो. दार लावून घेतो आणि सिगरेट शिलगावतो. ]

**अनिरुद्ध** : तुझ्या बेहद्द खुषीचं प्रदर्शन जरा जादाच झालं, बरं का.

**मधुरा** : ( मिस्कीलपणे ) असं ? किती जादा झालं ?

**अनिरुद्ध** : ईश्वरदांनासुद्धा खोटं वाटण्याइतकं. गाडीपाशी मला म्हणाले ते–" बाईच्या मनाचा काही थांग लागत नाही. "

**मधुरा** : आपल्यात जे घडलंय तेच मुळी अथांग आहे. तरीसुद्धा मी आता पुष्कळच खूष आहे, हे काही खोटं नाहीये.

**अनिरुद्ध** : काहीतरीच बोलू नकोस. तुझ्या माझ्यात काही सत्यजीतचा प्रश्न उभा नव्हता की बेअब्रूचा सवाल नव्हता.

**मधुरा** : हे मी न सांगता तुम्ही कळून घेतलंत हे फार चागलं झालं. गेल्या काही दिवसांत पुरुष ही काय चीज आहे ते मला हळूहळू समजायला लागलंय.

**अनिरुद्ध** : सहज घडलेला परस्त्रीसंग, याला पुरुषाच्या मनोवृत्तीत काहीही महत्त्व नसतं, हे मला ठाऊक होतं. पण प्रेम करणाऱ्या बायकोला ते कधीही समजू शकणार

नाही, हे मात्र मला आता कळायला लागलंय.

**मधुरा :** असल्या तात्पुरत्या मामुली, सहज घडलेल्या स्त्रीसंगाला फार महत्त्व देणं म्हणजे जुनाटपणा आणि मठ्ठपणा आहे, हे मलासुद्धा आजच कळायला लागलंय.

**अनिरुद्ध :** म्हणजे ?

**मधुरा :** तुमच्या लाडक्या लेकीचे आभार मानायला हवेत त्यासाठी. तिनंच माझे डोळे उघडले आज.

**अनिरुद्ध :** का ? सुंदरचा काय संबंध ? तिनं काय केलं ?

**मधुरा :** तिनं माझ्या एकूण ज्ञानात आणि शहाणपणात फार मोठी भर घातली. कुटुंब म्हणजे आई आणि मूल. फक्त आई आणि मूल. बाप नव्हे. बाप म्हणजे पाहुणा. दोन दिवसांचा पाहुणा. कामा पुरता राहाणारा आणि काम झालं की बाहेरचा रस्ता सुधारणारा पाहुणा.

**अनिरुद्ध :** याला शहाणपणा म्हणतात काय ?

**मधुरा :** याला मातृसत्ताक कुटुंबपद्धती म्हणतात.

**अनिरुद्ध :** असं ! या कारटीला कोणी सांगितली ती ?

**मधुरा :** होती म्हणे अशीच कोणी तरी डॉक्टर मृणालिनी दासगुप्ता नावाची बंगाली क्रांतिकारक स्त्री.

**अनिरुद्ध :** ( थक्क होत ) क...क...काऽय ?· मृणालिनी ? तिचा आणि सुंदरचा काय संबंध ? मृणालिनी हिला कुठं, कधी भेटली ? सुंदरला तिची माहिती कशी कळली ?

**मधुरा :** चेतन सुंदरचा मित्र आहे हे तुम्ही विसरलात काय ? या क्षणाला चेतन मृणालिनी दासगुप्ताबद्दल व्याख्यान देतोय, सुंदरच्या यंग ब्लड वूमेन्स असो-सिएशनच्या सभेत.

**अनिरुद्ध :** कोणत्या निमित्तानं ?

**मधुरा :** मंडळाच्या कचेरीत मृणालिनीचा फोटो लावणार आहे आज.

**अनिरुद्ध :** पण कशासाठी ?

**मधुरा :** मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा तिनं पाया घातला म्हणून.

**अनिरुद्ध :** या पोरीनं काय तिचा आदर्श गिरवायचं ठरवलंय का ?

**मधुरा :** ते मला माहीत नाही. पण समस्त स्त्री जातीनं मृणालिनीचा आदर्श डोळ्यापुढं ठेवावा असं तुमच्या लेकीचं मत आहे.

**अनिरुद्ध :** ( थबकून–हळूच ) माझ्याबद्दल तिला काही कळलं नाहीये ना ?

**मधुरा :** मृणालिनीला कोण पुरुष भेटला असं मी विचारलं. तेव्हा आपली कन्या म्हणाली––" असेल कोणी तरी लंपट उल्लू माणूस ! असली बिनचेहऱ्याची आणि कणा नसलेली माणसं जिवंत असली तरी मेल्यासारखीच आहेत. ती अंधारातच राहायला हवीत. "

**अनिरुद्ध :** ( रागानं ) हे हे मुलीचे फाजील लाड केल्याचे परिणाम. डोक्यात भलतीच हवा गेलेली दिसतेय तिच्या. तिचं मंडळफिंडळ साफ बंद करून टाकणार आहे मी.

**मधुरा :** तसलं काही करायला जाऊ नका; ती तुमचं मुळीच ऐकणार नाही.

**अनिरुद्ध :** पण तुला तरी चालणार आहे का ती दुसरी मृणालिनी झाली तर ?

**मधुरा :** कोणी कोणाला विचारून आणि परवानगी घेऊन काही घडत नसतो. त्यातून समजा तिनं मृणालिनीचा आदर्श गिरवायचं ठरवलंच तर त्यात काय वाईट आहे ?

**अनिरुद्ध :** मधुरा, हे तू...तू बोलते आहेस ?

**मधुरा :** त्यात वाईट काय आहे ते सांगा ना ?

**अनिरुद्ध :** उद्या कोणी तिला फसवलं, घोळात आणलं, तिचं पाऊल वाकडं पडलं, तर तू काय—

**मधुरा :** थांबा. चुकीचे शब्द वापरू नका. वाढलेल्या मुलींना कोणी फसवत नाही, घोळात आणत नाही की त्यांचं पाऊल वाकडं पडत नाही. आणि पुरुषाशी संग ही एक तात्पुरती आणि मामुली घटना आहे, नाही का ? मूर्ख पुरुष कदाचित लंपटपणानं घोळात येत असतील. पण स्त्री शहाणीच असते. आपल्या मुलाच्या पित्याची निवड ती चातुर्यानं आणि सावधपणेच करणार—( मिस्कीलपणे ) तुमच्या मृणालिनीसारखी.

**अनिरुद्ध :** ( उसळून ) पुन्हा पुन्हा तू मृणालिनीचं उदाहरण का घेते आहेस ? ती नक्षलाईट होती, क्रांतिकारक होती—

**मधुरा :** तरीसुद्धा ती एक स्त्री होती.

**अनिरुद्ध :** होय होती. तरीसुद्धा ती पिस्तुलवाली होती. स्वतःचं रक्षण करू शकत होती ती. ही ही लाडात वाढलेली हळूबाई—ही काय स्वतःला झाशीची लक्ष्मीबाई समजते ?

**मधुरा :** लग्न करणारे सगळेच पुरुष काय ढाल तरवारवाले तानाजी असतात का मुरारबाजी ? तरी बरंय बलात्काराच्या सगळ्या प्रसंगात नवरे जीव घेऊन पळून जातानाच दिसताहेत. अपवाद म्हणूनसुद्धा कोणी बायकोसाठी हुतात्मा झाल्याचं ऐकिवात नाही. तेव्हा स्त्रीरक्षणाच्या गप्पा तुम्ही मला सांगू नका. स्त्रीचं रक्षण समाज करतो, समुदाय करतो. एकटा दुकटा पुरुष स्त्रीपेक्षाही असहाय आणि दुबळा असतो.

**अनिरुद्ध :** तरीसुद्धा पुरुषाशिवाय कुटुंबाची ही पद्धती चुकीची आहे.

**मधुरा :** पण का ते सांगा की ?

**अनिरुद्ध :** कारण ती अनैसर्गिक आहे, अस्वाभाविक आहे आणि म्हणून अनैतिक आहे.

**मधुरा :** तर मग आता तुम्हाला एका प्रश्नाचं उत्तर द्यायलाच हवं. काय हो, शेतात पिकणाऱ्या धान्याचा मालक कोण ? धान्य पिकवणारा शेतकरी, की त्याला बिय

पुरवणारा व्यापारी ?

**अनिरुद्ध :** त्यात विचारण्यासारखं काय आहे ? अर्थात शेतकरीच.

**मधुरा :** स्त्रीच्या गर्भाशयाला क्षेत्र, म्हणजे शेत म्हणतात. स्त्रीही स्वतःच शेत आहे आणि शेतकरीही आहे. तीच पोटात गर्भ वाहते; मुलाला जन्म देते आणि त्याचं संगोपान करते. पुरुष फक्त बीज रुजवतो. तर प्रश्न असा आहे, की मुलाचा स्वाभाविक, नैसर्गिक आणि नैतिक मालक कोण ? शेतकरी का बियांचा व्यापारी ?

**अनिरुद्ध :** हे असले चावट दाखले या कारटीनं सांगितले वाटतं तुला ?

**मधुरा :** फॉर युवर इन्फर्मेशन. तुमची बायको बऱ्यापैकी साक्षर आहे हा दाखला दिलाय एक थोर समाजशास्त्रज्ञानं. त्यांचं नाव डॉक्टर श्रीधर व्यंकटेश केतकर.

**अनिरुद्ध :** केतकर झाले म्हणून काय झालं ? कुटुंबात पुरुष हा काय हा फक्त बियांचा व्यापारी आहे ?

**मधुरा :** त्यानं आणीक खूप काही असायला हवं. पण तो असतो का ? एका शेतात नांदायचं आणि दुसऱ्या शेतकऱ्यांना बियाणं पुरवायचं असल्या माणसाला तुम्ही काय म्हणाल ?

**अनिरुद्ध :** हे बघ तू विद्वान आहेस; शहाणी आहेस; तरीसुद्धा मला तात्त्विक चर्चेत शिरायचं नाही. पण असला बेतालपणा मात्र मी या घरात चालू देणार नाही, कधीही नाही.

**मधुरा :** तुम्ही कोण ?

**अनिरुद्ध :** मी या घराचा मालक. या मुलीचा मालक.

**मधुरा :** आत्ता तुमच्यातला पुरुष बोलायला लागला. काय हो, तुमच्या मुलीनं तुमचं ऐकायचं नाही असं ठरवलं, तर तुम्ही काय कराल ?

**अनिरुद्ध :** मी तिला सरळ घराबाहेरचा रस्ता दाखवीन.

**मधुरा :** वारे बहाद्दर ! तर मग मलाही तिच्या पाठीशी उभं राहाणं भागच पडेल कारण मी तिची आई आहे.

**अनिरुद्ध :** ठीक आहे. तूही तिच्याबरोबर निघून गेलीस तरी चालेल.

**मधुरा :** ( मिस्कीलपणे ) त्यापेक्षा आपण असं करूया का ? घर माझ्याच नावावर आहे. मुलीची नैसर्गिक, स्वाभाविक आणि नैतिक मालकही मीच आहे. तेव्हाऽ... आम्हीच इथं राहातो. काय ? वाटल्यास तुम्हीऽऽ ( हसू लागते )

**अनिरुद्ध :** हसतेस काय मधुरा ? ही काय हसण्यासारखी गोष्ट आहे ?

**मधुरा :** तुम्ही जे बोलताय ते ऐकून हसू नको तर काय रडू ? अहो राजे, तुम्ही काही तरी करून बसला आहात. मला ते पुरून टाकायला आणि विसरायला रोज विनवणी करता आहात. आता तुम्हाला सुंदरला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करायचा काय अधिकार उरलाय ?

म. प्र. ग्र.
ग्र. क्र. 29826 दि. 21/5/86
वि. नाटक

**अनिरुद्ध :** ( सुस्कारून ) हूं. साली भानगड तिथंच झालीय. खरंय. सुंदरला बोलायचा मला काही अधिकार नाहीये.

**मधुरा :** तरीही नुसत्या कल्पनेनं पिसाळून, तुम्ही कसे फणा काढून उभे राहिलात, त्याची मला मौज वाटते. शेवटी रक्ताच्या नात्याचा' प्रश्न उभा राहिला की सगळी तात्त्विक चर्चा ओघळून पडते, हेच खरं.

**अनिरुद्ध :** पण मला एक सांग, सुंदरनं उद्या खरोखरीच असं काही करायचं ठरवलं तर तू काय करशील ? पाठिंबा देशील तिला ? की गप्प राहशील ?

**मधुरा :** तुम्हाला काय वाटतं ?

**अनिरुद्ध :** काही नाही. मला पक्कं ठाऊक आहे. तू मुळीच गप्प बसणार नाहीस. आकाशपाताळ एक करून तू तिला रोखल्याशिवाय राहाणार नाहीस. माझ्या एका चुकीसाठी मी रोज इतकं नाक घासतोय तुझ्यापुढं, तरी तुला थेंबभर सुद्धा पाझर फुटत नाहीये; ती तू पोटच्या लेकीला काय मोकाट सोडशील ?

**मधुरा :** ( टाळ्या वाजवत हसत ) वाहवा! तुम्हाला खूपच कळायला लागलं बायकोचं मन. पण मी आकाश पाताळ एक केलं तरी सुद्धा त्याचा उपयोग होईलच अशा भ्रमात तुम्ही राहू नका. ती नव्या जमान्यातली मुलगी आहे. मनात येईल ते करूनच एक दिवस तुमच्यापुढं ती उभी राहील.

**अनिरुद्ध :** म्हणूनच तिला शिंगं फुटायच्या आत तिचं लग्न करून टाकायचं असं मी ठरवलंय.

**मधुरा :** पाहा तिला विचारून.

**अनिरुद्ध :** माझ्या डोळ्यासमोर लष्करातला कॅप्टनच्या हुद्यावरचा एक तरुण उभा आहे. हुशार आहे, देखणा आहे आणि मुख्य म्हणजे दणदणीत आणि ठणठणीत आहे. तो रोज या पोरीला घरात ड्रिल करायला लावील.

**मधुरा :** अहो पण—

**अनिरुद्ध :** त्या चेतन फीतनमधे काही दम नाहीये हं. तो अगदीच हा...म्हणजे माझ्यासारखा आहे.

**मधुरा :** तुम्ही स्वतःला काय गरीब समजता ?

**अनिरुद्ध :** गरीब नाही, पण फारच 'बायको बायको' करणारा आहे. गेले पंधरा दिवस तू मला "असं कसं घडलं, असं कसं घडलं" म्हणून येता जाता बडवते आहेस आणि मीही बावळा, विचार करकरून नवीनवी उत्तरं...बायकोला रुचतील अशी उत्तरं शोधून काढतोय, नाही तर 'घडलं खरं बुवा' म्हणून मान खाली घालून म्हणतोय.

**मधुरा :** तुमचा दणदणीत ठणठणीत नवरा या परिस्थितीत काय उत्तर देईल आपल्या बायकोला ?

**अनिरुद्ध** : तो ठणकावून सांगेल–" हे बघ, मॅन इज पॉलीगॉमस... पुरुष हा बहूस्त्रीकच असतो. मी काही एक जगावेगळं केलं नाही. हे असं आहे आणि असंच चालणार. आवाज नही मगता. " असं कसं घडलं " म्हणून पुन्हा विचारशील तर खबरदार. छडीनं फोडून काढीन. मुकाट्यानं बेडरूममधे जाऊन बैस ! "

**मधुरा** : अस्सं काय ? बघू याच की ( कोपऱ्यातली काठी काढून पुढं करीत. ) घ्या. [ तो विस्मयानं काठी घेतो ] आता मला सांगा, हे असं मुळी घडलंच कसं ? द्या की उत्तर ? का थांबलात ?

**अनिरुद्ध** : ( काठी टाकीत ) अगं तो आपल्या बायकोला कसं उत्तर देईल ते मी सांगितलंय. माझ्या अंगात एवढी हिंमत असती, तर आणखी काय पाहिजे होतं ? तूर्त मी असंच म्हणणार..." खरं म्हणजे असं घडायलाच नको होतं, पण घडलं खरं बुवा ! " बघतेस काय अशी–अगं मी शेळीजातीतला नवरा; घरातल्या वाघिणी-पुढं काय बें बें करणार ?

[ दोघंही हसायला लागतात–तोच·अंधार ]

**उत्तरार्ध—प्रवेश पहिला संपला.**

# उत्तरार्ध

## प्रवेश दुसरा

[ आणखी आठ दिवस उलटले आहेत. तोच हॉल. वेळ सायंकाळची. रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा––एका कोचावर शेजारी सुंदर आणि चेतन बसले आहेत. सुंदरनं पंजाबी पोशाख केला आहे. चेतन पँट आणि गुरुशर्टमधे समोरच्या कोचावर डॉ. टिल्लू बसले आहे. प्रथम ते पाईप शिलगावण्याच्या खटपटीत असतात. संभाषणाच्या ओघात पाईप पेटत नाही असे पाहून ते तो खिशात घालतात आणि चिरूट काढतात. चिरूटही सहकार्य देत नाही हे दिसताच ते तो परत खिशात घालतात आणि चक्क पत्र्याची चपटी डबी काढून त्यातून एक बिडी काढून शिलगावतात. दरम्यान–– ]

**चेतन** : खरं म्हणजे आम्ही हा लेख लिहिण्याचा त्रास तुम्हाला दिला नसता. पण एक तर मला मराठी कळत असलं आणि बोलता येत असलं तरी लिहायचं जमत नाही.

सुंदरला खरं म्हणजे जमायला हरकत नाही. एका नामवंत लेखिकेची ती मुलगी आहे, तेव्हाऽ––

**सुंदर :** काहीतरीच काय रे ? लेखनाची कला काय अनुवांशिक आहे ?

**डॉ. टिल्लू :** मुद्दा तो नाहीये. पण त्याचं काय आहे––( चिरूट शिलगावू लागतात )

**सुंदर :** वाय. बी. डब्ल्यू. ए. च्या सुवेनीरमधे मृणालिनी दासगुप्तांच्यावर लेख जायचा म्हणजे तो अधिकारी माणसानं लिहायला नको ?

**डॉ. टिल्लू :** दॅटस द पॉईंट ! डॉ. मिस मृणालिनी दासगुप्ता यांच्या जीवनाचा शोध घेणारा आणि त्यांच्या कार्याचे महत्त्व विशद करून सांगणारा लेख जितका विवेचक मर्मग्राही, आणि व्यासंगपूर्ण हवा, तितकाच तो जळजळीत आक्रमक आणि स्फोटक असायला हवा. असा लेख लिहिणारा माझ्याशिवाय उभ्या आशिया खंडात दुसरा कोण आहे ?

**चेतन :** कोणी नाही म्हणून तर आम्ही तुम्हाला अप्रोच झालो आहोत.

**सुंदर :** ( फाईल पुढं ठेवीत ) आम्हाला मिळालेलं बहुतेक मटीरियल आम्ही तुमच्यापुढं ठेवलंच आहे, आता फक्त तुम्ही––

**टिल्लू :** छे छे छे छे, सगळं मटीरियल म्हणू नकोस मुली. एक महत्त्वाचा दुवा राहिलाय, तो म्हणजे––( चिरूट खिशात घालून खिशातून पेटी काढून त्यातील विडी काढून शिलगावतात. दरम्यान )

**सुंदर :** ( थबकून वाट पाहून ) सत्यजीतचा बाप कोण होता, हाच ना ?

**चेतन :** त्याला काय महत्त्व आहे टिल्लूसाहेब ? खुद्द स्वतः मृणालताईनं त्याला कधी महत्त्व दिलं नाही की त्याचं नावसुद्धा तिनं कोणाला कधी सांगितलं नाही.

**टिल्लू :** ( झुरका घेत ) म्हणून तर चरित्रलेखकानं ते नाव अगदी पुराव्याचा डोंगर पोखरून शोधून काढायला हवं. काय समजलेत ? अरे मृणालिनी म्हणजे महिषासुरमर्दिनीसारखी क्रूर भयानक वाघीण. तिची शेळी करून तिला गट्ट करणारा वाघोबा, तिला कोण भेटला, कधी भेटला, हे कळल्याखेरीज तिचं चरित्र कसं पुरं होईल ?

**चेतन :** मी खात्रीपूर्वक सांगतो टिल्लू साहेब, तसं काहीही नव्हतं. तो एकच पुरुष केव्हातरी एकदाच तिच्या आयुष्यात येऊन गेला.

**सुंदर :** आणि तो वाघ असता तर कोल्ह्यासारखा शेपूट घालून पळून गेला असता का ?

**टिल्लू :** पॉईंट एवढाच आहे की या मागं काहीतरी भानगडीचं रहस्य आहे. म्हणून तो कोण होता, काय होता, तिला केव्हा भेटला, तिला कशी वश करून घेतली त्यानं, हे सगळं सगळं प्रकाशात आलं पाहिजे.

**सुंदर :** ते आता कसं शक्य आहे डॉ. टिल्लू ?

**टिल्लू :** सगळं काही शक्य आहे. बाईच्या बॅगा उघडा, कपाटं खोला. घरातला कानाकोपरा धुंडाळा. बाईशी जे जे संबंधित होते त्यांची कसून उलट तपासणी

करा. . कुठं तरी, काही तरी धागा सापडलाच पाहिजे. हा डॉ. बंदोपाध्याय कोण ?

**चेतन :** ते माझे मामा आहेत.

**टिल्लू :** तुमचे मामा असू देत हो, पण मृणालिनीचे ते कोण लागतात ?

**सुंदर :** तशी त्यांनी मृणालिनीला आपली मुलगी मानलं होतं.

**टिल्लू :** का ? कशासाठी ? मृणालिनीला आई वडील नव्हते ?

**सुंदर :** होते. तरी पण—

**टिल्लू :** बंदोपाध्यायाना मुलं नाहीयेत ?

**चेतन :** दोन मुली आणि दोन मुलगे आहेत. तरीसुद्धा—

**टिल्लू :** मग हा आणखी एक परक्या मुलीला मुलगी मानण्याचा फाजीलपणा काय म्हणून ? काही नाही. ही मानलेली नाती म्हणजे चोरून मादी मिरवण्यासाठी नराने केलेली धूळफेक आहे. तेव्हा माझ्या मते ही गोष्ट संशयास्पद आहे.

**चेतन :** नाही हो टिल्लूसाहेब, माझे मामा अत्यंत सात्त्विक, पापभीरू, आणि सदाचरणी गृहस्थ आहेत. उभ्या ह्यातीत त्यांनी—

**टिल्लू :** त्या गप्पा तुम्ही मला सांगू नका. या जगात कोणीही माणूस शंभर टक्के सात्त्विक, पापभीरू आणि सदाचरणी असूच शकत नाही. संधी मिळाली की नर मादीला झडपणार, तुमची सात्त्विकता पापभीरूपणा लोण्यासारखी पाघळणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. माणूस अजून पशूत्त्वापासून मुक्त झालेला नाही. काय समजलेत ? तेव्हा प्रथम या बंदोपाध्यायानाच धारेवर धरा.

**चेतन :** छे छे ते शक्य नाही. मी असं काही बोललो तरी घरातली माणसं माझी खेटरानं पूजा करतील.

**टिल्लू :** हे पाहा, सामाजिक संशोधन करायचं म्हणजे खेटरं खायची तयारी ठेवलीच पाहिजे. आमचा वाघ-शेळी सिद्धान्त संशोधनासाठी मी घरोघर मुलाखत घेत होतो त्या वेही चार वेळा बाबोबांनी आणि दोन वेळा बाघिणींनी माझ्यावर हल्ला केला. पण झालं काय ? माझ्या सिद्धान्ताला बळकटी मिळाली.

**चेतन :** तुमचं ठीक आहे पण टिल्लूसाहेब मला काही ते शक्य होणार नाही. मी कलकत्त्याला जातोच आहे. तेव्हा माझ्या पद्धतीनं शोध करून पाहातो. पण मला काही त्यात तथ्य वाटत नाही.

**टिल्लू :** ठीक आहे. तुम्ही तुमच्या पद्धतीनं शोध करा. आम्ही आमच्या मार्गानं छडा लावू. कलकत्त्याला आमचीही काही मंडळी आहेतच की !

**सुंदर :** पण टिल्लूसाहेब, लेखमात्र आम्हाला लवकर मिळायला हवा. [ तोच दारावरची घंटा वाजते. तशी उठत ] ममी आलेली दिसतेय.

**टिल्लू :** बरं झालं. दोन मिनिटं त्यांच्याकडंही काम होतंच आमचं

[ सुंदर दार उघडते तो दारात खाकोटीला ऑफिसमधल्या फाईलींचा गठ्ठा

घेऊन डी. झेड. पाटील घाम पुसत उभा. तशी —]

**सुंदर :** ओहोऽ.. साक्षात 'असं का? अरे वा!' तुम्ही कसे काय इकडं वाट चुकलात राव?

**पाटील :** नमस्ते, म्हणजे गुड इव्हिनिंग. [हात पुढे करतो तशी ती नमस्कार करते. मग] आमचे डॉ. टिल्लू सर इकडे आलेत असं कळलं म्हणून—

**सुंदर :** असं असं! मला वाटलं तुम्ही मलाच भेटायला आलात.

**पाटील :** नाही नाही...तुम्हाला भेटायला येणारच होतो. पण—

**सुंदर :** तुमच्याकडं चहा राहिलाय बरं का आमचा एक. बिस्किटासह.

**पाटील :** आता तुम्ही केव्हाही या. कँटीनचं डिपार्टमेंट माझ्याकडं आहे.

**टिल्लू :** कोण ज्ञानू झिंगरू पाटील का रे?

**पाटील :** होय सर मीच डी. झेड. पाटील

**टिल्लू :** अरे तुला माझा निरोप मिळाला नाही का?

**पाटील :** वा असं कसं होईल? निरोप मिळाला म्हणून तर आलो. अगदी ऑफीस सुटल्या सुटल्या आलो. तुमच्या बंगल्यावर कळलं की तुम्ही इकडं आहात म्हणून— (सुंदरला) मग कधी येताहात चहासाठी?

**सुंदर :** तुमची मागची उधारी फिटली का सगळी?

**पाटील :** सांगितलं ना कँटीनचं डिपार्टमेंट माझ्या हाताखाली आहे हल्ली म्हणून. आता उधारीचा म्हणा, बिलाचा म्हणा काही प्रश्नच उरला नाही.

**टिल्लू :** ज्ञानोबा, मुलींच्यापुढं गोंडा घोळायची तुझी जुनी सवय अजून गेली नाही का? अरे तू आता नोकरीतसुद्धा पर्मनंट झालास, घाटगेसाहेबांच्या कृपेमुळं! आता गृहस्थाश्रमात पर्मनंट कधी होणार?

**पाटील :** खटपट चालू आहे सर.

**टिल्लू :** तुला घाटगेसाहेबांची पुतणी कमळाक्का सांगून आलीय ना?

**पाटील :** हो सर. सांगून आलीय. परवाच तिला पाहून आलोय मी.

**टिल्लू :** मग अजून तुझा होकार कसा कळला नाही त्यांना? मुलगी श्रीमंत बापाची एकुलती एक आहे. कष्टाळू आहे. मुख्य म्हणजे-शेळी जातीतली गरीब आहे.

**पाटील :** पण ते आपलं हे नाही हो. म्हणजे ब्यूटीफूल नाहीये.

**टिल्लू :** ब्यूटीफुल? तू कधी आरशात डोकावून पाहिलं आहेस का? तुला रे ब्यूटीफुल बायको कशाला हवी? तुझ्यासारख्या गरीब कारकुनी पेशाच्या सरकारी नोकराला घरात सुंदर बायको म्हणजे पदरात जळता निखारा. तू सतत ऑफिसच्या कामासाठी दौऱ्यावर जाणार आणि तुझे वरिष्ठ अधिकारी तुझ्या घरी दौरे करीत राहणार.

**पाटील :** असं का? अरे वा!

**टिल्लू :** मूर्खा, 'अरे वा' काय? वरिष्ठांच्या मनोरंजनासाठी का तुला लग्न

करायचंय ?

**पाटील :** असं आहे का ? हे नव्हतं माझ्या लक्षात आलं. छे छे तसलं मला मुळीच चालणार नाही. बायको एकदम पतिव्रताच पाहिजे.

**टिल्लू :** तेव्हा धोरण म्हणून एक लक्षात ठेव. घरातली बायको श्रीमंत आणि कुरूपच असावी. हाताखाली काम करणारी स्टेनो, टाइपीस्ट, किंवा चिटणीस सुंदर चटक-चांदणी असली तरी चालेल. काय ? निवड तिथं दाखव. बाहेर वाघ झालास तरी घरात बायकोपुढं एकदम शेळी, काय ? घाटगेसाहेब वहिनीसाहेबांच्या पुढ्यात कसे वागतात ?

**पाटील :** आता बोलूच नका सर. डोक्यात सगळा लख्ख प्रकाश पडला.

[ तोच दारावरली घंटा वाजते. सुंदर जाऊन दार उघडते. तो भाजीची पिशवी घेऊन मधुरा येते. डॉ. टिल्लूंना आपल्या घरात बसून ऐसपैसपणे गप्पा मारताना पाहून ती चकीतच होते. आणि— ]

**मधुरा :** डॉ. टिल्लू तुम्ही ? पुन्हा इथे आमच्या घरात ?

**टिल्लू :** ( उठत ) केवळ तुमच्या मुलीनं बोलावलं म्हणून आलो. थोडं तुमच्याकडंही काम होतंच. तुमच्या ड्रायव्हरनं तुमचा निरोप मला सांगितला. तसा तुमच्या भांडणात शेजारी म्हणून मला काडीइतका रस नाही. पण मी तुम्हा उभयतांकडे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून पाहतो. इतकी वर्षे गुण्यागोविंदाने नांदणारे पतिपत्नी एकाएकी हमरी तुमरीवर का आले—

**मधुरा :** पण सांगितलं कोणी तुम्हाला आम्ही दोघं हमरीतुमरीवर आलो म्हणून ?

**टिल्लू :** मिसेस राजपाठक, माझं तुमच्या घराकडं बारीक लक्ष असतं. तशी मी तुम्हा दोघांवर एक फाईलच घातलीय. म्हणजे—

**मधुरा :** फाईल घातली असली तर ती फाडून टाका. आमच्या संबंधात तुम्ही असला काही लुब्रेपणा करू नका. त्यापेक्षा तुम्ही स्वतःचं आत्मचरित्र लिहा. तुमची बायको कशी पळून गेली, तुमच्या संसाराचा कसा फज्जा झाला, ते सविस्तर खरं खरं लिहा म्हणजे लोकांची करमणूक तरी होईल.

**टिल्लू :** पुढं मागं तोही विचार आहेच. तुम्ही तुमच्यावरली फाईल फाडून टाका म्हणताहात तर फाडली. तुमच्या मुलीनं एक जबरदस्त चरित्र विषय संशोधनासाठी दिलाय, तेव्हा—

**मधुरा :** सुंदर, हा काय प्रकार आहे ?

**सुंदर :** ममी, आमच्या मंडळानं त्यांना मृणालिनी दासगुप्तावर लेख लिहायला सांगितलाय.

**टिल्लू :** या मृणालिनी दासगुप्ताची हकीगत इतकी चित्तथरारक आहे—

**मधुरा :** मला ठाऊक आहे ती.

**टिल्लू :** पण या वाघिणीला शेळी करणारा नरव्याघ्र कोण होता हे काही तुम्हाला ठाऊक नसणार ?

**मधुरा :** तुम्हाला तरी ठाऊक आहे ?

**टिल्लू :** नाही. पण कधी तरी कळेल.

**सुंदर :** डॉ. टिल्लू, ते सगळं तुम्ही आता विसरून जा. या पाटीलबाबांना तुम्ही आत्ता जो सल्ला दिलात, तो ऐकल्यावर मंडळाची सेक्रेटरी म्हणून मी सांगते की तुम्ही हा लेख लिहावासा मला वाटत नाही. तुम्ही लेख लिहू नका. आम्ही तो छापणार नाही.

**मधुरा :** आणि पुन्हा कसलंही निमित्त करून आमच्या घरी येऊ नका.

**टिल्लू :** संतापलात ना ? आत्ता जीवाला अंमळ बरं वाटलं. तुम्ही नको म्हणालात तरी मी संशोधन करणार आणि लेख लिहिणार. छापणारे रगड भेटतील. चला ज्ञानोबा उठा येथून. आधी बंगल्यावर चला. तुमच्या लग्नातलं राजकारण तुम्हाला समजावूनच सांगायला हवं मला तुम्हाला.

**पाटील :** असं का ? अरे वा ! चला चला. ( सुंदरकडे पाहात ) बराय मग--

[ हस्तांदोलनासाठी पाटील हात पसरतो तो हात पकडूनच डॉ. टिल्लू त्याला ढकलत बाहेर घेऊन जातात. ते गेल्यावर ]

**सुंदर :** हा एवढा विद्वान माणूस इतका नीच हलकट असेल असं मला वाटलं नव्हतं. बायको श्रीमंत, कुरूप असावी आणि चिटणीस सुंदर असावी म्हणे. चेतन, आपण हा लेख दुसऱ्या कोणाकडून तरी लिहून घेऊ. ममी, तू लिहिशील ? मी तुला सगळं मटीरीयल देते.

**मधुरा :** ( तंग मुद्रेनं ) नाही. मी लिहिणार नाही.

**सुंदर :** ठीक आहे. तर मग मलाच लिहायला लागेल.

**मधुरा :** तूही लिहिता कामा नयेस. माझ्या गळ्याची शपथ आहे तुला.

**सुंदर :** तू अकारण फार खोल पाण्यात शिरते आहेस. तुला पश्चात्ताप करावा लागेल.

**सुंदर :** पण का ते सांग की ? उगीचच हुकमत गाजवायची म्हणजे काय ?

**मधुरा :** ठीक आहे. इशारा द्यायचं मी काम केलंय. तुला हवं ते कर.

[ मधुरा रागानं पिशवी घेऊन आत जाते. ]

**चेतन :** ममी, रागावल्या वाटतं.

**सुंदर :** खुशाल रागाऊ दे. मी लेख लिहिणार म्हणजे लिहिणारच. चला आता ताबडतोब मंडळात जायला हवं अगोदर. मी टिल्लूचा आग्रह धरणाऱ्या बायकांना चांगलं खडसावून सांगते आता. तरुण सुंदर मुली रस्त्यावर पडल्या आहेत, असं वाटतंय नाही का मेल्याला ?

[ जाण्यासाठी आवेगानं दार उघडते तो दारात येत असलेले अनिरुद्ध उभे तशी— ] हाई पपा, नाऊ यू रिअली लुक् स्मार्ट ! [ हा उल्लेख अर्थातच ]

अनिरुद्धांनी दाढी केल्याबद्दल आहे. आता त्यांनी हनुवटीवर छोटी दाढी ठेवलीय. वेश अर्थातच विद्यापीठातून परतल्यासारखा.]

**अनिरुद्ध :** ओ थँक्स. हाई चेतन. [चेतन प्रतिसाद देतो] सुंदर तुझी ममी कुठाय?

**सुंदर :** स्वयंपाक घरात असेल.

**अनिरुद्ध :** आणि तू कुठं निघाली आहेस एवढ्या घाईगर्दीनं?

**सुंदर :** मी आमच्या मंडळात जातेय. मी जेवायच्या वेळेपर्यंत परत येतेच पपा मला तुमच्याशी काही फार महत्त्वाचं बोलायचंय.

**अनिरुद्ध :** (हबकून) आंऽ? माझ्याशी?...म...म...महत्त्वाचं? प...प...पण म्हणजे तसं काही हे नाहीये ना? (मटकन बसत) सीरीयस?

**सुंदर :** किती घाबरलात हो? तसं काही नाहीये. फक्त ममीचं ऐकून तुम्ही माझ्यावर एकदम उखडू नका.

**अनिरुद्ध :** म...म...म्हणजे तू तू नक्की काय करायचं ठरवलं आहेस?

**सुंदर :** मी आल्यावर सांगते तुम्हाला. [दार ओढून घेऊन चेतनसह सुंदर जाते.]

**अनिरुद्ध :** (बसल्या बसल्या रुमालानं घाम पुशीत) हरे राम राम राम! हे प्रकरण आणखी माझा किती अंत बघणार आहे, देव जाणे.

[तळव्यानं तोंड झाकून मागे कोचावर मस्तक ठेवून क्षणमात्र स्वस्थ बसतो. तेवढ्यात आतून मधुरा येते. त्याला तसा पाहाताच गलबलते आणि "अगबाई... हे काय? तुम्ही केव्हा आलात? आणि असे का बसलात?" म्हणत जवळ धावते तशी—]

**अरुनिद्ध :** (सरळ होत) आताच आलो. सुंदर आणि तिचा मित्र इथून जाण्यापूर्वी (भेदरल्या स्वरात) हे काय प्रकरण आहे?

**मधुरा :** (विस्मयानं) प्रकरण? कसलं प्रकरण?

**अनिरुद्ध :** स...सुंदर इतक्या गडबडीनं मंडळात कशासाठी गेलीय? त...त...तिला माझ्याशी एवढी कशावर चर्चा करायचीय? म...ममीचं ऐकून माझ्यावर एकदम उखडू नका, असं ती का म्हणाली?

**मधुरा :** एवढंच ना? मंडळाच्या वार्षिक अंकासाठी ती मृणालिनीवर लेख लिहिणार आहे. त्या भानगडीत तू पडू नकोस असं मी तिला बजावलं होतं.

**अनिरुद्ध :** (निःश्वास टाकीत) लेख? फक्त लेखच ना? म्हणजे तसं काही सीरियस करायचं तिनं ठरवलं नाहीये ना?

**मधुरा :** आणखी काय सीरीयस करायचं असणार आहे?

**अनिरुद्ध :** मृणालिनीप्रमाणं तिनं लग्न न करता, 'आपलं ते हे' करायचं ठरवलं, तर तुला आणि मला तोंड काढायला कुठं जागा आहे का?

**मधुरा :** आणि उद्या तिनं मृणालिनीवर लेख लिहिला आणि त्यात 'आपलं ते हे

करण्यात ' तुमचं नाव आलं, तर तुम्ही कुठं जाणार आहात तोंड घेऊन ?

**अनिरुद्ध :** माझं नाव ? का ? तिला काही सुगावा लागलाय ?

**मधुरा :** अजून तरी नाही. पण शोधच करायला चौकसपणे कोणी सुरवात केली तर— ( थबकून ) तुम्हाला खात्री आहे ना ? कुठं चिठ्ठी चपाटीत पत्राबित्रात तुम्ही गुंतलेला नाहीत ना ?

**अनिरुद्ध :** छा छा...भलतंच काय ? तू मला एवढा बावळट समजू नकोस.

**मधुरा :** तुम्ही पक्के बिलंदर आहात याची मला खात्री पटलीय. पण तुमची मुलगी कदाचित सवाई बिलंदर निघायची, म्हणून विचारते. आधी डॉ. टिल्लूच लेख लिहिणार होते. त्यासाठी मधाशी ते इथं आले होते.

**अरुनिद्ध :** डॉ. टिल्लू पुन्हा इथं आला होता ?

**मधुरा :** मी पिटाळला त्याला.

**अनिरुद्ध :** त्याच्या हाती मृणालिनीवर लेख म्हणजे माकडाच्या हातात कोलीत.

**मधुरा :** त्याला लेख लिहायला द्यायचं नाही असं ठरवल्यावर तुमची लेक मला आग्रह करीत होती, मी तो लेख लिहावा म्हणून.

**अनिरुद्ध :** बापरे तू ? आणि मृणालिनीवर लेख ?

**मधुरा :** मी तिला सांगितलं की मृणालिनी दासगुप्तावर लेख लिहायला अधिकारी पुरुष एकच आहेत—डॉ. अनिरुद्ध राजपाठक.

**अनिरुद्ध :** ( किंचाळत ) मी ऽऽऽ ?

**मधुरा :** तर काय ? मृणालिनीच्या आयुष्यातील अत्यंत खळबळजनक महत्त्वाच्या घडामोडींशी त्यांचा ' जवळचा ' संबंध असून, ते तिला ' अन्तर्बाह्य ' जाणतात.

**अनिरुद्ध :** असं तू तिला सांगितलंस ? शक्य नाही. शक्यच नाही. हा सगळा तुझा चावटपणा आहे.

**मधुरा :** तिला खरोखरीच या प्रकरणातील तुमचा गुंता समजला तर काय प्रचंड उत्पात होईल याची कल्पना आहे का तुम्हाला ?

**अनिरुद्ध :** आहे. पण तिला माझं नाव कधीही कळणार नाही याची मला खात्री आहे. तुला काय वाटतं ?

**मधुरा :** मला काय वाटतं ते मी नंतर सांगेन. पण तुमच्यात आणि मृणालिनीच्यात त्यावेळी काय काय घडलं ते मला तुम्ही तपशीलवार आणि खरं खरं सांगायला हवं. सांगाल ?

**अनिरुद्ध :** मग तू मला सगळं विसरून जाऊन क्षमा करशील ?

**मधुरा :** नक्कीच. आता तिच्या आणि तुमच्या संबंधाला तसं काय महत्त्व उरलंय ? जगात अशा गोष्टी नेहमीच पुष्कळ स्त्री पुरुषांच्या बाबतीत घडतात. पण तुमच्या दोघात काय काय घडलं ते काहीही न लपवता तुम्ही सांगायला हवं.

**अनिरुद्ध :** सांगतो की. तसं म्हणजे तू विसरून क्षमा करायचं ठरवल्यावर आता सांगायला काहीच हरकत नाही. काय गंमत झाली, म्हणजे दगडफेकीत मी जखमी होऊन मृणालिनीच्या हॉस्पिटल कम् घरात गेलो हे खरंच होतं. पण मी आजार-पणाचं सोंग करून तिच्या घरी मुक्कामाला जावं हा तिचा हट्ट मी मानला नाही म्हणून तिनं ही ट्रिक लढवली होती.

**मधुरा :** याचा अर्थ तुमची घनिष्ठ मैत्री होती तर ?

**अनिरुद्ध :** मैत्री असं म्हणता येणार नाही पण मी तिला फार आवडलो होतो.

**मधुरा :** आणि तुम्हाला ती आवडली नव्हती ?

**अनिरुद्ध :** तसं म्हणजेऽऽऽ...फार म्हणता येणार नाही. बेताची आवडली होती. तशी ती काळीसावळीच होती पण--हे त्या वेळचं सांगतोय हं मी.

**मधुरा :** सांगा सांगा, त्यात आता विशेष काही उरलं नाही. तर ती काळी सावळी असली तरी मोहक होती. म्हणून तुम्ही मोहित झालात.

**अनिरुद्ध :** तसा एकदम मोहित नाही झालो मी.

**मधुरा :** तुमची तिची नक्की ओळख केव्हा झाली ? कशी झाली ?

**अनिरुद्ध :** मला वाटतं वर्षभर आधी झाली असावी. मला वाटतं बंदोपाध्यायच तिला घेऊन एकदा विद्यापीठांत आमच्या डिपार्टमेंटमधे आले होते.

**मधुरा :** अस्सं. म्हणजे ती इथं येऊन गेली होती तर ?

**अनिरुद्ध :** हो, एकदा ती आली होती आणि लखनौच्या परिसंवादासाठी मी गेलो होतो त्यावेळी परत येताना वाटेवर कलकत्त्याला मी एक दिवस थांबलो होतो. तिनं फार आग्रह केला म्हणून.

**मधुरा :** वाटेवर ? ही कोणती वाट ? कोणीकडं लखनौ, कुणीकडं कलकत्ता आणि कुणीकडं पुणं ? तेव्हा तुम्ही मुद्दाम वाकडी वाट करून तिला भेटायला कलकत्त्याला गेलात.

**अनिरुद्ध :** तिला भेटायला म्हणून नाही, पण कधीतरी कलकत्ता मला पाहायचं होतं, नाही का ?

**मधुरा :** कळलं कळलं ! सगळे पुरुष असंच करतात. त्यात विशेष काही नाही. पण याचा अर्थ तुमचा पत्रव्यवहार होता.

**अनिरुद्ध :** छे छे पत्रव्यवहार मुळीच नव्हता. ती मला ट्रंक कॉल करीत असे. घरी नाही; डिपार्टमेंटमधे.

**मधुरा :** दररोज ?

**अनिरुद्ध :** छे छे भलतंच काय ? दर आठवड्याला एकदा. फक्त सोमवारी.

**मधुरा :** आलं लक्षात. तुम्ही तिच्यावर मोहित कसे आणि केव्हा झालात ?

**अनिरुद्ध :** म्हणजे त्याची काय गंमत झाली, कॉन्फरन्सच्या वेळी मी जखमी होऊन तिच्या घरी राहायला गेलो ना त्याच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ती मला म्हणाली

"चांदणं किती सुंदर पडलंय. आपण पोहायला जाऊ या का?" म्हटलं "जाऊ या! पण फार लांब असेल तर मात्र नको बुवा." ती म्हणाली, "इथं मागल्या बाजूला व्हॉवरिंग क्लबचा स्वीमिंग टँक आहे. मी त्या क्लबची मेंबर आहे. तुम्ही गेस्ट म्हणून चला."

**मधुरा** : अहो पण तुम्ही जखमी झाला होतात ना?

**अनिरुद्ध** : हॅऽ! जखम कसली गं...एक लहानशी खोक पडली होती कपाळाला. तिनं हे मोठ्ठं बँडेज बांधून ठेवलं होतं एवढंच. तसं म्हणजेऽऽऽ...

**मधुरा** : सांगा सांगा त्यात विशेष काही नाही. सगळे पुरुष असंच करतात. तर मग तुम्ही दोघं पोहायला गेलात. पुढं? भरपूर मनमुराद पोहलात ना?

**अनिरुद्ध** : पोहलो पण तिला आपल्या शक्तीचा अंदाजच नव्हता. मी पुरे पुरे म्हणत होतो. पण ती कुठली ऐकायला? सारखी मला पाण्यात ओढून नेत होती. पुढं मधेच ती थकली आणि लागली ओरडायला. तशी तिला हात देण्यासाठी मी जवळ गेलो तर तिनं चक्क मिठीच मारली माझ्या गळ्याला. मी सावध होतो म्हणून बरं नाहीतर आम्ही दोघंही बुडायचेच.

**मधुरा** : पाण्यात नाही पण एकमेकांच्या मिठीत बुडालातच की तुम्ही दोघं.

**अनिरुद्ध** : तसं म्हणजेऽ...काठावर आल्यावर मी निग्रहानं मिठीतून सोडवून घ्यायची खूप धडपड केली. पण ती मुळी सोडेनाच मला. फार बावरली होती ती. मला वाटतं तिला बहुतेक ऊब हवी असावी माझ्या अंगाची.

**मधुरा** : मग पुढली श्रृंगारक्रीडा कुठं तळ्याच्या काठावरच केलीत का?

**अनिरुद्ध** : मुळीच नाही. निग्रहानं मी तिला घरी घेऊन आलो.

**मधुरा** : पण मग तिला ऊब दिलीत ना भरपूर? सांगा सांगा, आता त्यात लाजायसारखं काही नाही. सगळे पुरुष असंच करतात.

**अनिरुद्ध** : पुढं काय झालं कोणास ठाऊक. सकाळी ती माझ्या बिछान्यातच झोपलेली आढळली मला.

**मधुरा** : त्यानंतर सुद्धा पाच सहा दिवस राहिला होता तुम्ही तिच्या घरात.

**अनिरुद्ध** : हो मी जायचं नाव काढलं की ती डोळ्यांतून पाणी काढायची.

**मधुरा** : की राजेश्री लागले पुन्हा त्या पाण्यात पोहायला घरदार विसरून.

**अनिरुद्ध** : असं म्हणू नकोस. रोज तुला मोठ्ठी मोठ्ठी पत्रं पाठवीत नव्हतो का मी?

**मधुरा** : पाठवीत होता की. दिवसा मला पत्रं आणि रात्री तिची मिठी, खरं म्हणजे मला त्याच वेळी शंका यायला पाहिजे होती. कारण तुमची त्या वेळची पत्रं जरा जास्तच प्रेमळ होती. प्रत्येक पत्रातून प्रेमाचे कढ अगदी उतू चालले होते.

**अनिरुद्ध** : पण ते खोटे नव्हते. म्हणून तर शेवटी तुझा विजय झाला आणि मी तिला सोडून घरी परतलो.

**मधुरा :** माझा विजयबिजय काही नाही. पोट भरल्यावर प्रत्येक माणूस पानावरून जसा उठतो, तसे उठून तुम्ही घरी परत आलात.

**अनिरुद्ध :** तसं नाही. मला पूर्ण पटलं, की 'घर ते घर' आणि 'बायको ती बायको!'

**मधुरा :** आणि बाई ती बाई! वा रे वा! तुमच्यातल्या या क्रांतीबद्दल दहा सुवासिनींनी तुम्हाला पंचारतीनं ओवाळायला हवं.

**अनिरुद्ध :** पंचारती राहू दे हे सगळं विसरून तू मला क्षमा करायचं कबूल होतंस, हे लक्षात आहे ना तुझ्या?

**मधुरा :** तुम्ही एवढे बिलंदर आहात, तरीसुद्धा इतके बावळट कसे हो? मी जे कबूल केलं होतं ते काय तुम्ही खरं समजलात?

**अनिरुद्ध :** नाही का? म्हणजे...ते ते सगळं खोटंच होतं का?

**मधुरा :** तुम्ही कोठपर्यंत घसरत जाताय ते मला बघायचं होतं. त्यासाठी मी बतावणी केली. खूप रंग उधळलेत तुम्ही. त्यासाठी तरी मानायलाच हवं तुम्हाला. तुम्ही जे जे सांगितलंत ते काय सहज विसरण्यासारखं आहे?

**अनिरुद्ध :** हरे राम! फारच भारी भेटलीस तू मला. अगं माझी विनवणी ऐकून कोठल्याही दुसऱ्या बाईला दयेचा पाझर फुटला असता.

**मधुरा :** आपला संसार दहाजणासारखा असता तर मी विसरले असते आणि क्षमाही केली असती. कारण असले संसार सुरुवातीपासूननच तडजोडीचे ठेपे देऊनच उभे केले असतात. पण आपला संसार म्हणजे एक सुंदर स्वप्न, एक भव्य शिल्प मी मानलं होतं. त्यामुळंच हे हे सगळं विसरणं मला किती कठीण जातंय!

**अनिरुद्ध :** अगं तू मानीत होतीस, तसा मी सुद्धा आपला संसार म्हणजे सुंदर स्वप्न आणि भव्य शिल्प आहे, असं मानीत नव्हतो का?

**मधुरा :** पण मग हे हे असं मुळी घडलंच कसं तुमच्या हातून?

**अनिरुद्ध :** घडायला नको होतं खरं...पण घडलं बुवा...

[ तोच दारावरली घंटा वाजते. तशी— ].

**मधुरा :** सुंदर आलीय. हा विषय एकदम बंद. तिला यातलं काही एक दिसता, समजत कामा नये.

[ अनिरुद्ध रुमालानं तोंड पुसत सावरून बसतो. मधुरा दार उघडायला जाते आणि त्याच वेळी—अंधार. ]

**उत्तरार्ध—प्रवेश दुसरा संपला।**

## उत्तरार्ध

### प्रवेश तिसरा

[ आणखी काही दिवस उलटले आहेत. तोच हॉल. वेळ सायंकाळची. रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा, पूर्वी ज्या ठिकाणी मधुरा अनिरुद्ध यांचे छायाचित्र लावले होते आणि आता जिथे एक पेंटिंग लटकले आहे, तिथे घोटणकर पायाखाली स्टूल घेऊन, ते पेंटिंग खिळ्यापासून सोडवण्याच्या खटपटीत आहे. इतक्यात जिन्यातून लगबगीने सुंदर येते. तिच्या हातात एक सुंदर नायलॉनची दोरी आहे. कोचावर ठेवलेल्या मधुरा–अनिरुद्धच्या फ्रेमला हूकमधे ती दोरी लावता लावता—]

**सुंदर :** घोटण दहा मिनिटं झाली. एवढीशी फ्रेम खिळ्यापासून सोडवून काढायची त्याला किती रे वेळ ?

**घोटणकर :** कोणीतरी जाम गाठीवर गाठी मारल्यात ताई.

**सुंदर :** तुझ्याशिवाय दुसरं हा कोण उपद्व्याप करणार ?

**घोटणकर :** हा माझा उद्योग नाहीये ताई.

**सुंदर :** पपा आणि ममीची इतकी सुंदर तसबीर आधी इथून काढायचीच कशाला ? हे दळभद्री पेंटिंग इथं शोभतंय तरी ?

**घोटणकर :** पण ताई हे काम माझं नाहीये. बाईनींच केलंय. मी विचारलं तेव्हा म्हणाल्या, या घरात आता माणसांची चित्रं लावायची नाहीत.

**सुंदर :** वा रे वा ! माणसांची चित्रं लावायची नाहीत तर काय जनावरांची लावायची ? [ घोटणकर खिळ्यासकट तसबीर उपसून काढतो तशी ] बघ बघ कसा आहेस तो. दोरी काढायला सांगितली तर खिळाच उपसून काढून ठेवलास.

**घोटणकर :** खिळे रग्गड आहेत घरात ताई.

**सुंदर :** अरे पण खिळा ठोकणार आहेस कुठं ? तुझ्या का माझ्या डोक्यात ? ही काँक्रीटची भिंत कसली दगडासारखी कठीण आहे ते पाहिलंस का तू ? खिळे वाकतील पण-- [ तेवढ्यात दारावरली घंटा वाजते. तशी ] पुरे झाला हा उद्योग. हे स्टूल, पेंटिंग, हातोडी सगळं आत नेऊन ठेव. उद्या सकाळी बघू या काय करता येईल ते.

[ असे म्हणत ती छायाचित्राची फ्रेम टेबलावर भिंतीला लावून कलती ठेवते आणि जाऊन दार उघडते. बाहेरून चेतन " हाइ सुंदर ! " म्हणत आत येतो.

सुंदरही त्याला ‘ हाइ ’ म्हणते. दरम्यान घोटणकर स्टूल पेंटिंग वगैरे घेऊन आत जातो. ]

**चेतन** : हा काय उद्योग चालला होता तुझा ?

**सुंदर** : उद्योग माझा नव्हता. ममीनं केलेला उद्योग मी निस्तरीत होते. काल सकाळी तू कलकत्त्याहून परतलास ना ?

**चेतन** : तुला कोणी सांगितलं ?

**सुंदर** : सांगितलं एका कर्णपिशाच्चानं. आणि आज आत्ता संध्याकाळी तू मला तोंड दाखवतो आहेस ? कुठं गायब झाली होती आपली स्वारी ?

**चेतन** : गायब वगैरे काही नाही. घरीच जेठा मारून इलेक्शनवर एक आर्टिकल पुरं करीत बसलो होतो. पुढल्या आठवड्यात कलकत्त्याला निवडणुका होताहेत ना ! आजच्या टपालात वीकलीकडं माझा लेख जायलाच हवा होता.

**सुंदर** : मला फोनवरून कळवायचंस तरी ? मी आले असते तुला भेटायला.

**चेतन** : तू भेटल्यावर मग कसला लेख आणि कसलं काय ? आख्खा दिवस चकाट्या पिटण्यात गेला असता.

**सुंदर** : मी काय तुझ्या कामाच्या आड येते होय रे ? उलट तुझीच फर्मानशाही चालते. परीक्षा वगैरे काही नाही. ठरलेल्या वेळी भेटायला आलंच पाहिजे. ते जाऊ दे. मला सांग आपल्या आर्टीकलसाठी कलकत्त्याला काही नवं मटीरीयल मिळालं का तुला ?

**चेतन** : फारसं नाही मिळालं. पण तुझा लेख किती झाला लिहून ?

**सुंदर** : ए बाबा, तेवढं मात्र विचारू नकोस. एका वाक्याच्या पुढं मी एक शब्दही लिहू शकले नाही. शेवटी मी तो नादच सोडला. तो लेख लिहून घेण्यासाठी आपल्याला दुसऱ्या कोणाचे तरी पाय धरायला हवेत.

**चेतन** : दुसऱ्या कोणाचे कशाला ? आपण पपांनाच रिक्वेस्ट केली तर ?

**सुंदर** : पपांना ? आमच्या पपांना ? काय विचार काय आहे तुझा ? परवाच एकदा बोलताना पपांनी आमच्या वाय. बी. डब्ल्यू. ए. बद्दल सॉलीड फायरिंग दिलंय मला ठाऊक आहे ?

**चेतन** : ते ठीक आहे. वाय. बी. डब्ल्यू. ए. बद्दल माझंही काही फार चांगलं मत नाहीये. पण तुझ्यासाठी मी ते ॲक्सेप्ट केलंय. पण लेख मृणालताईबद्दल लिहायचा आहे. तुझे पपा मृणालताईला चांगले ओळखतात. आपण विनंती केली तर ते—

**सुंदर** : हे बघ, आता तुला मी स्पष्टच सांगते. ईश्वरदांच्यामुळं पपा मृणालिनीला ओळखत असले, तरी तिचं चरित्र पपांच्या नैतिक कसोटीला मुळीच उतरणारं नाहीये. त्यांना ती बाई मुळीच आवडणार नाहीये की तिचं काही एक पसंत पडणार नाहीये.

**चेतन** : मला असं वाटत नाही सुंदर. उलट मला असं वाटतं की—

**सुंदर** : मी माझ्या वडिलांना जास्त चांगली ओळखते की तू ?

**चेतन** : मला वाटतं या एका बाबतीत मी पपांना जास्त चांगला ओळखतो. पपांच्याबद्दल बरंच काही तुला माहीत नाहीये.

**सुंदर** : म्हणजे? मी नाही समजले. पपांच्याबद्दल मला काय माहीत नाहीये?

**चेतन** : पपांचे आणि मृणालताईचे किती घनिष्ठ संबंध आले होते ते--

**सुंदर** : ( ओरडून ) चेतन...तू कोणाबद्दल काय बोलतो आहेस ?

**चेतन** : रागावू नकोस सुंदर. तुला ठाऊक आहे, या असल्या गोष्टींना मी फारसं महत्त्व देत नाही. तू सुद्धा देत नाहीस, तेव्हा--

**सुंदर** : तू माझ्या पपांच्याबद्दल बोलतो आहेस, त्यांची मतं काहीही असली तरी ते एक अत्यंत सात्त्विक आणि चारित्र्यसंपन्न गृहस्थ आहेत, हे जगाला ठाऊक आहे. त्याबद्दल मी भलभलतं बोललेलं मुळीच ऐकून घेणार नाही.

**चेतन** : मी भलभलतं काही बोललो नाही सुंदर. जरा समजून घे.

**सुंदर** : 'घनिष्ठ संबंध' याचा काय अर्थ होतो ? उद्या तू म्हणायला लागशील की मृणालिनीला सत्यजीत हा मुलगा पपांच्यापासून झाला. म्हणून मी काय---

**चेतन** : उद्या कशाला ? मी आजच म्हणतो ते. तरी सुद्धा--

**सुंदर** : तुझं डोकं तर फिरलं नाही चेतन ? मृणालिनीशी संबंध जडलेला तो लंपट, उल्लू, पळपुटा पुरुष म्हणजे काय माझे पपा होते ? कोणी सांगितलं तुला हे ? काय पुरावा आहे तुझ्यापाशी असा आरोप करायला ? तू शब्द परत घे नाहीतर आपलं भांडण होईल. मी जन्मात कधी तुझं तोंड पाहाणार नाही.

**चेतन** : तू विनाकारण टोकाला जाते आहेस सुंदर. मी असल्या घटनेला महत्त्व देत नाही.

**सुंदर** : तू देत नसलास तरी मी महत्त्व देते. प्रश्न माझ्या पपांचा आहे.

**चेतन** : काल परवापर्यंत तुझी मतं निराळी होती.

**सुंदर** : माझी मतं गेली खड्डयात. प्रश्न माझ्या पपांच्या चारित्र्याचा आहे. तू एक पुरावा तरी दे, नाही तर इथून चालता हो.

**चेतन** : ( क्षणमात्र तिला न्याहळत ) ठीक आहे. मी ठरवलं तरी मला फार दिवस तुझ्यापासून हे लपवता आलं नसतं. ज्यामुळं माझी खात्री पटली तो पुरावाच तुला देतो. [ असं म्हणत खांद्यावरल्या पिशवीतून तो एक डायरी काढतो आणि 'थँक गॉड, दुसऱ्या एका संदर्भासाठी मी ही डायरी घेऊन आलो होतो' असं पुटपुटत डायरीतून एक कार्डसाइज फोटो काढून तिच्यापुढं करीत-- ] हे एक छायाचित्र पाहा.

**सुंदर** : ( छायाचित्र घेऊन पाहाताच प्रचंड धक्का बसून ) मृणालिनी आणि प...प पपा ? याचा अर्थ काय ? हा फोटो कोणी काढला ? कधी काढला ? कुठं काढला ?

**चेतन :** वेट वेट. एकदम इतकी अपसेट होऊ नकोस. फोटोच्या मागं काय लिहिलंय तेही वाच. तुझ्या पपांची सही आहे खाली.

**सुंदर :** ( छायाचित्र उलटून पाहात ) सगळं काही स्वच्छच आहे.

**चेतन :** थांब. आता या डायरीतील ही दोन पानं वाच.

**सुंदर :** कोणाची डायरी आहे ही ?

**चेतन :** मृणालताईच्या वहिणीची. ज्योतीची.

**सुंदर :** तुला कोणी दिली ?

**चेतन :** दिली नाही कोणी. मला ती सापडली. मी एक टाचणी पाहायला ईश्वरदांच्या टेबलाचा ड्रावर उघडला तर त्यात—[ थबकतो. कारण सुंदर झरझरा ती पानं वाचीत जाते. दुसरं पान ती उलटते तशी डायरी ओढून घेत ] बास बास...पुढं वाचण्यासारखं काही नाही.

**सुंदर :** पुढं ज्योतीनं पपांना शिव्या घातल्या आहेत. हे मला माहीत आहे.

**चेतन :** तुला त्या सहन होण्यासारख्या नाहीत.

**सुंदर :** हे जे पाहिलं आणि वाचलं ते सहन होण्यासारखं आहे ! मोस्ट हॉरीबल... ॲबसोल्यूटली ह्यूमीलीएटिंग...डाइनराईट डिसगस्टींग...

**चेतन :** हे ज्योतीनं म्हणावं हे ठीक आहे. पण हा संताप तुला शोभत नाही.

**सुंदर :** अरे हे हे सगळं माझ्या वडिलांच्या हातून घडलंय.

**चेतन :** सो व्हॉट ? त्यांनी काही मृणालताईवर बळजबरी केली नव्हती की तिला फसवलं नव्हतं. सगळं जाणून बुजून तिनं स्वीकारलंय.

**सुंदर :** अरे मठ्ठ माणसा, तुला आमच्या भावनांचा काही विचार सुचतो का नाही ? याचा स्पष्ट अर्थ असा आहे की पपांनी ममीचा विश्वासघात केलाय. ते तिच्याशी प्रामाणिक नव्हते. गेली दहा वर्षे ते ममीला आणि मला फसवत राहिले होते. पपा... माझे पपा...ऑफ ऑल द पर्सन्स पपाऽ ! आय कान्ट बिलीव्ह इट. ( मटकन् बसत तळव्यानं तोंड झाकून घेते तशी— )

**चेतन :** ( गलबलून ) शांत हो...उगीच रडू नकोस सुंदर.

**सुंदर :** ( ताडकन् हात काढीत ) मी रडत नाहीये. मी रडूबाई नाहीये. उगीच मलमपट्टी घेऊन तू माझ्या भोवती नाचू नकोस. ( टेबलावर ठेवलेल्या पपा-ममींच्या छायाचित्राकडं पाहात ) आय सीऽऽ ! हा फोटो ममीनं उगीचंच काढून टाकला नव्हता तर ! याचा अर्थ ममीला हे हे सगळं कळलंय. आत्ता मला गेल्या काही दिवसांतल्या ममीच्या वागण्याचा अर्थ उलगडायला लागलाय. बिचारी ममी ! ममी सगळं सामानसुमान घेऊन माझ्या खोलीत राहायला लागलीय. पपा त्या खोलीत एकटे राहातात, ठाऊक आहे ? त्यांना तस्संच पाहिजे. ही डिझर्व्हड् इट् !

**चेतन :** सुंदर, मी पुन्हा सांगतो. या गोष्टीला तसं फारसं महत्त्व नाहीये. तुला हे हे

सगळं विसरायला हवं.

**सुंदर :** ( भडकून ) डोन्ट हॅव अ टॉल टॉक ! मला तुझ्या उपदेशामृताची काही एक गरज नाहीये. मरेपर्यंत सगळं सगळं लक्षात ठेवीन मी. फारसं महत्त्व नाहीये म्हणे ! व्हॉट सॉर्ट ऑफ मॅन आर यू ? उद्या लग्न झाल्यावर तुझ्या बायकोशी तू असाच वागणार आहेस ?

**चेतन :** माझ्या भावी बायकोनं लग्नासाठी मला अजून होकार सुद्धा दिलेला नाही.

**सुंदर :** आणि आता ती तुला होकार देईल या भ्रमात कधीच राहू नकोस तू. तुम्ही पुरुष कसे नीच, मुर्दाड, उलट्या काळजाचे आणि कृतघ्न असता याची पुरेपूर खात्री पटलीय माझी.

**चेतन :** सगळेच पुरुष असे असतात असं म्हणू नकोस तू सुंदर.

**सुंदर :** ( ठासून ) एकदा नव्हे शंभर वेळा म्हणणार. सगळे सगळे पुरुष अस्सेच असतात. तू देखील त्यातलाच.

**चेतन :** अगं प...पण म...म...मी काय केलंय ?

**सुंदर :** आज केलं नसलंस म्हणून काय झालं ? उद्या तू तेच करणार. दुसरी मृणालिनी दिसली की तू पाघळणार.

**चेतन :** काहीतरीच काय ? 'बाई भेटली की पाघळला' असल्या जातीतला माणूस आहे का मी ?

**सुंदर :** पपासुद्धा तसल्या जातीतले नव्हते. पण शेवटी झालं काय ?

**चेतन :** त्याचा जाब तू पपांना विचार. मला काय म्हणून त्याची शिक्षा ?

**सुंदर :** तुला कोणी शिक्षा केलीय ?

**चेतन :** आत्ताच तर तू म्हणालीस की 'होकार देईन या भ्रमात तू राहू नकोस' म्हणून.

**सुंदर :** पपा एकदा कलकत्त्याला गेले तर एवढं महाभारत घडलं. तू तर वर्तमानपत्री माणूस. सतत फिरता राहाणारा. रोज ठिकठिकाणी तुला शेकडो पोरी भेटणार. तुझा भरवसा कोण देणार ?

**चेतन :** त्यात काय ? माझ्यावर लक्ष ठेवायला तू माझ्याबरोबर येत राहा.

**सुंदर :** आत्ता तो प्रश्न नाहीये. पपांना मी खरमरीत शब्दांत जाब विचारणार आहे.

**चेतन :** खरा जाब विचारायला हवा होता मृणालताईला. तिचा तर तू कौतुकानं मंडळात फोटो लावलास. एवढंच नव्हे तर—

**सुंदर :** तो फोटोबिटो केव्हा तरी काढून फेकूनच देणार आहे मी आणि लेखाचा विचार तर एकदम रद्दच. उनाड, चवचाल, छचोर टवळी मेली.

**चेतन :** मघाशी तुझं मत निराळं होतं.

**सुंदर :** मघाशी पपा तिच्यात गुंतले गुरफटले होते हे मला ठाऊक नव्हतं. पपा बिचारे

गरीब भाबडे सरळमार्गी. याच महामायेनं पकडलं त्यांना आपल्या जाळ्यात. मातृसत्ताक कुटुंबपद्धती म्हणे. लग्नाशिवाय पोर हवं होतं, तर जाऊन पकडायचा होता तिच्याच टोळीतला एकादा नक्षलवादी. माझ्या पपांच्याशिवाय दुसरा पुरुष कोणी दिसला नाही सटवीला ?

**चेतन** : अगं पण तू हा जाब मला का विचारते आहेस ?

**सुंदर** : काही बोलू नकोस. तुलाच तिचं फार कौतुक होतं आणि अजूनही आहे. तूच तिच्यावर भलं मोठ्ठं व्याख्यान झोडलंस. काय म्हणे--' हिच्या सारख्या धाडशी स्त्रिया घराघरांतून निर्माण झाल्या पाहिजेत.' हो; होतील की. प्रत्येक घरातल्या तरुण अविवाहित मुलींना पपांच्यासारखे पुरुष भेटले की झालं. तू त्यांचा चेला तयार होतोच आहेस हळूहळू. ' मी असल्या गोष्टींना फारसं महत्त्व देत नाही.' असं म्हणतोच आहेस तू सध्या. कशाला देशील ? तरुण सुंदर मुलींच्याबरोबर परस्पर बिनबोभाट मजा मारायला मिळाली तर तुझी कशाला तक्रार असेल ?

**चेतन** : आज तुझा भलताच खराब मूड लागलाय. तुझ्याशी काही बोलण्यातच अर्थ नाही. मी जातो आता. ( डायरी पिशवीत घालतो. )

**सुंदर** : ( रागानं ) जा जा...खुशाल जा. पुन्हा माझ्याशी बोलू नकोस. मला भेटूसुद्धा नकोस !

**चेतन** : ( दार उघडत ) ऊ हूं. ते मात्र चालणार नाही. मी पुन्हा जरूर येणार आणि तुझ्याशी बोलणार. माझा हक्क राखून ठेवून जातोय मी.

[ चेतन दार लावून जातो. सुंदर हातातल्या फोटोकडं तशीच पाहात विचार-मग्न बसून राहाते. क्षणार्धाने फोटो पर्समधे ठेवून देते. तेवढ्यात आतून मधुरा येते आणि-- ]

**मधुरा** : हे काय ? चेतन आला होता ना ?

**सुंदर** : हो आला होता. आता गेला. मी घालवून दिला त्याला.

**मधुरा** : घालवून दिलास ? का ?

**सुंदर** : ते कारण प्रायव्हेट अँड पर्सनल आहे. मी तुला ते सांगणार नाही.

**मधुरा** : ठीक आहे नको सांगूस. ( हाकारत ) घोटणकर...[ आतून घोटणकर येतो. मधुरा टेबलावर लिहून ठेवलेली पत्रं उचलीत. ] आधी ही पत्रं हेड पोस्ट ऑफिसात जाऊन टाक. डाक गेली असली तरी टाक.

[ घोटणकर पत्रं घेऊन जातो. क्षणभर स्तब्धता. मधुरा टेबलावरली डाक चाळत राहते. सुंदर बघत राहते. घोटणकर गेल्यावर-- ]

**सुंदर** : ममी, मृणालिनी आणि पपा यांच्याबद्दल मला सगळं कळलंय.

**मधुरा** : ( तिच्याकडं न बघता ) तुला ते कळणार हे मला ठाऊकच होतं. शिवाय तुमच्या दोघांचं जे बोलणं माझ्या कानावर पडलं--मी उभं राहून ऐकलं असं

समजू नकोस,––त्यावरूनही ते माझ्या लक्षात आलं.

**सुंदर** : ऐकलं असलंस तरी बिघडत नाही. माझ्या दृष्टीनं त्यात लपवण्यासारखं काहीच नव्हतं.

**मधुरा** : प्रश्न तुझ्या एकटीचा नाहीये. घरात घोटणकर काम करीत होता, हे तुला माहित होतं ना ?

**सुंदर** : आय ॲम सॉरी. बोलण्याच्या भरात तेवढं भान मला राहिलं नाही.

**मधुरा** : पुष्कळ बाबतीत तुझं भान, ताळतंत्र आणि पोच सुटत चाललाय. टेक इट ॲज अ वॉर्निंग.

**सुंदर** : ( फुरंगटून ) हूंऽऽ ! त्यासाठी आत्ताच मला फैलावर घ्यायचं तुला कारण नाही. पपांनी जे केलं ते कळल्यावर तू मुकाट्यानं गप्प का बसलीस ? त्यांना जाब का नाही विचारलास ? त्यांची निर्भर्त्सना करून हे घर सोडून चालती का नाही झालीस ?

**मधुरा** : त्याची कारणंसुद्धा प्रायव्हेट आणि पर्सनल आहेत. ती मी तुला सांगणार नाही.

**सुंदर** : मला ठाऊक आहे हे तुझं उत्तर नाहीये. हा टोमणा आहे; मघाशी मी बोलले त्याला उद्देशून मारलेला. चेतनला जा असं मी का म्हणाले ते आता सांगतेः पपांचे मृणालिनीशी जे संबंध आले होते त्याला फारसं महत्त्व देऊ नकोस, असं तो पुन्हा पुन्हा मला सांगत होता.

**मधुरा** : ते तर तुझंच मत होतं. अगदी कालपरवापर्यंत.

**सुंदर** : होय होतं. मृणालिनीबद्दलसुद्धा मला फार आदर वाटत होता. पण आता ते सगळं बदललंय. आपण हे घर सोडून दुसरीकडं जाऊन राहूया.

**मधुरा** : आपण म्हणजे कोण ?

**सुंदर** : आपण म्हणजे तू आणि मी.

**मधुरा** : ( गालात हसत ) म्हणजे मातृसत्ताक कुटुंब स्थापन करायचं म्हणतेस ?

**सुंदर** : तसं म्हण पाहिजे तर. पण पपा आहेत त्या घरात काही मी यापुढं राहायची नाही.

**मधुरा** : मग त्याला एक सोपा उपाय आहे. आपण तुझं लग्नच करून टाकू म्हणजे झालं.

**सुंदर** : तेवढ्यानं काय होणार आहे ? तू इथं याच घरात राहणार आहेस का ?

**मधुरा** : हो.

**सुंदर** : ( पर्समधून फोटो काढून देत ) हा फोटो पाहा. त्याच्या मागं काय लिहिलंय तेही वाच. [ मधुरा फोटो निर्विकारपणे दोन्ही बाजूंनी पाहून पुन्हा परत करते. तशी–] आता सांग. तरी सुद्धा तुला इथं याच घरात राहावंसं वाटतं ?

**मधुरा** : हो.

**सुंदर** : पण का ते सांग की ?

**मधुरा** : तुला ते कळणार नाही.

**सुंदर** : पपांच्याशिवाय काय तू निराधार होणार आहेस ?

**मधुरा** : निराधार मी होणार नाही; तुझे पपा होतील आणि ते मला चालणार नाही... कधीही नाही.

**सुंदर** : पण मला हे खरोखर कळत नाही ममी, की—

**मधुरा** : तुला ते खरोखरीच कळण्याच्या पलीकडं आहे. निदान सध्या तरी. तू माझ्या वयाची होशील तेव्हा कदाचित ते तुला समजायला लागेल. तोपर्यंत ड्रॉप धिस सब्जेक्ट !

**सुंदर** : पण ममी–

**मधुरा** : ( जरबेनं ) हा विषय बंद म्हणून एकदा मी म्हटलंय ना ? [ तोच घंटा वाजते. सुंदर फुरंगटून बसते. मधुरा दार उघडते. अनिरुद्ध येतात. जड पावलानं आणि पडलेल्या चिंताग्रस्त मुद्रेनं. ते कोचावर बॅग टाकतात. कोट काढतात. टाय सोडू लागतात. ]

**मधुरा** : ( कोट टाय बॅग उचलत ) आज तुम्हाला युनिव्हर्सिटीतून परत यायला उशीर झाला.

**अनिरुद्ध** : हो. एक मीटिंग होती. ( थबकून ) शिवाय येताना चेतन भेटला मला.

**मधुरा** : हे ठेवून येतेच मी परत. [ ती त्यांची बॅग, कोट, टाय घेऊन आत जाते. क्षणभर स्तब्धता. तंग वातावरण. मग ]

**अनिरुद्ध** : कशी आहेस तू बेटी ?

**सुंदर** : मी ठीक आहे. मला काय धाड भरलीय ? पण पपा तुम्ही हे चांगलं केलं नाहीत.

[ मघाचा फोटो काढून दाखवते. तेवढ्यात मधुरा येते आणि ]

**मधुरा** ( जरबेनं ) सुंदर—

**सुंदर** : नाही ममी. मी तुझं मुळीच ऐकणार नाही. मी बोलणार.

**अनिरुद्ध** : बोलू दे तिला मधू.

**सुंदर** : पपा तुम्ही आम्हाला फसवलंत. तुम्ही ममीचा विश्वासघात केलात. तुम्ही कृतघ्न आहात. मला तुमचं तोंड पाहू नयेसं वाटतंय.

**मधुरा** : तोंड आवर सुंदर.

**सुंदर** : तुम्ही निर्लज्ज, हलकट, बेशरम—

**मधुरा** : ( अंगावर धावून जात कडाडते ) एक अक्षर बोलशील तर खबरदार ! शरम नाही वाटत तुझ्या पपांना तोंडाला येईल त्या शिव्या घालतेस ती ? कसला माज चढलाय तुला ? लाडात वाढवलं त्याचा !

**सुंदर** : ( घाबरून रडवेल्या स्वरात ) पण ममी, पपा––

**मधुरा :** पपांचा न्यायनिवाडा करणारी तू कोण ? नीट कान खोलून ऐक. तुझ्या पपांनी जे काही केलंय त्याचा संबंध बायको म्हणून फक्त माझ्याशी पोचतो. दुनियेशी नाही की मुलगी म्हणून तुझ्याशीही नाही. तुझे वडील म्हणून ते आजही श्रेष्ठच आहेत. तुझ्याबाबतीत त्यांनी आपलं सगळं कर्तव्य पुरेपूर बजावलं आहे. त्यांना एक शब्दानं सुद्धा दोष देण्याचा तुला अधिकार नाही. तुझं त्यांनी काहीही कमी केलेलं नाही. जे काय घडलंय त्याचा संबंध फक्त आमच्या दोघांशीच पोचतो. आमचं आम्ही बघून घेऊ. तुला मधे नाक खुपसायचं काम नाही. स्वतःच्या अकलेची आणि नैतिक वर्तनाची तुला एवढी घमेंड चढली असेल तर समोरचा दरवाजा मोकळा आहे. खुशाल चालती हो आणि बाहेर जाऊन काय दिवे लावायचे ते लाव. तुला त्यांचं तोंड पाहायचं नसेल तर मलाही यापुढं तुझं तोंड दाखवू नकोस.

: मधुरा, मला वाटतं--

**मधुरा :** तुम्हाला काहीही वाटायची जरुरी नाही. तुम्ही यात मधे पडू नका. तू तुझ्या पपांना ' कृतघ्न ' म्हणालीस. ' निर्लज्ज, हलकट, बेशरम ' या शब्दानी तू त्यांचा अपमान केलास. नॉट अंडर धिस रूफ ! या घरात तू आपली मर्यादा सोडून केलेला हा उन्मत्तपणा मी कधीही सहन करणार नाही. बाहेर चालती हो आणि पपांचं चारित्र्य हनन करणारा जो काय लेख तुला लिहायचाय तो तू खुशाल लिही. त्या लेखाचा समाचार घ्यायला मी समर्थ आहे. तुझ्या पपांच्या पाठीशी मी उभा आहे.

**सुंदर :** ( घाबरून ) ममी...ममी...चुकलं ( जवळ जाते तशी )

**मधुरा :** ( तिला दूर लोटत ) येऊ नकोस माझ्या जवळ. तुझ्या पपांचा तू अकारण अपमान केला आहेस. तू त्यांच्या पाया पड आणि चुकलं म्हणून त्यांची क्षमा माग, नाहीतर अशी बाहेर चालती हो.

**सुंदर :** ( रडत उन्मळत पपांच्या पायावर पडत ) पपा...पपा माझं चुकलं मला क्षमा करा...[ अनिरुद्ध कळवळून " सुंदर...बेटी मी क्षमा केलीय तुला..." असं म्हणत तिला उठवून जवळ घेतात. रुमालानं तिचे डोळे टिपत " पुरे...पुरे झालं आता. तू वर आपल्या खोलीत जा आणि शांत हो. मग भेटतो मी तुला"... सुंदर डोळे पुसत आवेगानं जिन्यातून वर निघून जाते. मग-- ]

: ( भारावून ) मधुरा, तुझं हे रूप...अवतार बघून मला काय वाटलं सांगू ?

**मधुरा :** ( शांतपणे ) काय वाटलं ?

**अनिरुद्ध :** आणखी शंभर वेळा पुन्हा तुझ्या प्रेमात पडावं.

**मधुरा :** नको नको. प्रेमाचा एवढा धबधबा खुला करायची गरज नाही. हे आपलं पहिलंच प्रेम धडपणे तडीला पोचवा, म्हणजे मी भरून पावले.

**अनिरुद्ध :** शालजोडीतला आहेर घरपोच मिळाला. पण आता तू मागचं सगळं

विसरून मला क्षमा केली आहेस तर मग—

**मधुरा** : सांगितलं कोणी तुम्हाला, मागचं सगळं विसरून मी तुम्हाला क्षमा केलीय म्हणून ?

**अनिरुद्ध** : असं कसं होईल ? आत्ताच तर तू सुंदरला म्हणालीस की–

**मधुरा** : सुंदरला मी जे जे बोलले ते फक्त तिच्यासाठी होतं. तिची आई म्हणून मी तिच्यावर केलेल्या शस्त्रक्रियेचा तो एक भाग होता. बाकी खरं सांगायचं, तर सुंदरनं तुम्हाला ज्या ज्या शिव्या घातल्या त्यात खोटं काही नव्हतं.

**अनिरुद्ध** : ( मटकन बसत कपाळाला हात लावीत ) हरे राम ! तुझ्या मते मी एकूण सर्व दुर्गुणांचा पुतळा आहे म्हणायचा ?

**मधुरा** : असं मी कधी म्हटलं ? गुण आहेत ते आहेतच की. स्त्रीलंपट पुरुषासारखे तुम्ही काही हृदयशून्य आणि निष्ठूर नाहीत. तुम्ही कधी आपल्या कर्तव्यात कसूर केलेली नाहीत. आपलं वागणं चुकलं हे मान्य करण्याइतपत न्यायबुद्धी आहे तुमच्यात. हे सगळं आहे म्हणून तर मी या घरात राहिलेय अजून.

**अनिरुद्ध** : म्हणजे आज ना उद्या हे सगळं विसरून तू मला क्षमा करण्याची शक्यता आहे म्हणायची ?

**मधुरा** : तुम्हाला खरं सांगू का ? तुम्ही माझ्यावर जो आघात केलाय तो तुमची बायको म्हणून मला कधीही विसरता येणार नाही. पण मघाशी अगदी अगदी सहज म्हणून उसळून, ज्या तडफेनं सुंदरशी बोलताना मी तुमची बाजू घेतली, त्यामुळं मला एक नवाच प्रत्यय आलाय. आत्ता तर मला त्याची खात्रीच पटलीय. बायको ही नवऱ्याची नुसती बायकोच नसते. हळूहळू सहवासानं ती त्याची आईसुद्धा व्हायला लागते. पतीच्या विश्वासघाताबद्दल बायको कदाचित क्षमा करणार नाही, पण आई क्षमाशील असते.

**अनिरुद्ध** : म्हणजे अजून मला आशा करायला जागा आहे. अगदीच काही जन्मठेप काळं पाणी नाही.

**मधुरा** : प्रश्न असा आहे की, आपल्यातले ते ते पूर्वीचे स्वप्नरंगी संसाराचे दिवस पुन्हा कधीतरी येणार आहेत का ?

**अनिरुद्ध** : ( उत्साहानं ) येतील, येतील ! नक्कीच येणार. त्यासाठी पुन्हा अगदी पहिल्यापासून तुझ्यावर प्रेम करायची तयारी आहे आपली.

**मधुरा** : ( मिस्कीलपणे ) पुन्हा पहिल्यापासून प्रेम करणार म्हणजे काय करणार ? पुन्हा मला पळवून नेणार ?

**अनिरुद्ध** : ( अस्तन्या गुंडाळीत ) सांगतो. आधी वर जातो. तुझ्या लाडक्या लेकीची समजूत घालतो आणि ( जिन्याकडं जात ) आपलं ते हे खाली घेऊन येतो.

**मधुरा** : आपलं ते हे म्हणजे ?

**अनिरुद्ध :** ( पायरी चढत ) म्हणजे तुझं कपाट, बॅगा, पुस्तकं आणि ते हे..तुझा... बिछाना...

**मधुरा :** उल्लूपणा पुरे ऽऽ...जरा वयाचं भान ठेवा.

**अनिरुद्ध :** काळजी करू नकोस. भान ठेवून सगळं पद्धतशीर करतो मी.

[ तो दोन पायऱ्या चढून वर जातो न जातो तोच— ]

**मधुरा :** अहो ऽऽ —

**अनिरुद्ध :** ( थबकतो. वळून बघतो. मग जवळ येत तिची नक्कल करीत म्हणतो ) मला एक सांगशील का ? हे असं मुळी घडलंच कसं ?

**मधुरा :** ( त्याची नक्कल करीत म्हणते ) खरं म्हणजे असं घडायला नको होतं. पण— घडलं खरं बुवा !

[ दोघेही हसत असतांनाच—पडदा ]

**नाटक संपलं.**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
क्र. 29826 नों. दि. 20.5.88
वि. नाटक ... क्र. ...

IRBK-0121426
IRBK-0121426

# वसंत कानेटकरांचे साहित्य

## नाटके

□○* वेड्याचे घर उन्हात
* देवांचं मनोराज्य
□○* प्रेमा तुझा रंग कसा !
□* रायगडाला जेव्हा जाग येते
दोन ध्रुवावर दोघे आपण
□○ मत्स्यगंधा
मोहिनी
□○ अश्रूंची झाली फुले
लेकुरे उदंड जाली
इथे ओशाळला मृत्यू
□○ घरात फुलला पारिजात
□○ मला काही सांगायचंय
तुझा तू वाढवी राजा
मीरा मधुरा
□○ हिमालयाची सावली
○ बेइमान
□○ अखेरचा सवाल
नलदमयंती
○ विषवृक्षाची छाया
□○ कस्तुरी मृग
माणसाला डंख मातीचा
□○ सूर्याची पिल्ले
एक रूप अनेक रंग
□○ गोष्ट जन्मांतरीची
□○ गाठ आहे माझ्याशी
कधी तरी कोठे तरी
पंखांना ओढ पावलांची
□○ छूमंतर
□○ गगनभेदी
□○ प्रेमाच्या गावा जावे
वादळ माणसाळतंय
मदनबाधा

## एकांकिका

□○ व्यासांचा कायाकल्प
मद्राशीने केला मराठी भ्रतार
गड गेला पण सिंह जागा झाला
स्मगलर सम्राटांच्या न्यायालयात
रामशास्त्री
झेंडेपाटील महाविद्यालयात गंगू अंबू
विठा
आनंदीबाई आणीबाणी पुकारतात.
शहाण्याला मार शब्दाचा
दिव्यासमोर अंधेर

## कादंबरी

□ घर
पंख

○ पोरका
तेथे चल राणी

## कथासंग्रह

लावण्यमयी
रमाई

हे हृदय कसे आईचे

## टीका

नाटक एक चिंतन

## आत्मवृत्तपर लेख

मी माझ्याशी

* असे चिन्ह असलेल्या नाटकांना महाराष्ट्रराज्य पुरस्कार मिळाला आहे.

‘ रायगडाला जेव्हा जाग येते ’ या नाटकाला १९६४ साली संगीत–नाटक अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे.

मराठी नाट्यसम्मेलनाध्यक्षपद १९७१ साली कुर्ला येथे भरलेल्या नाट्यसम्मेलनाचे. संगीत–नाटक अकादमीचा नाट्यलेखन पुरस्कार १९८४ साली मिळाला.

□ असे चिन्ह असलेली नाटके हिंदीत रूपांतरित झाली आहेत.

○ असे चिन्ह असलेली नाटके गुजराथी, कानडी, बंगाली इ. अन्य भाषांत रूपांतरित झाली आहेत.